योद्धा साहित्यिक : अण्णा भाऊ साठे । तळपती तलवार... : नारायण सुर्वे
साहित्यातील अंगार : अमर शेख । सुरेश भट : रंग ह्यांचा वेगळा...
बा. सी. मर्ढेकर : नवकवितेचे जनक । ज्ञानपीठ विजेते : विंदा करंदीकर
साहित्यातील पारिजात : मंगेश पाडगावकर । वि. वा. शिरवाडकर - कुसुमाग्रज : मराठी-भाषा-वैभव
विदुषी : दुर्गा भागवत । ग्रेस : गूढ इथले संपत नाही...
नवकथा प्रणेते : गंगाधर गाडगीळ । विजय तेंडुलकर : समाजवास्तवाचे भाष्यकार
एक दुःखार्त झाड : दया पवार । मराठी साहित्यातला अढळ तारा : नामदेव ढसाळ
महाराष्ट्राचे लाडके व्यक्तिमत्त्व : पु. ल. देशपांडे

## साहित्य-सरिता...

गेल्या ५०-६० वर्षांतील; विशेषकरून १९४० ते १९८०-९० पर्यंतच्या काळातील निवडक साहित्यिकांचा परिचय करून देणारी ही पुस्तकमालिका.

ह्या साहित्यिकांची ओळख करून देताना त्यावेळचा आपला मराठी समाज, १९४२ ची 'चले जाव' चळवळ, स्वातंत्र्यलढा, १९४७ चे भारताला मिळालेले स्वातंत्र्य, त्यानंतर संयुक्त महाराष्ट्र चळवळ, अशा ऐतिहासिक ठळक घटना आपल्यासमोर ओघाने येतात. तसेच मराठी साहित्यातील नवे प्रवाह; नवकविता, नवकथा, वैचारिक वाङ्मय, विनोदप्रधान साहित्य, वंचितांची अभिव्यक्ती असलेले साहित्य असे विविध प्रवाहदेखील आपल्याला ह्या पुस्तकांतून दिसतात.

परिचयात्मक अशी ही पुस्तके आहेत. त्यांच्या साहित्याची समीक्षा नाही किंवा केवळ त्या साहित्यिकांचे चरित्र नाही. त्यांच्या साहित्याचा हा परिचय आहे. तसेच ह्या लेखकांनी लिहिलेले साहित्यही संक्षिप्तपणे ओळख होण्यासाठी यामध्ये समाविष्ट केले आहे.

***अण्णा भाऊ साठे** ह्यांनी आपल्या साहित्यातून जनजागृती करत, सामाजिक न्यायासाठी योद्धा बनून लढा दिला... आपला स्वतःचा असा ठसा मराठी साहित्यावर उमटवला... मराठी साहित्य-सरितेतील त्यांचे साहित्य पुढे प्रवाहात रूपांतरित झालेले आपल्याला दिसते.*

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

# योद्धा साहित्यिक
# अण्णा भाऊ साठे

माधव जोशी



महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

साहित्य-सरिता
महाराष्ट्रातील प्रमुख निवडक साहित्यिकांचा परिचय

# योद्धा साहित्यिक
# अण्णा भाऊ साठे

**माधव जोशी**
सहलेखिका : कोमल दवणे

साहित्य-सरिता
महाराष्ट्रातील प्रमुख निवडक साहित्यिकांचा परिचय

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

➢ **पुस्तकाचे नाव :** साहित्य - सरिता : महाराष्ट्रातील प्रमुख निवडक साहित्यिकांचा परिचय
योद्धा साहित्यिक : अण्णा भाऊ साठे

➢ **संपादक/लेखक :** माधव जोशी

➢ **प्रथमावृत्ती :** २०२६

➢ **आयएसबीएन :** ९७८-९३-९३५९९-८४-१

➢ **प्रकाशक :**

सचिव,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ
रवींद्र नाट्यमंदिर इमारत, दुसरा मजला,
पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी आवार,
सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५.

➢ © **प्रकाशकाधीन :**

➢ **मुद्रक :**

व्यवस्थापक,
शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय,
चर्नी रोड स्टेशनजवळ,
मुंबई ४०० ००४.

➢ **किंमत :** रुपये ७१/-

या पुस्तकात व्यक्त केलेली मते स्वतः लेखकाची असून, या मतांशी साहित्य आणि संस्कृती मंडळ व महाराष्ट्र शासन सहमत असेलच असे नाही.

# निवेदन

नमस्कार,

प्रमुख पंधरा निवडक साहित्यिकांची ओळख पंधरा पुस्तकांद्वारे करण्यात आली आहे.

या पंधराही साहित्यिकांमुळे; कवी, कथाकार, कादंबरीकारांमुळे, त्यांच्या साहित्यामुळे मराठी साहित्य-सरितेच्या प्रवाहाला वेगळे वळण प्राप्त झाले आहे. ह्या अर्थाने ह्या पंधरा साहित्यिकांची निवड ही प्रातिनिधिक स्वरूपाची आहे तशीच ती महत्त्वाची ठरते.

ह्या पंधरा साहित्यिकांचा साहित्यिक काळ ढोबळ मानाने स्वातंत्र्यपूर्व काळापासून; १९४०च्या आसपास ते १९८५ पर्यंतचा हा ४०-५० वर्षांचा कालखंड आहे. ह्या काळामध्ये मराठी समाजाच्या विश्वात अनेक उलथापालथी झाल्या. आर्थिक, सामाजिक, राजकीय स्थित्यंतरे वेगाने घडत गेली. ह्या सर्व बाह्यपरिस्थितीचे प्रतिबिंब ह्या पंधराही साहित्यिकांच्या साहित्यामध्ये आपल्याला आढळून येते. शाहीर अमर शेख आणि अण्णा भाऊ साठे यांनी त्यावेळच्या वंचित समाजाचे विशेषकरून कामगारवर्गाचे वास्तव व भेदक चित्रण केले. तसेच ह्या कामगारवर्गाच्या, मध्यमवर्गाच्या बदलत्या जाणिवा गंगाधर गाडगीळ व बा. सी. मर्ढेकर यांच्या कृतीतून आपल्याला आढळून येतील. १९६०साली महाराष्ट्र राज्याचा उदय झाला त्याच्या आसपासच्या काळामध्ये मराठी भाषेचा अभिमान बाळगावा याचा जयजयकार कुसुमाग्रजांच्या प्रेरणादायी कृतीतून आढळतो. ‘मराठीच्या दुधाची साय’ खाणारे सुरेश भट यांनी आपल्या काव्यातून मराठी भाषेचा अभिमान बाळगण्यास वाचकाला उद्युक्त केले. महाराष्ट्राचा वैचारिक वारसा आपल्याला दुर्गाबाईंच्या साहित्यातून आढळतो तसेच मराठी भाषेचे लालित्य व सौंदर्य मंगेश पाडगावकर यांच्या कृतीतून आपल्याला दिसते. कामगारवर्गाचे चित्रण डाव्या विचारांनी व्यक्त होणारे साहित्य

विंदा करंदीकरांच्या काव्यातून आढळते. तसेच पंचावन्न ते साठसत्तर या काळातील गिरणगावातील भयावह चित्रण नारायण सुर्वे करताना आढळतात. मराठी भाषेतून गूढता व्यक्त करताना कवी ग्रेस आपल्या काव्याने वेगळीच उंची गाठतात. याच काळातील शहरी मध्यमवर्गीय माणसाचे, मराठी कुटुंबाचे भेदक चित्रण विजय तेंडुलकर आपल्या विविध नाटकांद्वारे करतात. पु. ल. देशपांडे यांचे साहित्य याच काळात बहरत होते आणि विनोदाची डूब असणारे त्यांचे साहित्य जनमानसावर संमोहिनी करून गेले. याच काळातील वंचितांच्या जाणिवा तीव्रपणे व्यक्त होऊ लागल्या, याचे प्रतिनिधित्व दया पवार आणि नामदेव ढसाळ हे करतात.

या निवडक पंधरा साहित्यिकांनी मराठी साहित्य-सरिता प्रवाहित ठेवत एकूण साहित्यविश्वाला अनमोल अशी देणगी दिली आहे. ह्या निवडक साहित्यिकांच्या साहित्यामुळे मराठी साहित्य विविध अंगांनी बहरले-फुलले. अभिजात अशी साहित्यपरंपरा त्यांच्या साहित्यामुळे अधिक सशक्तपणे प्रवाहित होत राहिली आहे.

ही पंधरा पुस्तके म्हणजे या साहित्यिकांची समीक्षा नव्हे तसेच त्यांचे चरित्रही नाही. त्यांच्या साहित्यातून त्यांची ओळख व्हावी आणि त्यांच्या साहित्याचा अभ्यास करावा, त्यांचे संपूर्ण साहित्य वाचावे ही प्रेरणा मिळावी या उद्देशाने सदर पुस्तके लिहिली गेली आहेत. मराठीच्या अभ्यासकापासून ते मराठी साहित्य वाचून आनंद घेणाऱ्या वाचकापर्यंत सर्वांना ही पुस्तके उपयुक्त ठरतील.

डॉ. सदानंद मोरे
अध्यक्ष
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

आजच्या समाजातील वंचित माणसासाठी झटणाऱ्या
मित्रवर्य भटू सावंत यांस...

# मनोगत

मराठी साहित्यिकांच्या मांदियाळीत, साहित्य-सरितेतील अण्णा भाऊंचे साहित्य हा महत्त्वाचा प्रवाह आहे. हा प्रवाह अजूनही आटलेला नाही. कारण आजही त्यांचे साहित्य वाचले जातेय, अभ्यासले जात आहे. तशा प्रकारे विषय आजच्या साहित्यातून प्रकट होत असताना दिसतात.

अशा अण्णा भाऊ साठेंसारख्या साहित्यिकांची ओळख तीसुद्धा थोडक्यात व्हावी असा प्रस्ताव घेऊन मी साहित्य संस्कृती मंडळाकडे गेलो. त्यांनी ह्या प्रस्तावाचे स्वागत केले. त्यांनी ह्या प्रकल्पाला मान्यता दिली. ह्या लेखनकामात प्रा. दिपेश करमरकर यांचे मोलाचे साहाय्य झाले. प्रा. अभिजित देशपांडे यांनी महत्त्वाचे मार्गदर्शन केले. दिनेश वाडेकर यांनी मुद्रिते तपासली, ऑलरिचचे अतुल जोशी यांनी सुरेख अक्षरजुळणी आणि मुखपृष्ठ व पृष्ठमांडणी केली; या सर्वांचे आभार.

ह्या लेखनास अण्णा भाऊ साठे यांचे स्वतःचे साहित्य, तसेच त्यांच्यावरील समीक्षा व अन्य साहित्य यांचा फार मोठा आधार लाभला. त्या सर्व साहित्यातील उतारे, उद्धृते, संपादित-संक्षिप्त स्वरूपात इथे घेतली आहेत. त्या सर्व लेखक, प्रकाशकांचे अत्यंत आभार.

साहित्य संस्कृती मंडळाचे तत्कालीन अध्यक्ष श्री. बाबा भांड, सचिव मीनाक्षी पाटील आणि मंडळाचे सदस्य यांचा मी आभारी आहे. हे पुस्तक सिद्ध होण्यासाठी ज्यांनी सर्व प्रकारचे सहकार्य केले त्यांचे मनापासून आभार.

❖❖❖

- संदर्भासाठी आणि लेखकाच्या साहित्याचा परिचय होण्यासाठी घेतलेले उतारे व वाक्ये त्यांच्या मूळ मजकूर बरहुकूम राखण्याचा प्रयत्न केला आहे.

# प्रास्ताविक

अण्णा भाऊ साठे हे एक आश्चर्य म्हणावे असे जीवन जगले. हमाल, बूटपॉलिशवाला, घरगडी, ऑफिसबॉय, कुत्र्यांना सांभाळणारा, खाणकामगार अशा हरतऱ्हेच्या कामाचे अनुभव घेत खडतर असे जीवन जगत असतानाच त्यांच्या मनात साहित्याचे बीज अंकुरले आणि पुढच्या जीवनात ते प्रकट होऊ लागले आणि तेही विपुल प्रमाणात.

तथाकथित मागासवर्गातील जन्म, वडिलांबरोबर आयुष्य काढायला मुंबईत भायखळा येथे एका चाळीत काही वर्षे. याच काळात त्यांचा संबंध विविध राजकीय पक्षांचे कार्यक्रम, मूक चित्रपट बघणे, विविध नेते-कार्यकर्ते अशांशी आला. त्यांच्यावर कम्युनिस्ट विचारसरणीचा आणि खास करून श्रीपाद डांगे यांच्या विचारांचा पगडा होता.

१९४५ ते जवळ पुढील दहा वर्षे त्यांच्या जीवनात स्थिरता आली. त्यांच्या साहित्यगुणांना पालवी फुटली व बघताबघता अण्णा भाऊ या साहित्यरूपी झाडाला अनेक फांद्या फुटल्या. त्यांच्या सर्वात गाजलेल्या साहित्यकृती म्हणजे ‘फकिरा’ आणि ‘रशियन प्रवासवर्णन’. तथापि अण्णा भाऊ साठे प्रसिद्ध पावले ते त्यांच्या शाहिरी काव्याने आणि म्हणूनच त्यांना शाहीर अशी पदवी आपोआपच प्राप्त झाली.

अण्णा भाऊ साठे लक्षात राहतात ते केवळ शाहीर म्हणून नाही तर संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील त्यांच्या प्रचंड योगदानामुळे. महाराष्ट्राचा मंगलकलश आपल्याला मिळाला याचे बरेचसे श्रेय अण्णा भाऊंना जाते. अण्णांच्या पोवाड्यांनी आणि लावण्यांनी महाराष्ट्र अक्षरशः दणाणून सोडला. कुठल्याही औपचारिक शिक्षणाचा वारा न लागलेला शाहीर होऊन उभ्या महाराष्ट्राला; अभिजन, बहुजन, अक्षरशः सर्वजनांना वेड लावतो कसा? हा प्रश्न त्याकाळी सर्वांना पडला होता आणि आजही

या प्रश्नांची नीट उकल झालेली नाही. इतकी विपुल रचना कशी काय त्यांना साध्य झाली आणि तीसुद्धा एकांगी न राहता. विलक्षण अशी सर्वसमावेशकता त्यांच्या एकूण साहित्यामध्ये दिसते, कारण मुळातच त्यांची दृष्टी ही सर्वात्मक होती. हे सर्व त्यांचे 'साहित्यिक शहाणपण' कसे काय आहे? काही त्यांची उपजत मनोवृत्ती आणि नंतरच्या जाणत्या वयाच्या काळापासून अनुभवांतून मिळवलेले ज्ञान; यामुळे त्यांच्या साहित्यात 'अक्षरतत्त्वाचे' आविष्कार आपल्याला दिसतात.

दया पवारांच्या 'बलुतं'वर पु. ल. देशपांडे यांनी महाराष्ट्र टाईम्सच्या पुरवणीच्या लेखातून आस्वादात्मक समीक्षा लिहिली आणि साठोत्तरीतला हा तथाकथित दलित प्रवाह मराठी साहित्यामधे अधोरेखित होऊ लागला. त्या प्रवाहाची सुरुवात अमर शेख, अण्णा भाऊ साठे आदि साहित्यिकांनी केली होती. अण्णा भाऊंची प्रेरणा एका बाजूने कम्युनिस्ट चळवळ जरी असली तरी डॉ. भीमराव आंबेडकरांच्या विचारांचा प्रभाव निश्चितपणे होता. 'जग बदल घालुनी घाव मज सांगुनी गेले भीमराव' तसेच छत्रपती शिवाजी महाराज आणि क्रांतिसूर्य भीमरायांच्या स्वाभिमानी हिंमतबाज लढ्याला अण्णा भाऊ साठे आपल्या कादंबरीतून केवळ वंदन करीत नाहीत तर त्यांना जनतेपुढे आणून सर्वांना प्रेरणा देतात.

आपली साहित्यविषयक भूमिका सांगताना ते म्हणतात, ''गाठी मारण्याचा आणि सोडण्याचा माझा काही परंपरागत धंदा नाही... अथक लढणाऱ्या कष्टकरांच्या संघर्षाचा भरपूर साठा आहे. त्यामुळे कथांचे पीळदार दोर मी वळत असतो.''

अण्णा भाऊ साठे विविध गुणांचा खजिना होते. अण्णा भाऊंनी मराठी चित्रपटांसाठी पटकथा लिहिल्याप्रमाणे अनेक कादंबऱ्या लिहिल्या होत्या. पुढे हे चित्रपट प्रचंड लोकप्रिय झाले. 'फकिरा' हे त्याचे उत्तम उदाहरण आहे. 'फकिरा' कादंबरीच्या अनेक आवृत्या निघाल्या, अजून निघतात- निघतील.

अण्णा भाऊंच्या काही कादंबऱ्या नायिका प्रधान आहेत... त्या रणसौदामिनी आहेत, प्रेमदामिनी आहेत. या काळातल्या लेखनातील एक प्रातिनिधिक नायिका या दृष्टीने अण्णा भाऊंची 'माझी मैना' या छक्कडमधील नायिका प्रत्यक्षात समजून घेण्यासारखी आहे.

*‘माझी गावावर राहिली मैना*
*माझ्या जीवाची होतीया दैना’*

स्त्री आणि तिचे जीवन, हा समग्र जीवन व्यवहाराचा एक भाग आहे. त्याचे भान कलावंत अण्णा भाऊंनी कधीही सोडलेले नाही. स्त्री मुक्तीचा सर्वंकष विचार ज्यांना खऱ्या अर्थाने समजून घ्यायचा आहे त्यांनी अण्णा भाऊंच्या नायिका समजून घ्याव्यात.

अण्णा भाऊंची वग नाट्ये अस्सल इथल्या मातीतील होती. लोकांचे रंजन करण्याबरोबरच वगनाट्याची रचना ही जोरकस होती. लोकांचे प्रबोधन करण्याबरोबरच कुरीतींचा विध्वंस करणारी प्रक्षोभ निर्माण करणारी अशी त्यांची भाषा होती. नवतेचे प्रयोग या सर्व वग नाट्यातून आपल्याला दिसतात. ‘लोकनाट्य’ या शब्दाचे जनक अण्णा भाऊ साठेच आहेत. लाखो कामगारांसमोर ‘माझी मुंबई’ हा वग त्यांनी सादर केला त्यावेळी त्यांनी स्टेजवरून जाहीर केले की, ‘‘मायबाप सरकारने तमाशावर बंदी आणली आहे. म्हणून आज आम्ही आपल्यासमोर ‘माझी मुंबई’ हे ‘लोकनाट्य’ सादर करीत आहोत.’’


अण्णा भाऊंची प्रवास वर्णनेही तितकीच उत्कट आणि मनोज्ञ आहेत. प्रवासात त्यांची नजर शोधक होती आणि त्या शोधक नजरेतून त्यांना दिसलेले रशिया आणि तेथील कम्युनिस्ट राजवट याचे प्रचितीपूर्ण प्रतिबिंब या प्रवासवर्णनात आपल्याला दिसते.

अण्णा भाऊंचे चित्रपट, त्यांची वगनाट्ये हे त्या काळचे त्यांच्या साहित्यातील प्रतिबिंब जरी असले तरी त्यातील विचार विश्व हे निश्चितपणे महत्त्वाचे आहे. मराठी साहित्यात मोलाची भर घालणारे असे हे साहित्य आहे.

अण्णा भाऊ साठे त्यांचे जीवन, त्यांचे कार्य आणि त्यांनी निर्मिलेले साहित्य आजही संवेदनशील मनाला, वाचकाला प्रेरणा देते. हे आपल्याला पुढील पानातील संक्षिप्तपणे घेतलेल्या आढाव्यातून कळते.

❖❖❖

# परिचय



अण्णा भाऊ साठे हे प्रसिद्ध शाहीर, कथाकार, कादंबरीकार, नाटककार होते. त्यांचे जन्मस्थान कुरुंदवाड या संस्थानातील वाटेगाव, तालुका वाळवे व जिल्हा सांगली.

अण्णा भाऊंचे घराणे सुमारे दीडशे वर्षांपूर्वी वाटेगाव या गावी स्थायिक झाले. इ. स. १८१८ ते १८७२ या काळात त्यांचे पणजोबा 'राघोबा' वाटेगावात राहत होते. त्यांना १८४१ मध्ये मुलगा झाला. त्याचे नाव 'सिंधोजी'. ते १८९९ पर्यंत जिवंत होते. १८८२ मध्ये सिंधोजींना मुलगा झाला. त्याचे नाव भाऊ. हेच अण्णांचे वडील, अण्णांच्या आईचे नाव 'वालूबाई'. त्या तळसंदे, तालुका हातकणंगले, जिल्हा कोल्हापूर येथील होत्या. अण्णा कामा मांग यांच्या त्या कन्या. वालूबाईंचे आजोळ मांगरूळ, पेटा शिराळा, जिल्हा सांगली हे होते. वालूबाई व भाऊ साठे यांचे १९१२ मध्ये लग्न झाले. त्यांना पाच

मुले झाली. १९१८ मध्ये पहिली मुलगी झाली– नाव भागूबाई, १ ऑगस्ट १९२० मध्ये दुसरा मुलगा झाला– नाव अण्णा भाऊ साठे. मूळ नाव तुकाराम भाऊ साठे, १९२२ला तिसरा मुलगा झाला त्याचे नाव शंकर. बालपणीच त्याचा मृत्यू झाला, १९२५ला चौथ्यांदा मुलगा झाला. त्याचे नाव शंकर ठेवले गेले. तेच शंकर अण्णा भाऊ नंतर शंकर भाऊ साठे 'कादंबरीकार' म्हणून लिहिते झाले. पाचवी कन्या झाली- तिचे नाव जाईबाई. अण्णा भाऊ साठे कुटुंबात क्रमाने दुसरे. पण मुलगा म्हणून ते पहिलेच. साठेंची वंशावळ खालीलप्रमाणे सांगता येईल.

- राघोबा साठे - १८१८ ते १८७२ (पणजोबा)
- सिंधोजी राघोबा साठे - १८४१ ते १८९९ (आजोबा)
- भाऊ सिंधोजी साठे - १८८२ ते १९३९ (वडील)
- सौ. वालूबाई साठे - १८९६ ते १९५६ (आई)
- तुकाराम ऊर्फ अण्णा साठे - १९२० ते १९६९
- भागूबाई - १९१८
- जाईबाई - १९६९
- मधुकर - १९४२

याचा अर्थ १८१८ ते १९६९ अशी जवळपास दीडशे वर्षांहून अधिक अण्णा भाऊ साठे यांची कुलपरंपरा दिसते. अण्णा भाऊंचा मुलगा मधुकर भाऊ, शंकर भाऊ साठे (जानेवारी १९९६मध्ये त्यांचे निधन झाले.)

१ ऑगस्ट १९२० रोजी अण्णा भाऊंचा जन्म मांग कुटुंबात झाला. भाऊराव व वालूबाई या दाम्पत्याने जन्मलेल्या मुलाचे नाव तुकाराम ठेवले असले तरीही सर्व जण प्रेमाने त्यांना 'अण्णा' असेच म्हणत. भाऊंच्या घरातील मोठे लोक तसेच त्यांची आईदेखील दोर वळण्याच्या कामाला जात असत. पोटापाण्यासाठी त्यांचे वडील मुंबईत राहत असत. त्यामुळे लहान भावंडांना सांभाळण्याची जबाबदारी तुकारामांवर म्हणजेच अण्णा भाऊंवर होती. त्यांच्या वडिलांनी मुंबईत उच्चभ्रू आणि उच्चशिक्षित समाज पाहिल्याने आपल्या मुलांनीदेखील शिकले पाहिजे, साक्षर झाले पाहिजे, नोकरी-व्यवसायाला लागले पाहिजे अशी त्यांची विचारधारणा होती. मुलांनी शिक्षण घ्यावे ही त्यांची इच्छा असल्याने त्यांच्या आग्रहामुळेच

> ◆ *वाढलेले वय आणि सदोष शिक्षणपद्धती यांमुळे अण्णा फार दिवस शाळेत गेलेच नाहीत.* ◆

वयाच्या १४व्या वर्षी अण्णांनी प्राथमिक शिक्षणाला सुरुवात केली. परंतु त्या काळात मागास जातींतील मुलांसाठी वेगळ्या शाळा होत्या. त्या मुलांशी शिक्षकांचे वर्तनही निर्दयीपणाचे होते. वाढलेले वय आणि सदोष शिक्षणपद्धती यांमुळे अण्णा फार दिवस शाळेत गेलेच नाहीत.

लहानपणापासूनच त्यांना विविध छंद होते. मैदानी खेळ खेळण्याचा त्यांचा पिढीजात वारसा असल्याने दांडपट्टा चालवण्यात त्यांचा हात धरणारा कोणी दुसरा नव्हताच. याशिवाय जंगलात एकटे भटकणे, पोहणे, मासेमारी करणे, शिकार करणे, विविध पक्ष्यांशी मैत्री करणे, जंगलातील पानाफुलांमधील सूक्ष्म फरक शोधणे असे एक ना अनेक छंद त्यांना होते. या छंदांमध्ये निरागसपणे बागडण्यातच त्यांचे बालपण गेले. मोठे होत असताना त्यांच्या आवडींमध्ये वाढच होत होती. पुढे लोकगीते पाठ करून ती टिपेच्या आवाजात म्हणणे, पोवाडे व लावण्या पाठ करणे, इतरांना त्या आत्मीयतेने म्हणून दाखवणे या छंदांमुळे त्यांच्याभोवती नेहमीच मित्र-मंडळी जमलेली असत.

रेठऱ्याच्या जत्रेत अण्णा भाऊंनी क्रांतिसिंह नाना पाटील यांचे भाषण ऐकले. त्याचा परिणाम असा झाला की, ते स्वातंत्र्य चळवळीत सहभागी होऊ लागले. चळवळीत सामील होऊन लोकनाट्यांत छोटी-मोठी कामे त्यांनी केली. याच काळात दुष्काळ पडल्याने अण्णांच्या वडिलांनी आपल्या कुटुंबाला मुंबईत न्यायचे ठरवले. त्याच वेळी अण्णा भाऊंचे बालपण संपले. वयाच्या ११व्या वर्षी अण्णा आपल्या आई-वडिलांबरोबर मुंबईत आले. हे कुटुंब भायखळ्याच्या चांदबीबी चाळीत राहायला गेले. त्या काळी मुंबईत स्वस्ताई असल्याने सुरुवातीचा काळ सुखाचा गेला. मुंबईत फिरताना अण्णा दोन गोष्टींकडे फारच आकर्षिले गेले. एक म्हणजे विविध राजकीय संघटना आणि दुसरे म्हणजे मूक चित्रपट.

विविध राजकीय संघटनांचे ध्येय ब्रिटिशांना हाकलून देणे हेच होते. परंतु प्रत्येकाची विचारसरणी वेगळी होती. यांपैकी अण्णा कम्युनिस्ट विचारसरणीचे अनुयायी बनले. पक्षांच्या सभांचे आयोजन करणे,

वॉलपेंटिंग करणे, हॅन्डबिले वाटणे, मोर्चे काढणे, छोट्या-मोठ्या सभेसमोर गोष्टी सांगणे, पोवाडे व लोकगीते म्हणून दाखवणे या सर्व गोष्टींमुळे कम्युनिस्ट वर्तुळात ते सर्वांना एकदम हवेहवेसे झाले. याच वेळी त्यांच्या 'तुकाराम' या नावाचे 'अण्णा' या नावात रूपांतर झाले.

मुंबईत पोटापाण्याचा प्रश्न भागवण्यासाठी अण्णांनी भरपूर मेहनत केली. वणवण भटकत असताना हमाल, बूटपॉलिशवाला, घरगडी, हॉटेलबॉय, कोळसेवाहक, डोअरकीपर, कुत्र्याला सांभाळणारा, मुलांना खेळवणारा, उधारी वसूल करणारा, खाणकामगार, ड्रेसिंगबॉय अशी विविध प्रकारची कामे केली. यावरून त्यांच्या कष्टमय जीवनाची कल्पना आपल्याला येते. याच काळात त्यांना सिनेमा पाहण्याचा छंद लागला. या छंदानेच त्यांना साक्षर बनवले. चित्रपटांच्या पाट्या, रस्त्यावरील दुकानांच्या बोर्डावरील अक्षरे जुळवीत ते साक्षर झाले. या अक्षरओळखी नंतरच त्यांना वाचनाची प्रचंड आवड निर्माण झाली. वयाच्या १७-१८व्या वर्षी संपूर्ण कुटुंबाची जबाबदारी अण्णांवर आली होती. गिरणीकामगार म्हणून त्यांच्या जीवनाला सुरुवात झाली होती. परंतु कोहिनूर मिलमधील नोकरी सुटल्याने त्यांच्यावर मोठेच संकट आले. या वेळी पुन्हा साठे कुटुंब वाटेगावला निघाले. मुंबईतील धकाधकीचे जीवन, मोर्चे, सभा, आंदोलने, सत्याग्रह या सर्व गोष्टी पाहिलेल्या अण्णा भाऊंना वाटेगावमध्ये राहणे शक्य होत नव्हते. अत्यंत बेकार अवस्थेत त्यांनी घर सोडले आणि त्यांच्याच नातेवाईकांच्या तमाशाच्या फडात ते सामील झाले.

अण्णा भाऊंचा धारदार आवाज, त्यांचे पाठांतर, पेटी, तबला, ढोलकी, बुलबुल, तरंग ही वाद्ये वाजवण्याची कला या गुणांमुळे त्यांचे तमाशात स्वागतच झाले. महाराष्ट्राच्या तमाशा या कलेच्या परंपरेत मातंग या समाजाने जी वैशिष्ट्यपूर्ण भर घातली ती शाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या महत्त्वपूर्ण अशा सहभागानेच!

वाटेगावच्या काटेरी निवडुंगात तग धरून उभ्या असलेल्या मातंग वस्तीत अण्णा भाऊंचे बालपण अत्यंत हलाखीत गेले. त्यांच्या घरी २० गुंठे वडिलोपार्जित जमीन होती. या जमिनीत कुटुंबाचा उदरनिर्वाह होईल इतपत धान्य पिकत नव्हते. त्यामुळे नेहमीच त्यांची उपासमार होत असे. त्यातच सातारा, सांगली भाग म्हणजे 'फकिरा'च्या बंडाने पेटलेला. हा

*लोकगीते पाठ करून ती टिपेच्या आवाजात म्हणणे, पोवाडे व लावण्या पाठ करणे, इतरांना त्या आत्मीयतेने म्हणून दाखवणे या छंदांमुळे त्यांच्याभोवती नेहमीच मित्र-मंडळी जमलेली असत.*

फकिराही मातंग कुळातला आणि अण्णांच्या नात्यातला. त्याच्या बंडाने ब्रिटिश सत्तेला व सरंजामदारांना सतत हादरे देण्यास सुरुवात केली. त्यातच विविध गुन्ह्यांत गुन्हेगार म्हणून मातंगांची नोंद केलेली. त्याच वेळी १९२५ मध्ये गुन्हेगार जमातीच्या वसाहतीचा कायदाही झाला. तेव्हा कोठेही काहीही घडले, तरी मातंगांच्याच घराची झडती घेतली जात असे. अण्णा भाऊंचे कुटुंबही वाढलेले. त्यामुळे बरेचदा उपासमार होत असे. स्वाभिमानाने व प्रामाणिकपणे जगणाऱ्या भाऊ साठे यांना वाटेगावात आपले जीवन सुरक्षित वाटत नव्हते. त्यांना तिथल्या जीवनाचा उबक आला म्हणून ते गाव सोडून मुंबईला निघून गेले. मुळातच शेतीच्या कामाचा पिंड असल्याने भाऊरावांनी मुंबईनगरीत धनिकांच्या ब्रिटिश अधिकाऱ्यांच्या बागेत श्रम करून त्यांच्या बागा फुलवल्या. बागेत कामाच्या निमित्ताने उच्चभ्रू, उच्चवर्णीय, उच्चविद्याविभूषित समाज त्यांनी जवळून पाहिला. त्यांच्या निसर्गवेड्या कसदार मनाच्या भूमीत आपलीही मुले, माणसे यांच्याप्रमाणे राहावीत, शिकावीत, मोठी व्हावीत अशी स्वप्ने उराशी बाळगली. सुरुवातीला भाऊराव साठे एकटेच मुंबईला गेले. तेव्हा वाटेगावला वालूबाई मुलासह राहून मिळेल तो कामधंदा करून आणि कधी मनीऑर्डर आली म्हणजे आनंदाला सोबत घेऊन संसाराचा गाडा पुढे ढकलत होती. प्रत्येक पत्रातून मुलांना शाळेत घालण्याबाबत भाऊंची प्रेरणा होती. त्यावेळची शिक्षणपद्धत व समाजातील जातविषमता अण्णांना पटत नव्हती. काही केल्या त्यांचे मन त्या चार भिंतींच्या व गैरवर्तवणूक करणाऱ्या शिक्षकांच्या शाळेत त्यांचे मन लागत नव्हते. म्हणून ते शाळेत गेले ते केवळ दीडच दिवस. इतका त्रास, मानहानी सहन करूनही अण्णा भाऊ साठे हे साक्षर बनले व आपल्या समाजासमोर एक लोकशाहीर म्हणून नावारूपास आले.

## अण्णा भाऊंचा व्यासंग

अण्णा भाऊंना फारच थोडा काळ कौटुंबिक स्वास्थ्य लाभले. याच काळात त्यांची लावणी गतिशील झाली. मुळातच मानवतेवर साठेंनी अनेक पुस्तके वाचली. आपल्या आर्थिक कुवतीनुसार छोटेसे ग्रंथालय राहत्या घरातच उभे केले. संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, नामदेव, महात्मा फुले, विठ्ठल रामजी शिंदे, सूर्यकांत त्रिपाठी, हरिवंशराय बच्चन, खलील जिब्रान, गॉर्की, जॉयकाव्हॉस्की, टॉलस्टॉय, हरिभाऊ आपटे, श्री. म. माटे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, वि. स. खांडेकर, ना. सी. फडके अशा अनेक पौर्वात्य, पाश्चात्त्य प्रतिभावंतांच्या अभिजात कलाकृती वाचून काढल्या. काही कलाकृती, अवघड पुस्तके इतरांकडून समजावून घेतली. त्यांची प्रतिभा आणि विचार आणखी प्रगल्भ होत गेले.

१९४५ ते १९५५ हा अण्णा भाऊंच्या स्थैर्याचा काळ होता. त्याचा फायदा घेऊन त्यांनी वाङ्मयीन भूमिका पार पाडली. प्रचंड वाचन, चिंतन, अनुभव आणि निरीक्षणातून ऐतिहासिक व अजरामर कलाकृती तयार झाल्या. त्यांनी तळागाळातील माणूस बघितला. त्यालाच आपल्या कलाकृतीत नायक केले. याच माणसांच्या जीवनावर साहित्य निर्माण करण्यास अण्णा भाऊंना गती लाभली.

भारतीय समाजव्यवस्थेत व मराठी साहित्यात तळागाळातला तो माणूस आजवर कधीच साहित्याचा विषय बनू शकला नव्हता. तो अण्णा भाऊंच्या साहित्यातून सरस्वतीच्या दरबारात नायक म्हणून उभा राहिला. साहित्याचा विषय झाला. अण्णा भाऊंनी जे जे बघितले, जे जे सोसले तेच त्यांनी लेखणीतून उभे केले. ज्या गावात, जंगलात, माळरानात बालपण गेले त्याच भागातील माणसे त्यांच्या साहित्यातून पुढे आली. या भागातील काही माणसे गुन्हेगार होती. स्वाभिमानी आहेत. त्यांना गुन्हेगार बनवणाऱ्या समाजव्यवस्थेच्या मर्मावर घाव घातला.

## कार्य व लेखन

घरात परिस्थिती हलाखीची असल्याने तसेच पोटाची आग विझवण्यासाठी पडेल ते काम करीत असताना भांडवलदारांच्या आणि गरिबांच्या मुंबईचे दर्शन त्यांनी घेतले. तिथे त्यांनी कामगारांचे संप,

◆ *रेठऱ्याच्या जत्रेत त्यांनी क्रांतिसिंह नाना पाटील यांचे भाषण ऐकले. त्याचा परिणाम अण्णा भाऊंवर झाला आणि ते स्वातंत्र्य चळवळीत सहभागी होऊ लागले.* ◆

आंदोलने, मोर्चे अगदी जवळून पाहिले. १९३६ मध्ये कॉ. श्रीपाद डांगे यांच्या विचारांच्या प्रभावामुळे कम्युनिस्ट पार्टीत अण्णा भाऊंनी प्रवेश घेतला होता. के. एस. श्रीपाद डांगे यांनी अण्णा भाऊ साठे यांच्या जीवनाचे पदर जवळून पाहिले होते.

चित्रपट पाहणे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, बॅरिस्टर जिना, महात्मा गांधी, सेनापती बापट, सावरकर इत्यादी नेत्यांची कणखर व बेधडक अशी भाषणे ऐकणे यांतूनच त्यांचे लिहिणे सुरू झाले.

१९३७ साली पहिलावहिला पोवाडा लिहिला तो म्हणजे मच्छरावर; तर दुसरा 'स्टॅलिनग्राडचा पोवाडा' लिहिला. लगेच येणाऱ्या दुसऱ्या वर्षात त्यांनी 'स्पेनचा पोवाडा' लिहिला (१९३८). हळूहळू अण्णा पार्टीप्रचारांची धुरा सांभाळू लागले. परंतु वडिलांच्या निधनामुळे संपूर्ण कुटुंबाच्या पालनपोषणाची जबाबदारी त्यांच्यावर पडली. त्यातच त्यांची कोहिनूर मिलमधील नोकरीही सुटली. त्यामुळे वाटेगावी परत येऊन बापू साठे यांच्या तमाशात अण्णांनी प्रवेश केला. त्याचप्रमाणे जनजागृतीच्या उद्दिष्टाने संपूर्ण महाराष्ट्राचा दौरा आणि शाहिरी वाङ्मयाद्वारे प्रचार सुरू केला.

पुढे १९४२ सालच्या 'चले जाव' या आंदोलनात बर्डे गुरुजींसोबत त्यांनी सहभाग केला. सरकारने पकडवॉरंट काढल्याने भ्रमंती करीत मुंबईकडे त्यांनी कूच केले. कम्युनिस्ट पक्षासाठी पूर्ण वेळ प्रचारक म्हणून ते नावाजले जाऊ लागले. लेखक तसेच शाहीर म्हणूनही त्यांना मान्यता प्राप्त झाली.

१९४३ साली 'स्टॅलिनग्राडचा पोवाडा' 'पार्टी' मासिकात प्रसिद्ध झाला. पुढे त्यांनी १९४४ साली 'लाल बावटा' कलापथकाची स्थापना केली. लोकयुद्ध साप्ताहिकाचे ते वार्ताहर झाले. हळूहळू त्यांनी लोकनाट्ये लिहिण्यास सुरुवात केली. 'अकलेची गोष्ट', 'माझी मुंबई', 'खापऱ्या चोर' अशा लोकनाट्यांचे लेखन त्यांनी केले.




**'चित्रा' कादंबरीचे कव्हर**


अण्णा भाऊ साठे यांची 'चित्रा' ही पहिली कादंबरी होय (१९४५). त्यानंतर 'आग', 'अहंकार', 'आवडी', 'गुऱ्हाळ' इत्यादी प्रसिद्ध अशा कादंबऱ्यांचे लेखन त्यांनी केले. १९५० ते ५६ पर्यंतच्या काळात त्यांच्या लेखनाचा जोम इतका वाढला की, वर्षाला दोन किंवा तीन कादंबऱ्यांचे, तसेच अनेक कथांचे लेखन प्रकाशित होऊ लागले. मुंबई सरकारने 'लाल बावटा' पथकावर बंदी घातल्याने तमाशाचे लोकनाट्यात रूपांतर करण्याचे काम त्यांनी केले. या दरम्यानच्या काळात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचा तसेच त्यांच्या कार्याचा खोलवर प्रभाव भाऊंच्या मनावर झाला. 'जग बदल घालुनी घाव । सांगूनि गेले मज भीमराव' हे त्यांचे गाजलेले गीत.

संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यात शाहीर अमर शेख, गव्हाणकर यांच्यासोबत भाऊंनी आपल्या जिवाचे रान केले. १९५८ साली 'इनामदार' या नाटकाचा दिल्लीत प्रयोग झाला, त्याच वर्षी मुंबईला 'महाराष्ट्र दलित संमेलना'चे उद्घाटन त्यांनी केले. १९५९ मध्ये 'फकिरा' या कादंबरीचे लेखन व प्रकाशन झाले. त्या नंतर लगेच तिच्यावर चित्रपटही निघाला. त्यासाठी महाराष्ट्र राज्याने पारितोषिक देऊन अण्णा भाऊंचा गौरवही केला. १९६१ साली रशियाच्या इंडो सोव्हिएत कल्चरल सोसायटीच्या निमंत्रणावरून त्यांनी रशियाला प्रयाण केले. १२ सप्टेंबर १९६१ साली त्यांनी रशियाला भेट दिली. ताश्कंद, लेनिनग्राड, मास्को, बाको, स्टॅलिनग्राड इत्यादी शहरांना त्यांनी भेटी दिल्या.

१९६२ ते १९६८ या काळात अण्णा भाऊंच्या जीवनाला उतरती कळा लागली. कलापथक बंद पडले. स्नेही दुरावू लागले. पक्षातही अवहेलना सुरू झाली. त्यानंतर अण्णा भाऊ एकाकी पडले. शासनातर्फे मिळालेल्या अत्यल्प साहाय्याच्या मदतीने जगत आणि लिहीत राहिले.

***मुंबईत फिरताना अण्णा दोन गोष्टींकडे फारच आकर्षिले गेले. एक म्हणजे विविध राजकीय संघटना आणि दुसरे म्हणजे मूक चित्रपट.***

अण्णा भाऊ साठे यांनी ३५ कादंबऱ्या, ८ पटकथा, ३ नाटके, एक प्रवासवर्णन, १३ कथासंग्रह, १४ लोकनाट्ये, १० प्रसिद्ध पोवाडे व १२ उपहासात्मक लेख लिहिले.





अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यातील विश्लेषण व विषयांची-आशयांची मांडणी अतिशय मर्मभेदी आहे. त्या मांडणीतून त्यांची तर्कशुद्धता व जीवनमूल्याविषयीचा दुर्दम्य आत्मविश्वास दिसून येतो.

अण्णा भाऊंचे लेखन, कामगारांविषयी असो, उपेक्षितांविषयी असो की समाजातल्या खालच्या पातळीवरच्या वर्गासाठी असो, त्यांची आस्था व चिंतन हे कुठल्याही एका जातीपुरते मर्यादित न राहता सर्व दलित, उपेक्षित व कष्टकरी वर्गासाठीच असते. अण्णा नुसतेच लेखक राहिले नाहीत, तर त्यांनी १९४२चे आंदोलन, स्वतंत्र महाराष्ट्र मुक्तिचा लढा व गोवामुक्ती आंदोलन यात सहभागी होऊन महाराष्ट्र मुक्ती लढ्याला मोठे योगदान दिले. त्यांनी समाजामध्ये प्रबोधन घडवण्याचे कार्य केले. लोकांना सतत प्रेरणा देऊन त्यांचा आत्मविश्वास बळकट केला. गुलामगिरीच्या अवघड बेड्या फेकण्यास सतत प्रेरणा देऊन जनसामान्यात आत्मविश्वास व सामर्थ्य निर्माण करण्याचे कार्य त्यांनी जिद्दीने केले. अण्णा भाऊंचे हे वैचारिक व संघटनात्मक कार्य महाराष्ट्राच्या इतिहासात अजोड आहे. ऐतिहासिकदृष्ट्याही ते महत्त्वाचे आहे. म्हणूनच त्यांच्या या कार्याची नोंद इतिहासकारांना घ्यावीच लागेल.

‘विद्या-प्रज्ञा-करुणा-शील व मैत्री या पंच तत्त्वांनुसार प्रत्येकाने

◆ *याच काळात त्यांना सिनेमा पाहण्याचा छंद लागला. या छंदानेच त्यांना साक्षर बनविले. चित्रपटांच्या पाट्या, रस्त्यावरील दुकानांच्या बोर्डावरील अक्षरे जुळवीत ते साक्षर झाले. या अक्षरओळखी नंतरच त्यांना वाचनाची प्रचंड आवड निर्माण झाली.* ◆

आपले चारित्र्य घडवत ज्ञानाला करुणेची व मैत्रीच्या भावनेची जोड द्यावयास पाहिजे व सत्शील होण्यासाठी निःस्वार्थी, न्यायप्रेमी व्यापक मनोवृत्ती बदलली पाहिजे,' हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे वैचारिक मत होते. म्हणूनच त्यांनी आपल्या चौफेर लिखाणातून सर्व उपेक्षित घटकांच्या उद्धाराचा कृतिशील विचार लेखणीतून उभा केला आहे. मानवी मनाच्या दुःखाचा समग्र वेध घेण्याची क्षमता व दूरदृष्टी त्यांना लाभली होती. म्हणूनच ते म्हणतात- ''ही पृथ्वी शेषाच्या मस्तकावर तरलेली नसून ती कामगारांच्या तळहातावर तरलेली आहे.'' या विचारांतून त्यांचं द्रष्टेपण आणि श्रमिकांविषयीचा आदर व आत्मविश्वास जाणवतो.





अण्णा भाऊंना कामगार, भटक्या जाती-जमाती आणि स्वाभिमानी बाण्यांच्या कष्टकरी स्त्रिया यांच्या जीवनाबद्दल केवळ आदर नव्हता, तर तेच त्यांच्या लेखनातील प्रमुख नायक होते. त्यांनी पैसा, मान, कीर्ती, सत्ता अशा भौतिक सुखाच्या गोष्टींना कधीच जवळ केले नाही. त्यांच्यात तत्त्वज्ञानी लेखनाचे द्रष्टेपण आहे. त्यांचे लिखाण बुद्धिनिष्ठ व तर्कशुद्ध आहे.

अण्णा भाऊ यांच्या प्रतिभेतून निर्माण झालेल्या कलाकृती म्हणजेच कथासंग्रह, पोवाडे, कादंबऱ्या, लावण्या, लोकनाट्ये इत्यादी ही सर्व राष्ट्राची




संपत्ती असून मराठी साहित्याला लाभलेली फार मोठी देणगी आहे. अण्णा भाऊंचे साहित्य हे मराठी साहित्याला वैचारिक अधिष्ठान देणारे आहे. त्यांच्या पुस्तकांचे भारतातल्या सर्व प्रमुख भाषा व जगातील काही प्रमुख भाषा. उदा.- इंग्रजी, जर्मन, रशियन, क्वीबन, झेक, पोलिश अशा विविध २७ प्रमुख भाषांत अनुवाद झालेले आहेत. ही बाब महाराष्ट्राला व मराठी साहित्याला निश्चितच भूषणास्पद व आदर्शदायी आहे.




बंगालचा दुष्काळ, तेलंगण संग्राम, पंजाब-दिल्लीचा पोवाडा, अंमळनेरचे हुतात्मे, काळ्या बाजाराचा पोवाडा, 'माझी मैना' हा संयुक्त महाराष्ट्र चळवळीवरील 'छक्कड', कामगार चळवळीवरील 'एकजुटीचा नेता' ते हिटलरच्या फॅसिझम विरोधात 'स्टॅलिनग्राडचा पोवाडा', 'बर्लिन पोवाडा', चिनी क्रांतीवरील 'चिनी जनांची मुक्तिसेना' हे गौरवगान आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांवरील गाजलेले 'जग बदल घालुनी घाव सांगुनी गेले मज भीमराव' हे गाणे - अशी अनेक गाणी, कवने, पोवाडे अण्णा भाऊ साठे यांनी रचले. त्यांनी आपल्या गाण्यांतून तसेच पोवाड्यांतून अनेक सामाजिक, राजकीय प्रश्नांना राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय समस्यांना वाचा फोडण्याचे महान कार्य केले आहे.

❖❖❖


# क्रांतिकारक अण्णा भाऊ साठे


एक कलाकार म्हणून तसेच समाजातील एक सर्वसामान्य कार्यकर्ता म्हणूनही अण्णा प्रत्येक उपक्रमात, आंदोलनात सहभागी होत असत. भारतीय स्वातंत्र्य चळवळीसह संयुक्त महाराष्ट्र चळवळीत, तसेच गोवा मुक्तिसंग्रामाच्या वेळीही अण्णांनी जनजागृतीचे प्रचंड काम केले. 'चले जाव चळवळी'च्या काळात वाटेगावातही बर्डे गुरुजींच्या नेतृत्वाखाली अनेक घडामोडी सुरू होत्या. अण्णा भाऊ त्यात सामील असल्याने त्यांच्यावर वॉरंट निघाले. परिणामी त्यांना घर कायमचे सोडावे लागले. पुढे त्यांना तत्त्वज्ञानाची, विचारांची एक दिशा मिळत गेली आणि त्यांनी कम्युनिस्ट पक्षाचे पूर्णवेळ काम करायला सुरुवात केली. पक्षकार्यासाठी झोकून दिलेले असतानाच १९४४ साली त्यांनी 'लाल बावटा' या कला पथकाची स्थापना केली होती. त्यावेळी त्यांच्यासोबत शाहीर अमर शेख व शाहीर गव्हाणकर हेदेखील होते. या माध्यमातूनच त्यांच्या लिखाणाला सुरुवात झाली. लावण्या, पोवाडे, पथनाट्ये म्हणजेच त्यांच्या ललित साहित्याची पूर्वतयारी होती. त्यांनी एकूण सुमारे १५ वगनाट्ये लिहिली, त्यातून त्यांना प्रसिद्धीही मिळाली.

१९४५च्या दरम्यान मुंबईत अण्णांच्या आयुष्याला काहीशी स्थिरता लाभली. लोकयुद्ध साप्ताहिकात वार्ताहराचे काम करीत असताना त्यांनी 'अकलेची गोष्ट', 'खापऱ्या चोर', 'माझी मुंबई' अशी गाजलेली लोकनाट्ये लिहिली. याकाळातच त्यांनी संत साहित्याबरोबर अन्य अनेक प्रतिभावंतांच्या अभिजात कलाकृती वाचून काढल्या. वैचारिक आणि कलाविषयक वाचनाने समृद्ध लेखक व्हायला त्यांना मदत झाली. अण्णा भाऊ साठे यांच्या लेखक म्हणून यशाचे रहस्य म्हणजे त्यांनी नेहमी सामान्य वाचकाच्या मनाची व्यथा स्पष्टपणे मांडली. सामान्य वाचकालाच प्रमाण मानल्याने वस्तुनिष्ठ असलेले त्यांचे साहित्य वाचकांच्या गळ्यातील ताईत बनले.

◆ ***अण्णा भाऊंचा धारदार आवाज, त्यांचे पाठांतर, पेटी, तबला, ढोलकी, बुलबुल ही वाद्ये वाजवण्याची कला या गुणांमुळे त्यांचे तमाशात स्वागतच झाले.*** ◆

इ.स. १९५० ते १९६२ हा त्यांचा साहित्य क्षेत्रातील सुवर्णकाळ होता. याच काळात त्यांच्या पुस्तकांच्या अनेक आवृत्त्या निघाल्या. प्रचंड यशस्वी होत असताना त्यांचे स्वतःचे वैयक्तिक जीवन मात्र धकाधकीचे होत होते. मुंबई सरकारने 'लाल बावटा' या कला पथकावर बंदी घातली होती. पुढे तमाशावरही बंदी आली. तमाशातील सर्व कलाकारांचे संसार देशोधडीला लागले. त्यामुळे अण्णांनी उत्तम युक्ती केली. त्यांनी तमाशाचे लोकनाट्यात रूपांतर करून तमाशा कलेचा उद्धार केला. तमाशाला लोकनाट्याचे वैभव मिळवून दिल्याने सरकारची बंदी कुचकामी ठरली. या सुवर्णकाळातच त्यांनी 'वैजयंता', 'माकडीचा माळ', 'चिखलातील कमळ', 'वारणेचा वाघ', 'फकिरा' अशा अनेक कादंबऱ्या लिहिल्या. अण्णा भाऊंनी ३००च्या वर कथा लिहिल्या. 'खुळंवाडी', 'बरबाद्या कंजारी', 'कृष्णाकाठच्या कथा' असे त्यांचे कथासंग्रहही प्रसिद्ध आहेत. त्यांनी 'स्टॅलिनग्राडचा पोवाडा', 'महाराष्ट्राची परंपरा' याबरोबरच






◆ *प्रचंड वाचन, चिंतन, अनुभव आणि निरीक्षणातून ऐतिहासिक व अजरामर कलाकृती तयार झाल्या. त्यांनी तळागाळातील माणूस बघितला. त्यालाच आपल्या कलाकृतीत नायक केले.* ◆

'मुंबईचा कामगार' असे पोवाडेही लिहिले. 'निवडणुकीत घोटाळे', 'दुष्काळात तेरावा', 'अकलेची गोष्ट' ही त्यांची वगनाट्ये प्रसिद्ध आहेत. दोनशे-अडीचशे गाणी, लावण्या त्यांनी लिहिल्या आहेत. कामगारांमध्ये त्यांची गाणी आणि लावण्या लोकप्रिय होत्या.

मराठीतील ग्रामीण, प्रादेशिक, दलित साहित्यावर अण्णा भाऊंचे प्रभुत्व होते. अण्णा भाऊंच्या साहित्याचे हिंदी, गुजराती, उडिया, बंगाली, तमीळ, मल्याळी या भारतीय भाषांबरोबरच रशियन, झेक, पोलिश, इंग्रजी, फ्रेंच अशा जगातील २७ भाषांमध्ये भाषांतर झाले आहे. लेखणीचे हत्यार बनवून त्यांनी पुरोगामी, विज्ञाननिष्ठ, स्त्रीवादी, लढाऊ आविष्काराचा दीपस्तंभ मराठी साहित्याच्या क्षेत्रात प्रखरपणे, खंबीरपणे उभा केला. त्यांच्या एवढ्या मोठ्या कर्तृत्वामुळे त्यांना प्रसिद्धी मिळत होती. अण्णांच्या १२ कथांवर चित्रपटदेखील प्रसिद्ध झाले; परंतु एवढे साहित्य प्रसिद्ध झाले, तरी त्यांचे दारिद्र्य संपले नाही. लक्ष्मी त्यांना प्रसन्न नव्हती. ते मितभाषी असल्याने व्यावहारिक बाबतीत लोकांनी त्यांचा गैरफायदा घेतला. परंतु चित्रपट सृष्टीतील भालजी पेंढारकर, सूर्यकांत मांढरे, जयश्री गडकर, सुलोचना यांसारख्या दिग्गज कलाकारांनी अण्णांवर भरपूर प्रेम केले.

हिंदी चित्रपट सृष्टीतही त्यांना अनेक कलावंतांचे प्रेम, माया, जिव्हाळा या गोष्टी लाभल्या. राज कपूर, शंकर, शैलेंद्र, बलराज सहानी, गुरुदत्त, उत्पल दत्त या कलाकारांचे अण्णांवर प्रेम होते. ऑलेगसारखे रशियन कलावंतही अण्णा भाऊंचे मित्र होते.

अण्णा भाऊ साठे जेव्हा मुंबईच्या 'माटुंगा लेबर कॅम्प' या दलित-शोषितांच्या वस्तीत कम्युनिस्ट चळवळीत कार्य करू लागले तेव्हा खऱ्या अर्थाने त्यांचे विचार क्रांतिकारक होऊ लागले. तत्कालीन लेबर कॅम्पमधील प्रमुख कम्युनिस्ट नेते/कार्यकर्ते आर. बी. मोरे, के. एम.

साळवी, शंकर नारायण पगारे यांच्यासोबत ते कम्युनिस्ट पक्षाचे काम करू लागले. मार्क्सवादी विचारांच्या अभ्यासवर्गाला हजेरी लावू लागले. याच लेबर कॅम्पमध्ये ते पुन्हा धुळाक्षरे गिरवू लागले व लिहावयास लागले. त्यांनी त्यांचे पहिले गाणे लेबर कॅम्पमधील मच्छरावर लिहिले. याच लेबर कॅम्पमध्ये अण्णा भाऊ साठे, शाहीर अमर शेख व शाहीर द. ना. गव्हाणकर या त्रयींनी कम्युनिस्ट पक्षाच्या मार्गदर्शनाखाली 'लाल बावटा' कलापथकाची १९४४ साली स्थापना केली आणि क्रांतिकारक शाहिरीचा बुलंद आवाज महाराष्ट्रभर नव्हे तर देशभर पसरला.

अण्णा भाऊंसारखा लेखक प्रारंभी कम्युनिस्ट पक्षाच्या मुखपत्रांमधून वार्ताहर, कथाकार, गीतकार म्हणून लेखन करू लागला. कम्युनिस्ट पक्षाच्या व विचारांशी संबंधित स. ह. मोडकांच्या लोकसाहित्य प्रकाशनाने व वा. वि. भटांच्या अभिनव प्रकाशनाने प्रथम अण्णा भाऊंच्या कादंबऱ्या, कथासंग्रह, नवे तमाशे इत्यादी नाट्यसंग्रह प्रकाशित करून जनमानसात नेण्याचे भरीव काम केले आहे. अण्णा भाऊंच्या 'शाहीर' या पुस्तकास ज्येष्ठ कम्युनिस्ट नेते एस. ए. डांगे यांनी विस्तृत अशी प्रस्तावना लिहून त्यांचा गौरव केला आहे. अण्णा भाऊंच्या नाटकाचा हिंदी प्रयोग करण्यातही कम्युनिस्ट पक्षाशी संबंधित 'इंडियन पीपल्स थिएटर असोसिएशन' (इप्टा) या संस्थेचे सुप्रसिद्ध सिनेअभिनेते कॉ. बलराज साहनी यांनी पुढाकार घेतला व त्या नाटकात अभिनेते ए. के. हंगल यांनी महत्त्वाची भूमिका केली होती. नंतर अण्णा भाऊंना 'इप्टा'चे अखिल भारतीय अध्यक्षपदही मिळाले. ज्यात भारतभरातील सुप्रसिद्ध लेखक-कलावंत, विचारवंत त्यांच्यासोबत कार्यरत होते. अण्णा भाऊंच्या 'फकिरा' कादंबरीवरील चित्रपट निर्मितीसही 'इप्टा'च्या कलावंतांचे मोलाचे सहकार्य लाभले.

❖❖❖

# अण्णा भाऊंच्या कादंबऱ्या

'फकिरा'मध्ये भीषण दुष्काळाच्या काळात ब्रिटिशांचे खजिने, धान्य लुटून गरिबांना, दलितांना वाटप करणाऱ्या फकिरा या मांग समाजातील लढाऊ तरुणाचे चित्रण आहे. 'वैजयंता' कादंबरीत प्रथमच तमाशात काम करणाऱ्या कलावंत स्त्रियांच्या शोषणाचे चित्रण केले आहे. 'माकडीचा माळ' ही भटक्या-विमुक्त समाजाच्या जीवनपद्धतीचे अतिशय सूक्ष्म चित्रण करणारी भारतीय साहित्यातील पहिली कादंबरी आहे.

## वैजयंता

'वैजयंता' ही अण्णा भाऊ साठे यांची नावाजलेली कादंबरी आहे. अण्णा भाऊ यांच्या साहित्याचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांचे लेखन हे वास्तव जगताचे प्रतिनिधित्व करणारे आहे. समाजातील हेच वास्तव अण्णा भाऊ यांनी 'वैजयंता' कादंबरीतून समाजासमोर मांडलेले आहे. या कादंबरीतील नायिका ही तमाशात काम करणारी स्त्री आहे. तमाशा ही कला समाजात बदनाम झालेली कला समजण्यात आलेली आहे. त्यामुळे आपोआपच या क्षेत्रात काम करणाऱ्या स्त्रियांकडेदेखील बदनाम अथवा व्यभिचारी स्त्रिया म्हणून पाहण्यात येते. त्यांच्या व्यवसायाला जातीच्या अस्तित्वाचे पदर असल्यामुळे त्यांच्याकडे बघण्याचा समाजाचा दृष्टिकोन तसाच हिणकस असल्याचे दिसते.

## फकिरा

अण्णा भाऊ साठे यांच्या 'फकिरा' या कादंबरीला मराठी साहित्यात 'मानाचे पान' लाभले आहे. मराठी कादंबरीच्या वाटचालीत एक महत्त्वाचा टप्पा म्हणजे अण्णा भाऊंची 'फकिरा' ही कादंबरी! अण्णा भाऊ जे लिहितात ते त्यांनी भोगलेले असते. ज्यांच्याविषयी ते लिहितात ती सारी

◆ *अण्णा भाऊ साठे यांनी ३५ कादंबऱ्या, ८ पटकथा, ३ नाटके, एक प्रवासवर्णन, १३ कथासंग्रह, १४ लोकनाट्ये, १० प्रसिद्ध पोवाडे व १२ उपहासात्मक लेख लिहिले.* ◆

त्यांची माणसे असतात. फकिरा, राधा, विष्णुपंत इत्यादी सर्व व्यक्ती अण्णा भाऊंच्या साक्षात परिवारातल्या आहेत. तळागाळातील उपेक्षित, वंचित माणसे आणि त्यांची सुखदुःखे चित्रित करण्यात अण्णा भाऊ रंगून गेलेले. त्यांच्या कथा-कादंबऱ्यांतून जगण्यासाठी लढणाऱ्यांच्या शौर्यगाथा वाचायला मिळतात. ही माणसे अन्यायाविरुद्ध लढतात. सतत झुंजतात आणि प्रसंगी प्राणार्पणही करतात. त्यांची मानवी मूल्यांवरील श्रद्धा ढळत नाही. इंग्रजी सत्तेला आव्हान देणारा फकिरा आणि त्याची शौर्यगाथा सांगताना अण्णा भाऊंसारखा लोक शाहीर या उपेक्षित माणसाची तेजस्वी प्रतिमा सादर करतात. 'कलादृष्ट्या श्रेष्ठ' ठरलेल्या या कादंबरीला महाराष्ट्र शासनाने पुरस्कार देऊन तर गौरवलेच; पण फकिराचे




भारतीय भाषांबरोबरच रशियन, झेक, पोलिश, जर्मन या भाषांतही अनुवाद झाले आहेत. 'फकिरा'सारख्या झुंजार माणसाची कथा डॉ. आंबेडकर यांच्या झुंजार लेखणीला अण्णा भाऊंनी अर्पण केली यात केवढे औचित्य आहे!

## अण्णा भाऊ साठे यांच्या कादंबऱ्यांतील वर्गकलह

कोणताही कलावंत शेवटी विशिष्ट समाजव्यवस्थेचं अपत्य असतो. त्या व्यवस्थेच्या भौतिक घटकांना त्याची जाणीव व नेणीव प्रभावित झालेली असते आणि विशिष्ट तत्त्वज्ञानाच्या संस्कारामुळे प्रभावित झालेली प्रतिभा

कलेचा विचार जीवनाच्या संदर्भात करीत असते. माणसाचा महान शोध घेण्यासाठी माणसाच्या दुःखाचा ठाव घेत तो दुःखमुक्त कसा होईल व त्याला माणूस म्हणून कसे जगता येईल हा विचार नुसत्या राजकीय चळवळींनीच करावयाचा नसतो. तर जनतेच्या पक्षपाती कलावंतालासुद्धा आपली कला जोपासताना हा विचार करावाच लागतो.

अण्णा भाऊ दक्षिण महाराष्ट्रातील ज्या वारणा खोऱ्यात वाटेगावला जन्मले त्या वारणा खोऱ्यातील वाटमारी करणाऱ्या दरोडेखोरांपासून तमाशातील नर्तकीपर्यंत व गावच्या पाटलांपासून रामोशी, दरवेशी, माकडवाल्या, भटक्यापर्यंत जो माणुसकीचा झरा वारणा खोऱ्यात वाहत होता त्यातील काही पाणी आपल्या कथा-कादंबऱ्यांद्वारे मराठी रसिकतेला अण्णा भाऊंनी पाजले. ३५ कादंबऱ्या लिहूनही अण्णा भाऊंचा हा झरा आटला नाही. ते अजून काही काळ जगले असते किंवा शब्दांची ओळख मुंबईत येण्यापूर्वीच वाटेगावला त्यांना पुरेशी झाली असती तर कष्टकऱ्यांच्या या लाडक्या कलावंतांकडून कादंबऱ्यांचा महापूर मराठी मातीवर वाहिला गेला असता.

### अण्णा भाऊंच्या कथा

अण्णा भाऊंनी आपल्या अनेक कथांमधून सामाजिक-राजकीय-धार्मिक, कौटुंबिक समस्यांना तोंड फोडले. स्वतंत्र बाण्याच्या बंडखोर नायिका व तळाच्या जात-वर्गातील लढाऊ नायक त्यांनी निर्माण केले.

'उपकाराची फेड' या कथेत भारतीय समाजातील जातीय उतरंडीमुळे चांभार-मांग समाजातही कशी श्रेष्ठ-कनिष्ठ भावना वाढीस लागते याचे चित्रण पाहायला मिळते. 'कोंबडीचोर'मध्ये स्वातंत्र्य मिळाल्यानंतरही दारिद्र्य, उपासमार शिल्लक राहिल्याने गरिबीमुळे सामान्य माणूस कसा चोरी करण्यास प्रवृत्त होतो याचे हृदयद्रावक चित्रण आहे. 'गजाआड' या कथासंग्रहातील अनेक कथा त्यांना या तुरुंगात कैदी भेटले त्यांच्यातील संवेदनशील माणसांवरील असाहाय्यतेचे दर्शन घडवतात.

'चिरागनगरची भुतं' या संग्रहातील कथांत अण्णा भाऊंनी त्यांच्या आयुष्यातील काही वर्षे मुंबईच्या घाटकोपरमधील चिरागनगरच्या ज्या झोपडपट्टीत घालवली तेथील गरिबी, व्यसनी, व्यभिचारी, चोऱ्यामाऱ्या

◆ *एक कलाकार म्हणून तसेच समाजातील एक सर्वसामान्य कार्यकर्ता म्हणूनही अण्णा प्रत्येक उपक्रमात, आंदोलनात सहभागी होत असत.* ◆

करणाऱ्या, गुंड, मवाली, उपेक्षित, भटक्या माणसांचे जगणे आणि त्यांचा जीवनसंघर्ष आढळतो.

'जिवंत काडतूस' या कथेत अण्णा भाऊ साठे भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील त्यांच्या मित्राच्या कर्तृत्वावर प्रकाश टाकतात. 'बंडवाला' या कथेत जमीनदाराच्या अन्यायाविरुद्ध लढणारा मांग समाजातील तरुण आहे. 'बरबाद्या कंजारी' या कथेत मुंबईच्या झोपडपट्टीतील भटक्या समाजाची दयनीय अवस्था व जात पंचायतीच्या अमानुष प्रथांचे दर्शन घडते. या जात पंचायतीला आव्हान देऊन बरबाद्या व त्यांची मुलगी कशी बंडखोरी करतात याचे चित्रण आहे.

'मरीआईचा गाडा' या कथेत अंधश्रद्धेला आव्हान देण्याचे काम या कथेतील नाना नावाचे पात्र करते. 'रामोशी' या कथेत यदू रामोशी हा जमीनदाराच्या अन्यायाविरुद्ध आणि भ्रष्ट सरकारी यंत्रणेविरुद्ध कसा संघर्ष करतो याचे चित्रण आहे. 'वळण', 'सापळा' या कथांमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली चळवळीमुळे दलित अस्पृश्य समाजात जे नवे आत्मभान आले त्याचे चित्रण आढळते.

## साहित्य संमेलने

अण्णा भाऊ साठे यांच्या नावाने अनेक साहित्य संमेलने होतात आणि अनेक पुरस्कारही दिले जातात.

उदा. अण्णा भाऊ साठे साहित्य संमेलन, लोकशाहीर अण्णा भाऊ साठे साहित्य संमेलन, अण्णा भाऊ साठे विचार साहित्य संमेलन, राज्यस्तरीय अण्णा भाऊ साहित्य संमेलन किंवा साहित्यिक अण्णा भाऊ साहित्य संमेलन वगैरे वगैरे...

अण्णा भाऊ साठे अस्पृश्य व उपेक्षित अशा मातंग जातीत जन्माला आले. अस्पृश्य मानल्या जाणाऱ्या समाजावर कित्येक वर्षे, शतके स्पृश्य व सवर्ण समाजाने छळ व अत्याचार केले. अण्णा भाऊंना या छळाची

व अत्याचाराची झळ पावलोपावली सोसावी लागली. परंतु या छळातून, उपेक्षेतून अण्णा भाऊ होरपळून न निघता तावून सुलाखूनच बाहेर पडले. मराठी सारस्वतांत सत्यशोधक, प्रतिभावंत, लोकशाहीर तथा लोकलेखक म्हणून त्यांनी महत्त्वाचे स्थान प्राप्त केले आहे. हे सत्य असले, तरी आजही अण्णा भाऊंचा समाज मागासलेपणाच्या यातना भोगतच आहे. हे विसरून चालणार नाही.

## अण्णा भाऊ साठे यांचे शाहिरी विश्व...

अण्णा भाऊ वयाच्या अवघ्या एकोणपन्नासाव्या वर्षी निधन पावले. अवघी पन्नाशीसुद्धा त्यांना आपल्या जीवनाची पुरी करता आली नाही. त्यापूर्वी १३ जून १९६९ रोजी आचार्य अत्रे निवर्तले आणि अण्णा भाऊ साठे हे १८ जुलै १९६९ला. अन्यायाविरुद्ध ठासून पेटणारी महाराष्ट्राची मुलुखमैदान तोफ थंड पडली होती आणि अत्रे, अण्णा भाऊ यांच्या पाठोपाठ २९ ऑगस्ट १९६९ रोजी शाहीर अमर शेख यांना अपघाती मरण प्राप्त झालं होतं. या तीन 'अ'नी संयुक्त महाराष्ट्राची अस्मिता चेतवली होती. तिच्यात प्राणतत्त्व भरले होते. केवळ आपल्या लेखणीने आणि वाणीने कम्युनिस्ट पक्षाचे मुंबईतील मुखपत्र 'युगांतर' आणि त्या पत्राचा प्रतिभावंत व प्रखर बाण्याचा संपादक श्रीकांत लाड यांच्या संपादकत्वाखाली शाहीर अण्णा भाऊ व शाहीर अमर शेख यांच्या स्मृतीस श्रद्धांजली वाहणारा 'युगांतर'चा विशेष अंक ३० नोव्हेंबर १९६९ला प्रकाशित झाला. या अंकात अण्णा भाऊ साठे यांच्या जीवनाशी संलग्न असणाऱ्या मान्यवरांचे महत्त्वाचे व ऐतिहासिक तोलामोलाचे लेख आहेत. अण्णा, अमर यांची स्मृती अमर करणारा हा 'युगांतर'चा अंक एक मौलिक दस्तऐवज आहे.

'युगांतर' स्मृती विशेषांकातील अण्णा भाऊंवर 'अक्षर साहित्य लिहिणारा एक निरक्षर' या शीर्षकाखाली लिहिलेल्या आपल्या लेखात श्रीकृष्ण पोवळे लिहितात– 'अण्णा भाऊंकडे दोन गोष्टी होत्या. पहिली महत्त्वाची, 'लहान मुलासारखं अगदी निरागस मन.' कवीला, लेखकाला अर्थात ते असते, त्याची प्रथम आवश्यकता. अण्णा भाऊ शेवटच्या घडीपर्यंत मुलांसारखेच निरागस होते. तो बाणा त्यांनी कधी सोडलाच

◆ *अण्णा भाऊंच्या साहित्याचे हिंदी, गुजराती, उडिया, बंगाली, तमीळ, मल्याळी या भारतीय भाषांबरोबरच रशियन, झेक, पोलिश, इंग्रजी, फ्रेंच अशा जगातील २७ भाषांमध्ये भाषांतर झाले आहे.* ◆

नाही. पण काव्यात्मकता आणि व्यवहार यांचं काही सख्य नाही. त्यांना ती काव्यात्म वृत्ती लेखनाला उपयोगी पडली, पण व्यवहारात लायकी लक्षाधीशाची असून भिक्षा मागावी लागली. होय, मी माझ्या डोळ्यांसमोर व्यवहार पाहिले आहेत. ज्या कादंबरीची किंमत हजार-आठशे व्हावी, ती त्यांनी माझ्यासमोर दोनशे रुपयांना विकली होती. त्यातले रोख शंभर मिळाले आणि पुढच्याचं काय झालं कोण जाणे आणि पुढची गंमत म्हणजे त्यातील वीस-पंचवीस आम्हीच दोघांनी खर्च केले. कसं होणार सांगा!' आपल्या लेखाचा शेवट करताना श्रीकृष्ण पोवळे लिहितात, ''अण्णा भाऊंनी लिहिलं ते स्वतःच्या जीवनात त्यांनी पाहिलं, अनुभवलं तेच त्यांनी लिहिलं. त्यांनी भाषांतरे केली नाहीत. कारण ते त्यांना शक्य नव्हतं. मराठी भाषेखेरीज दुसरी भाषाच त्यांना येत नव्हती. अण्णा भाऊंनी विपुल लेखन केलं. अण्णा भाऊंनी जीवनाचं सत्त्व आपल्या सगळ्या अशुद्ध, पण रसाळ भाषेत मराठी वाचकाला आपल्या ओंजळीने भरभरून दिलं आहे. शतकं जातील, पण अण्णा भाऊंचं नाव काही मराठी वाङ्मयातून जाणार नाही.''

याच अंकात आपल्या मृत्युपूर्वी तीनच दिवस अगोदर लिहिलेल्या 'शाहिरी सरताज हरपला' या आपल्या लेखात अण्णा भाऊंचे परम निकटवर्ती शाहीर अमर शेख लिहितात–

''शाहीर अण्णा भाऊ साठे गेले. प्रथम विश्वासच बसला नाही. पण ते शेवटी सत्य ठरले. अण्णा भाऊ गेले. महाराष्ट्राच्या शाहिरी परंपरेला ललामभूत करून गेले. त्यांनी मराठी लोककलेचा मंच विश्वासानं गाजवून त्याला साज लौकिकाचा चढविला. पोवाडा, लावणी, लोकनाट्य (वग) याच नव्हे, तर लघुकथा व कादंबऱ्यांतही त्यांनी दिग्विजय गाजवला. तसे शाहीर कमी का प्रसविले मराठी माउलीने. अण्णा भाऊंचे वैशिष्ट्य काय आहे हे अजून बुद्धिजीवी वर्गापर्यंत पोहचले नसले, तरी अवघ्या

महाराष्ट्रातील सामान्यांचा समाज अण्णा भाऊंचे पोवाडे, लावण्या नि वग यांनी प्रथम प्रभावित झाला. मी प्रथम त्यांना ओळखले ते पोवाडेकार शाहीर म्हणून. तसे पाहता आद्य शाहीर अगीनदास तुळसीदासापासून, सगनभाऊ ते आजच्या अनेक शाहिरापर्यंत पोवाडेकार झाले. मग अण्णा भाऊंनी यात काय वेगळेपण दाखवले?... शाहिरी जीवन हा महाराष्ट्राला दिलेला अमोल नजराणा अण्णा भाऊंनी सार्थकी लावला. पोवाड्यातून नुसती वर्णनं करून वाडवडिलांनी केलेल्या कहाण्या पद्यरूपी ऐकवणे हे शाहिरांचे काम नाही, तर शाहिरानं जनमन सागरात सर्वभर संचार करून नव्हे, तर त्याच्या तळाचा ठाव घेऊन त्यात चाललेल्या भावनोद्रेकांचा आविष्कार आपल्या लेखणीच्या लालित्यपूर्ण ढंगाने व्यक्त करून, अथवा जनमानस हेलावूनच नव्हे तर त्या सागराच्या कणाकणाला ऊब देऊन, त्याच्या लाटांवर आरूढ होऊन गगनालाही गवसणी घालावी, तोच मराठी शाहीर. ही उक्ती सार्थ करणारे अण्णा भाऊ हे एकमेव शाहीर होते.''

पोवाडा हे काव्य सहजसाध्य नाही. त्यातही कमी-अधिक असतं. खरा 'पोवाडा' तसा बैठकीशिवाय, अभ्यासाशिवाय, चिंतनाशिवाय जमत नाही. त्याचीही एक लय आहे. तंद्री आहे. पण तेवढंच नाही तर त्या शाहिराची प्रतिभा व त्याच्या मर्दानगीपणाही त्यात आहे. बाणा पण आहे. हे बोलून शाहीर अमर शेख पुढे लिहितात–

''अण्णा भाऊंजवळ हे सर्व तर होतंच, पण अन्यायाची चीडही होती. गुलामगिरीविरुद्ध लढण्याची खुमखुमी होती. दुःख, दैन्य, दारिद्र्य यांचा नाश करू इच्छिणाऱ्या शुद्धरूप गोळ्यांचे कोठारच्या कोठार होतं आणि त्यांच्या मानवतावादाच्या तलवारीला समाजवादी शास्त्रीय पद्धतीनं चढलेली धार होती. म्हणून त्यांचा पोवाडा जनमानसात नुसता 'रवंथ' करण्यासाठी जात नसे, तर ठिणग्या-ठिणग्यांनी रान उठवीत असे. त्यांच्या मानवतावादाला समाजवादाची शास्त्रशुद्ध धार होती. म्हणूनच जन्माला येताच डोळे किलकिले करून जगाकडे बघताच स्पेनमधील फ्रँकोच्या फॅसिझमविरोधी स्पॅनिश जनतेचा लढा, हा मानवी न्याय्य हक्कासाठी सनातन गुलामगिरीच्या विरुद्ध चाललेला लढा, असा त्या काळच्या नवतरुण अण्णा भाऊ नामे कामगाराला वाटला व त्याने 'स्पेनच्या स्वातंत्र्याचा पोवाडा' लिहिला. अण्णा भाऊ हे हाडाचे कम्युनिस्ट, अन्

◆ *अण्णा भाऊ साठे यांचे लेखक म्हणून यशाचे रहस्य म्हणजे त्यांनी नेहमी सामान्य वाचकाच्या मनाची व्यथा स्पष्टपणे मांडली.* ◆

कम्युनिस्ट कवी म्हटला की, त्याची सर्वथैव प्रचारकी त्यात 'खरे काव्य नसलेली' असा शिक्का त्या काव्याचं वाचन, परिशीलन न करताही दिला जातो. पण उत्तम कला प्रचारकी असतेच आणि उत्तम प्रचार हा कलात्मकच असतो. हे सत्य आहे. त्या दृष्टीने पूर्वीच्या शाहिराचे पोवाडे व शाहीर अण्णा भाऊंचे पोवाडे अभ्यासणे योग्य होईल. पण त्यामुळे आपली मते चुकीची होती असा शिक्का मिळेल म्हणून काही शहाणे विचार करणार नाहीत. पण हा तोकडेपणा आता महाराष्ट्रात बराच कमी झाला आहे. म्हणूनच एकेकाळचा अवमानित, उपेक्षित कलावंत आज 'शाहीर अण्णा भाऊ साठे' हे नाव घेऊन उच्चभ्रू समाजापुढे मराठी साहित्य संमेलनाच्या व्यासपीठापर्यंत कित्येकदा जाऊन पोहोचला तर कित्येकदा त्यानं आपल्या दलित समाजाच्या कर्मकहाण्या सांगून, त्याच्याकडून मानाचे पानही मिळवले. पण त्यांच्या शाहिरी प्रतिभेची अजूनपर्यंत कधीच पावती त्यांना मिळाली नव्हती हे खरं. खरं म्हणजे पोवाडा ही कलासुद्धा मराठी साहित्याला भूषविणारी एक कला आहे. मराठी साहित्याचाच एक भाग विभाग आहे. ही जाणीव असूनही मराठी साहित्यात ती काडीमात्रही रुजली गेली नाही. इतकेच नव्हे तर तिच्याविषयी साधी दखलही घेतली जात नाही ही दुर्दैवाची गोष्ट आहे.''

अण्णा भाऊ साठे हाडाचे शाहीर होते. अण्णा भाऊंचे पोवाडे, लावण्या, गाणी यांचा संग्रह असलेल्या 'शाहीर' या पुस्तकाला 'जनतेची कदर करणारा लोककवी' या शीर्षकाखाली लिहिलेल्या आपल्या प्रस्तावनेत डॉ. सदा कऱ्हाडे म्हणतात–

''अण्णा भाऊ साठे यांचा प्रकृतिपिंडच शाहिरी बाण्याचा होता. मराठी शाहिरी वाङ्मयात त्यांनी तुफानी संचार केला. लोकजागृती, प्रचारकार्य आणि समूहशक्तीला आवाहन ही शाहिरी वाङ्मयाची उद्दिष्टे असतात. एका अर्थी लोकरंजनाबरोबर लोकशिक्षण हे शाहिरीचे अंतिम साध्य असते. म्हणूनच शाहिरी वाङ्मय हे लोककलेचे एक पारंपरिक स्वरूप

आहे. त्यात नृत्य, नाट्य आणि संगीत या तिन्हींचा अंतर्भाव झालेला असतो. पोवाडे, लावण्या, वीररसात्मक उद्बोधक गीते आणि तमाशा हे रचना प्रकार त्यात असतात.''

''शाहीर द. ना. गव्हाणकर उपरिनिर्दिष्ट 'युगांतर' (३०-११-६९) मधील 'तमाशा क्षेत्रात अपूर्व क्रांती घडविणारा शाहीर' या आपल्या लेखात लिहितात, ''गेली पंचवीस वर्षे महाराष्ट्राच्या कष्टकरी, दलित जनतेला त्यांच्यातील माणुसकीची, लढाऊवृत्तीची, खिलाडूपणाची आणि त्यांच्यातील उणिवांचीही सतत जाणीव करून देणारे अण्णा भाऊंचे खेळकर नवे तमाशे महाराष्ट्राला पुन्हा पाहायला कसे मिळणार? अण्णा भाऊंनी रंगमंचावर स्वतः साकार केलेला 'अकलेच्या गोष्टीतील' बेरकी बंडा गवळी, 'बेकायदेशीर' शेठजीचे 'इलेक्शन' या वर्गातील वर्ग जागृत कामगार धोंडी, 'दे. भ. घोटाळे'मधील आडदांड हैबती पाटील, 'खापऱ्या चोरा'तील बिलंदर खापऱ्या चोर, 'काई चालना गा' मधला हमदू यापुढे मराठी माणसाला कसा दिसणार?

महाराष्ट्रातील तमाशा कलेच्या परंपरेचा प्रारंभापासून अद्ययावत् मागोवा घेत शाहीर गव्हाणकर म्हणतात, ''पहिले महायुद्ध व दुसरे महायुद्ध या दरम्यानच्या काळात जीवनाच्या सर्वच क्षेत्रांत अपूर्व उलथापालथ झाली. सारा मानवसमाज घुसळून निघाला. सामाजिक, राजकीय, धार्मिक, सांस्कृतिक क्षेत्रांत झंझावाती विचारमंथन सुरू झाले. सनातनी आणि सुधारक, मवाळ आणि जहाल, परंपरावादी आणि नवमतवादी यांच्यातील संघर्ष अगदी कळसाला पोहोचला. परस्परांवरील हल्ले-प्रतिहल्ले अनेक वर्षे चालू राहिले. हा संघर्ष म्हणजे जिवंतपणाचे, प्रगतीचे लक्षण होय हेही विचारवंतांनी मान्य केले. परंतु या सर्व वादंगाचा, संघर्षाचा परिणाम ग्रामीण भागात फारच अल्प झाला. बहुसंख्य शेतकऱ्यांप्रमाणेच त्यांचे कलाकार, शाहीर तमासगीर जेथे होते तेथेच राहिले. त्यांची अधोगतीच झाली... तमाशाची कला सडतच गेली. तमासगिरांची संपूर्ण वाताहत झाली. ते ग्रामीण विभागात जेमतेम तग धरून राहण्याचा प्रयत्न करीत होते. काही शहरात येऊन कंत्राटदारांच्या मेहरबानीने थिएटरमध्ये संगीत बाऱ्या लावीत होते. दौलतजादा स्वीकारीत होते आणि पोटाची खळगी भरण्यासाठी परिस्थितीपुढे अगतिक होऊन आपल्या कलेला

◆ *त्यांनी संत साहित्याबरोबर अन्य अनेक प्रतिभावंतांच्या अभिजात कलाकृती वाचून काढल्या. वैचारिक आणि कलाविषयक वाचनाने समृद्ध लेखक व्हायला त्यांना मदत झाली.* ◆

बाजारबसवीचे स्वरूप देत होते आणि तमाशांना व तमासगिरांना अशी शोचनीय स्थिती प्राप्त झाली असताना अण्णा भाऊ आपले नवे तमाशे घेऊन शाहीर अमर शेख व मी यांच्यासहित मैदानात उतरले. अण्णा भाऊंचा पहिला वग 'अकलेची गोष्ट' १९४४ मध्ये लिहिला गेला. त्यापूर्वी मी 'बंड्या दिवाण' व 'मुंबईचा कामगार' हे दोन तमाशे लिहून त्याचे काही प्रयोग केले होते. या 'अकलेच्या गोष्टी'चे प्रयोग महाराष्ट्रात आत्तापर्यंत हजारोंनी झाले आहेत. लक्षावधी मराठी माणसांनी हे प्रयोग पाहून त्यांची गोडी अनुभवलेली आहे.''

शाहीर अण्णा भाऊंच्या तमाशाबद्दल पुढे लिहिताना शाहीर गव्हाणकर म्हणतात, ''अण्णा भाऊंनी बहुतेक सर्वच तमाशे कोणत्या न् कोणत्या प्रचारमोहिमेची गरज म्हणून लिहिले. बेकायदेशीर, शेठजीचे इलेक्शन, लोकमंत्री, निवडणुकीत घोटाळे, माझी मुंबई, पुढारी मिळाला. दे. भ. घोटाळे, खापऱ्या चोर, पेंग्याचं लग्न, दुष्काळात तेरावा इत्यादी तमाशे कामगार, शेतकरी चळवळीने, कम्युनिस्ट पक्षाने वा संयुक्त महाराष्ट्र समितीने वेळोवेळी हाती घेतलेल्या मोहिमेतील एक प्रचाराचे साधन म्हणूनच रचले गेले. ते सर्व थरातील जनतेला आवडले. अण्णा भाऊंच्या तमाशांनी इच्छित कार्य प्रभावीरीतीने पार पाडले.'' असे असले, तरी परंपरागत तमाशा तंत्रात अण्णा भाऊंनी का व कसा बदल केला हे विशद करताना शाहीर द. ना. गव्हाणकर लिहितात, ''अण्णा भाऊंनी तमाशाचे तंत्र परंपरागत चालत आलेलेच वापरले असले, तरी त्यांना जो नवा मंत्र (आशय) लोकांपुढे मांडायचा होता तो जास्तीत जास्त प्रभावी करण्यासाठी अनेक वेळा जुन्या तंत्राला मुरड घालावी लागली. तमाशाचे तंत्र (form) मुळातच लवचीक. नाटकाप्रमाणे सेट उभे करण्यासाठी गरज नाही. काळ, स्थळ, पात्रे, तर्कशुद्धता याबाबतीत बंधने कमी...'' अण्णा भाऊंनी तमाशात हजरजबाबी कलाकाराला जे

खूप स्वातंत्र्य असते आणि शीघ्रकवित्वालाही बराच वाव असतो त्याचा लाभ घेऊन त्यांनी स्वतः आत्मसात केलेल्या तमाशाच्या मुक्त तंत्राचा आपल्या लिखाणात भरपूर उपयोग करून घेतला. हे सांगून शाहीर गव्हाणकर लिहितात, ''अण्णा भाऊंनी आपल्या तमाशात शृंगाररसाला फाटा दिला, पण विनोदाला मात्र अग्रस्थान दिले. त्यांच्या तमाशाचा पिंडच मुळात राजकीय, उत्तान, हीनदर्जाचा, शृंगार वा शब्दाचे लैंगिक विश्लेषण काढून निर्माण केलेला वाह्यात विनोद अण्णा भाऊंच्या तमाशात कुठेच सापडणार नाही. त्यांच्या विनोदाचा भर राजकीय वा सामाजिक उपहासावर, विडंबनावर. अण्णा भाऊंची अस्सल ग्रामीण भाषा मुळातच अलंकारिक. सहज काही बोलायचं झालं, तरी ते खटकेबाज बोलायचे आणि ज्यावेळी भांडवलशाही सत्ताधाऱ्यांची किंवा ढोंगी देशभक्तांची टर उडवायची असेल त्यावेळी तर त्यांच्या भाषेला भलतीच धार चढायची. एखाद्या मगरचंद शेठजीचं वर्णन –

*''शुभ्र टोपी शिरी ।*
*जादूगारीण खरी ।*
*नजरबंदीची जादू ही करणार ।।*
अशा समर्पक शब्दांत ते करतील.''

शाहीर अण्णा भाऊ साठे यांनी तमाशाला लोकनाट्याचे रूप दिले. 'फोक ड्रामा' (Folk drama) सारखे इंग्रजी शब्द माहीत नसतानाही उत्स्फूर्त असा आपल्या शाहिरीला आणि तमाशाला त्यांनी अगदी समर्पक व कालोचित जनतानिष्ठ 'लोकनाट्य' हे बिरुद अर्थपूर्णतेने लावले व तो शब्दप्रयोग अमर केला. अण्णा, अमर आणि गव्हाणकर या आधुनिक शाहीर त्रिमूर्तीने तो श्रमिक, कामकरी, दलित, शोषित व पीडित जनतेकडे नेला. 'युगांतर' विशेषांकाला लिहिलेल्या आपल्या संपादकीयात श्रीकांत लाड त्याबद्दल पुढील विधान ठासून करतात. ते लिहितात–

''पाव शतकापूर्वी मराठी मातीत 'लोकनाट्य' हा शब्द प्रथम अण्णा भाऊंनीच पेरला. आता त्या वडाला अनेक पारंब्या फुटल्या आहेत. अण्णा भाऊ 'मराठी लोकनाट्याचे जनक' होते.'' याच संदर्भात 'दीपस्तंभ कलंडला' यापूर्वीच्या माझ्या या लेखात उल्लेखिलेल्या आपल्या लेखात कवी नारायण सुर्वे लिहितात– ''अण्णांनी तमाशाकडे पाहण्याचा अवघा

◆ *मराठी सारस्वतांत सत्यशोधक, प्रतिभावंत, लोकशाहीर तथा लोकलेखक म्हणून त्यांनी महत्त्वाचे स्थान प्राप्त केले आहे.* ◆

दृष्टिकोनच बदलला. नाच्याला त्यांनी काट दिली. शृंगार उडवला. तमाशाचा ढाचा बदलला. त्याला नवे विषय दिले. नवा आविष्कार दिला. पूर्वीचे पारंपरिक अध्यात्म, पौराणिकता, आख्यानवजा स्वरूप... सर्व काही बदलले. अण्णा भाऊंच्या 'मुंबई कुणाची' या वगात मालक, 'अरे धोंड्या' अशी हाक मारतो. धोंडी तात्काळ 'मालक, धोंड्या नव्हं... ड ला ई डी म्हणा - धोंडी- ही दुरुस्ती सुचवतो. अण्णा भाऊंच्या लेखणीने इतके धैर्य मराठी कामगाराला आणि तळाच्या समाजाला दिले. हा प्रचंड बदल तमाशात होता...''




लोकनाट्य म्हणजे तरी काय? रशियन राज्यक्रांतीनंतर जनतेला व क्रांतिदर्शी कॉम्रेड लेनिन याने पहिलीच घोषणा लोकांना व बुद्धिमंतांना उद्देशून केली होती. ती म्हणजे कला ही लोकांची (कला) आहे. (Art belongs to the people) ही लोकदृष्टी अण्णा भाऊंना जन्मतःच प्राप्त झालेली होती. 'घेतला तमाशाचा ढंग, भरला शाहिरीचा रंग' या युगांतर विशेषांकातील आपल्या अण्णा भाऊंवर भाववाही लेखात शाहीर आत्माराम पाटील लोकनाट्याचा ऊहापोह करताना लिहितात–

'स्वातंत्र्य प्राप्तीनंतर मात्र लोकशाही समाजवादाचे व साम्यवादाचे वर्गीय लढे सुरू झाले. समाजाचा बुद्धिवाद जागा करण्यासाठी शाहिरीला अधिक व्यापक स्वरूप देणे आवश्यक वाटले आणि त्यातूनच एक

प्रभावी तंत्र म्हणून अण्णा भाऊंनी महाराष्ट्रातील तमाशा कलेलाच हात घातला. पण प्रचाराच्या व शाहिरी परंपरेच्या उद्देशाला मारक होऊ नये म्हणून त्यांनी तमाशातील नृत्यप्रधान शृंगाररसाला काटशाही दिली आणि वर्गीय झगड्याच्या सवाल जवाबात कामगार, शेतकरी, श्रमिकांचा बंडखोर सोंगाड्या उभा केला. तमाशाची फक्त सुरवट घेऊन शाहिरीची नवी सजावट केली आणि नाव ठेवले लोकनाट्य.' हाच मुद्दा पुढे नेताना लोकक्रांतीसाठी नाट्य ते लोकनाट्य अशी व्याख्या करून शाहीर आत्माराम पाटील लिहितात–

''स्वातंत्र्यसंपादनासाठी किंवा संरक्षणासाठी युद्धवाद शिकवणे हाच उद्देश शाहिरी बाण्यात अभिप्रेत आहे. साक्षरता प्रचार, रूढी विमोचन, जातिभेद विसर्जन, दैववादाचे उच्चाटन वगैरे सामाजिक सुधारणा व कामगार, शेतकऱ्यांचे आर्थिक लढे हे सर्व शास्त्रीय धडे म्हणजे वैचारिक क्रांतीची झुंजच आहे. या वैचारिक युद्धाची आदिशक्ती पिळल्या जाणाऱ्या श्रमिकांत व उपेक्षित दीनदलितात आहे. या आदिशक्तीला जागर घालील तीच खरी शाहिरी आणि अशा लोकांच्या खुल्या मेळाव्यात लोकबोध भाषेत तत्त्वप्रेरणा देणारी नाट्यकला म्हणजेच लोकनाट्य होय. मूळच्या वीररसोत्पन्न शाहिरी बाण्याची धार सतेज ठेवण्यासाठी तमाशा कलेचे बहिरंग लोकनाट्यात स्वीकारताना अण्णा भाऊंनी शृंगाररसाची सजावट केली, पण प्रारंभीच्या गणातही दैववाद नको म्हणून लोकनाट्याची सुरुवातच प्रयत्नवादाच्या नांदीने करण्याची किमया केली. आजपर्यंतच्या सर्व तमासगीरांच्या व लावणीकारांच्या गणांमधून प्रारंभास श्रीगणेशाचे स्तवन करण्याची प्रथा होती. पण अण्णा भाऊंनी लोकनाट्यासाठी लिहिलेल्या गणांतच ध्येयदर्शक पवित्रा घेतला आहे.''

*प्रारंभी मी आज । कर ज्याचा येथे पूजिला ।*
*जो व्यापूनी संसारात । हलवी या भूगोला ।*
*ज्याला कुजगी तुलना नाही । अंत पाताळाचा होई ।*
*उर ब्रह्मांडाचे फोडी । काळाची हाडे मोडी ।*
*आकाशाखाली ओढी । तो मी आज वंदिला ।।*
*रुद्ररूपी ज्याची शक्ती । मानवाची करी जो भक्ती ।*
*जो उठवूनिया रंकाला । जो शासित उन्मत्ताला ।*

***अण्णा भाऊंचे लिखाण, कामगारांविषयी असो, उपेक्षितांविषयी असो की समाजातल्या खालच्या ◆ पातळीवरच्या वर्गासाठी असो, त्यांची आस्था व चिंतन ◆ हे कुठल्याही एका जातीपुरते मर्यादित न राहता सर्व दलित, उपेक्षित व कष्टकरी वर्गासाठीच असते.***

*तोडोनी जुलमी सत्तेला । निर्मी सुप्रभात काला ।।*
*तो मी आज पूजिला...*

अशा तऱ्हेने त्यांनी श्रमिक शक्तीला प्रथम आव्हान व अभिवादन केले आहे.

लावणीतही अण्णा भाऊंनी शाहिरी भुलावण केली हे विशद करताना शाहीर आत्माराम लिहितात. 'अण्णा भाऊंच्या लावण्या फक्त चार पाच आहेत. अण्णा भाऊंनी लिहिलेल्या लावणीच्या कडव्याकडव्यात कामगार क्रांतीचा एल्गार भरलेला आहे, हे सांगून तमासगीर पठ्ठे बापूराव यांनी मुंबईविषयी लिहिलेल्या 'मुंबई नगर बडी बांका' या सुप्रसिध्द अशा त्यांच्या लावणीची तुलना अण्णा भाऊंनी लिहिलेल्या 'मुंबईची लावणी'शी करतात. ते लिहितात– 'पठ्ठे बापूरावांच्या' लावणीत जीवनातील विषमता दर्शवून गरिबांना जिणे बदलण्यासाठी झुंज देण्याचा आदेश दिलेला आहे.

*हे मुंबई बंदर सगळ्या दुनियेत सुंदर*
*अगदी छानदार । हालीच्या वेळी जणू दिवाळी संध्याकाळी ।*
*चहूकडून हवा दिसे पिवळी । भारी मजा पिलहौसा जवळी ।।*

अशी पठ्ठेरावांनी त्या लावणीतील नायिका पवळा हिला सगळीकडे मजाच मजा असणारी मुंबई खरेदी करून दिली. पण अण्णा भाऊंनी...

*मुंबई उंचावरी । मलबार हिल इंद्रपुरी ।।*
*कुबेरांची वस्ती तिथे सुख भोगती ।।*

अशी सुरुवातीस मुंबई दाखवून दुसऱ्याच कडव्यात –

*परळात राहणारे । रात्रंदिवस राबणारे ।*
*मिळेल ते खाऊन घाम गाळती ।।*

असा विषमतेचा विषाद प्रदर्शित केलेला आहे.

पठ्ठे बापूराव पवळाला म्हणतात...

*सफेत गल्लीत रहाशीलही । तर मजेत खाशीलही ।*
*आणि नामचंद होशील । मग तुझी जाईल वर्दी ।*
*गुलाबी पावडर । तोंड धुऊन लाव वर ।*
*बस खुर्चीवर मग होईल गर्दी ।।*

अशी सफेत गल्लीची शिफारस करून मुंबईतील ‘वारांगनांची महती’ पठ्ठे बापूराव सांगतात. ते लिहितात,

*त्या गोलपिठ्यातील नारी खऱ्या पद्मिनी ।*
*आणि सफेत गल्लीतील अप्सरावाणी ।*
*आणि डंकन रोडावर त्या गे महारणी मांगिनी ।।*

पण पोटासाठी पतीत होऊन खुशालचेंडूच्या भोगलालसेच्या गुलाम बनलेल्या त्या अभागिनींची कड घेऊन अण्णा भाऊ लिहितात...

*फोरासरोड तीन बत्ती । गोलपिठा नाक्यावरती ।*
*शरीर विकून किती एक पोट भरती ।।*

एकीकडे पोट भरण्यासाठी स्त्रियांना शरीर विकावे लागते तर दुसरीकडे शेअरबाजारात...

*सारे सट्टेवाले तिथे सट्टा खेळती ।*

आणि केवळ आकड्याचा खेळ करून विनाश्रमी श्रीमंत होतात. असा आहे तमासगिरी व शाहिरी सांप्रदायातील फरक... शाहीर आत्माराम पाटील यांनी आपल्या लेखात विशद केलेला!

त्याच लेखात शाहीर आत्माराम पाटील अण्णा भाऊंच्या ‘माझी मैना गावावर राहिली’ या लावणीची समग्र अर्थवाही समीक्षा करतात व अण्णा भाऊंना त्याचे श्रेय आपल्या दोघांच्या शाहिरी बाण्याने देतात. ही लावणी शाहीर गव्हाणकर व शाहीर अमर शेख यांनी महाराष्ट्रात घरोघर नेली. सुरुवातीचा मुखडा–

*माझी मैना गावावर रायली ।*
*माझ्या जिवाची होतीया काहिली ।।*

असा देऊन नंतर पहिल्या कडव्याच्या बांधणीत आपली ती मैना शाहीर श्रोत्यांसमोर हुबेहूब जशीच्या तशी तिच्या देह-रूप-गुणासह उभी करतो. या मैनाचा बांधा ओतीव आहे. रंग गव्हाळ आहे. ती चंद्राची कोर, उदात्त गुणांची आहे. ती मोठ्या मनाची आहे. शाहीर सांगतो, ती

◆ *लोकांना सतत प्रेरणा देऊन त्यांचा आत्मविश्वास बळकट केला. गुलामगिरीच्या अवघड बेड्या फेकण्यास सतत प्रेरणा देऊन जनसामान्यात आत्मविश्वास व सामर्थ्य निर्माण करण्याचे कार्य त्यांनी जिद्दीने केले.* ◆

माझी रामाची सीता आहे. ती हसून बोलायची, मंद चालायची. तिच्या अंगाला केतकीचा सुगंध आणि तिची कांती सतेज. जणू घडीव सोन्याची पुतळी. नव्या नवतीची. तिच्या रेखीव भुवया जणू इंद्रधनूची कमान. हिरकणी हिऱ्याची. जशी आंधळ्याची काठी तशी ती माझी गरिबाची काठी. मैनेचे वर्णन करताना शाहीर कवन रचतात.

*मैना रत्नाची खाण । माझा जीव की प्राण ।।*
*नसे सुखाची वाण । तिच्या गुणाची छक्कड मी गायिली ।*
*माझ्या जिवाची होतिया काहिली ।।*

गरिबीमुळे मैनाची आणि तिच्या या राघूची ताटातूट होते. तो मुंबईला जाण्याची तयारी करतो. भाकर बांधाबांध होते आणि त्याला मुंबईला घालवीत त्याची मैना जणू शुक्राची चांदणी वाट चालू लागते. तिच्या मनाची कळी कोमजते. तो तिला हसवण्यासाठी शिकस्त करतो. तिला पत्रांची आणि दागिन्याने मढवून काढण्याची वचने देतो. तिच्याशी शिंदेशाही तोड्याची, कोल्हापुरी साज तिच्या अंगावर चढविण्याची, वज्रटिक देण्याची, गळ्यात पुतळ्याची माळ, कानात भोखरे, पायात मासोळ्या, दंडात इला आणि नाकात सर्जाची नथ घालण्याची बोली करतो. परंतु तिच्या अंतरीची कळी काही उमलत नाही आणि छातीवर दगड ठेवून मुंबईची पाठ धरतो. तेव्हा शाहीर कवन करतो.

*मैना खचली मनात । ती हो रुसली डोळ्यात ।*
*नाही हसली गालात । हात उंचावून उभी राहिली ।।*

आणि तो मुंबईला येतो. या मुंबईत बेकारांची गर्दी असते आणि ह्यात एकाची भर पडते.

मढ्यावर मूठभर माती पडावी तशी ह्याची गत होते. आणि ती मुंबई कशी असते? शाहीर अण्णा आपल्या कवनात गातात,

*ही मुंबई यंत्राची, तंत्राची, जगणारांची, मरणारांची ।*
*शेंडीची, दाढीची, हडसनच्या गाडीची, नॉयलॉनच्या*
*आणि जॉर्जेटच्या तलम साडीची ।*
*बुटांच्या जोडीची । पुस्तकांच्या थडीची । माडीवर माडी ।*
*हिरव्या माडीची ।*
*पैदास इथं भलतीच चोरांची । ऐतखाऊंची शिरजोरांची ।*
*हरामखोरांची । भांडवलदारांची ।।*

त्यानं पोटासाठी कामाची पाठ धरली होती. उन्हाची, थंडीची, पावसाची पर्वा केली नव्हती. त्याचे खिसे पाण्याने भरतात, पण त्याच्याकडे एका छत्रीची वाण होती.

त्याच दरम्यान बेळगाव, कारवार, निपाणी, गोव्यासह एक भाषिक राज्याची संयुक्त महाराष्ट्राची चळवळ उठते. जणू अन्यायाची संगीन चकाकते. बिनीवरची कामगारांची, शेतकऱ्यांची, मध्यमवर्गीयांची फौज उठते. मराठी देश उठतो. पैरी नामशेष करण्यासाठी त्याला मैदानी त्वेष येतो. मराठी माणूस छातीवर डमडमची गोळी साहतो. शाहीर अण्णा भाऊ मग गातात–

*म्हणे अण्णा भाऊ साठे । घरं बुडाली गर्वाची । मी-तू पणाची ।*
*जुलुमाची । जबरीची । तस्कराची ।*
*नि कुंबळीला कत्तल झाली इंद्रजिताची ।*
*चौदा चौकड्याचं राज्य रावणाचं । लंका जळाली त्याची ।।*

शाहीर सांगतात, तीच गत कलियुगामध्ये मोरारजी देसाई आणि स. का. पाटील यांची होते. अखेर ही मुंबई महाराष्ट्राची होती. परळच्या प्रलयाची होती. लालबागच्या लढाईची होती. फाऊन्टनच्या चढाईची होती.

*झाले फाउन्टनला जंग । तिथं बांधूनी चंग ।*
*आला मर्दानी रंग । धार रक्ताची मर्दानी वाहिली ।।*
*महाराष्ट्रानं गुढी उभारली विजयाची ।*
*दाखविली रीत*
*पाठ भिंतीला लावून लढायची ।*

एवढं सारं घडलं, तरी त्याच्या मनाची तगमग थांबत नाही. गावाकडं

◆ *अण्णा भाऊंच्या मानवतावादाच्या तलवारीला समाजवादी शास्त्रीय पद्धतीने चढलेली धार होती. म्हणून त्यांचा पोवाडा जनमानसात नुसता 'रवंथ' करण्यासाठी जात नसे, तर ठिणग्या-ठिणग्यांनी रान उठवीत असे.* ◆

त्याची मैना राहिलीय. तिची त्याची भेट नाही. गंमत म्हणजे जी गत त्याची होती तीच या खंडित महाराष्ट्राची होते. बेळगाव, कारवार, डांग, उंबरगाव, यांवर दुजांची मालकी राहते. खंडणीची धोंड गळ्यात पडते. दंडेलीची कमाल होते. शाहिरीला बेकीची चीड येते आणि एकीची गरज पडते म्हणून मग या शिवशक्तीला शाहीर विनवणी करून आपले मैनेचे कवन लावणीरूपात पुरं करतो, तो म्हणतो...

*आता वळू नका । राणी पळू नका । कुणी चळू नका ।*
*बिनी मारायची अजून राहिली ।*
*माझ्या जिवाची होतिया काहिली ।*

बापू पठ्ठे म्हणतात- ''मला तर वाटते अण्णा भाऊ साठे यांनी ही एकच लावणी लिहिली असती, तरी त्यांचे नाव मराठीच्या शाहिरी विश्वात व इतिहासात यावत्चंद्रदिवाकरौ अमर झाले असते.''

शाहीर अण्णा भाऊ साठे जसा आपला स्वतःचा गण रचतात तशीच पोवाड्याचे विषयही कालानुसार कालगामी व कालसापेक्ष असे निवडून प्रत्येक पोवाड्याचा आपला वेगवेगळा रचनाबंध आशयकोष निर्माण करतात. आपली कला लोकांसाठी, आपण लोककवी आहोत आणि आपले काव्य व काव्यात्मक नाट्य हा लोकनाट्याचा प्रकार व आविष्कार आहे याचा विसर स्वतःला ते कधीच पडू देत नाहीत.

मुंबईच्या गिरणीकामगारालाही त्यांनी आपल्या पोवाड्याचा विषय केला आहे. सन एकोणीसशे आठ साली इंग्रज सरकारने लोकमान्य टिळक यांना अटक केली तेव्हा मुंबईच्या गिरणीकामगारांनी जो उत्स्फूर्त संप केला आणि 'हिंद'च्या 'मुक्तीचे भले । शिंग वाजले' असे उद्गार रशियामध्ये कॉम्रेड लेनिन याने काढले. या संपापासून सुरू झालेली गिरणीकामगार संपलढ्याची मालिकाच शाहीर अण्णा भाऊ साठे आपल्या या 'मुंबईचा गिरणीकामगार' या पोवाड्यात चित्रदर्शी गुंफीत

जातात आणि पोवाड्याचा शेवट करताना कामगाराला उद्देशून आपली कृतज्ञता व्यक्त करताना लिहितात–

*हा कामगारा तुज ठायी अपार शक्ती ।*
*ही नांदे मुंबई तव तळहातावरती ।*
*उठूनी सत्वर । उज्ज्वल राख आपुली कीर्ती ।*

१५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत स्वतंत्र झाला, पण तत्पूर्वी इंग्रजी कूटनीती या देशात भयानक जातीय दंगे व मानव संहार निर्माण करण्यात यशस्वी झाली. देशाची फाळणी झाली. राजधानी दिल्ली व संपूर्ण पंजाब निष्पाप मानवी रक्ताने रक्तरंजित झाला. दिल्ली काबीज करण्याचे कट जनतेच्या शत्रूंनी रचले. त्या भेसूर वातावरणाचे, वास्तवाचे वर्णन साम्राज्यशाहीचे अभद्र व मानवदुष्ट मुखवटे टराटरा फाडीत अण्णा भाऊ आपल्या ‘पंजाब दिल्लीचा दंगा’ या पोवाड्यात करतात.

*पंजाब झाला बेभान । मृत्यूचे चाले थैमान ।।*
*शीख, हिंदू, मुसलमान । सुडानं धुंद होऊन ।।*
*वैऱ्याला पार विसरून । आपसात पाडिती खून ।।*
*इंग्रज आग पलावून । पाहती मजा लांबून ।।*
*शिसारी घारी गिधाडांना । आली कावळ्यांना । मढी चघळून ।।*
*माणुसकी पळाली पार । होऊनी बेजार । पंजाबातून ।।*
*सुडाची निशा चढून । लोक पशूहून बनले हैवान ।।*
*रक्ताचा लावूनी टिळा । मुंडक्यांची माळा गळा घालून ।।*
*मातेच्या पदराखालून । बाळ हिरावून मारती जबरीनं ।।*

*ज्याने झेलिला घाव साहिला जालियनवाला ।*
*योद्धा भगतसिंग दिला आम्हाला ज्याने मतवाला ।*
*वीर हजारो समरी पडले स्वातंत्र्यासाठी ।*
*क्रांतिभूमी पंजाब गाजला दुनियेच्या पाठी ।।*
*त्या हुतात्म्यांच्या भूमीत । झाला आकांत । ऐका हो शांत ।*
*दया धर्म नष्ट जाहला । अबलांच्या शीलावर घाला ।।*
*अघोरी होऊ लागला ।।*

१९४३ साली बंगालमध्ये महाभीषण मानवनिर्मिती दुष्काळ पडला.

◆ ***उत्तम कला प्रचारकी असतेच आणि उत्तम प्रचार हा कलात्मकच असतो. हे सत्य आहे. त्या दृष्टीने पूर्वीच्या शाहिराचे पोवाडे व शाहीर अण्णा भाऊंचे पोवाडे अभ्यासणे योग्य होईल.*** ◆

शेठजी सावकारांनी व भांडवलदारांनी इंग्रजांशी संगनमत करून तो दुष्काळ घडवून आणला. तीस ते चाळीस लाख जनता अन्नावीना झीजून-झीजून मेली. 'भुके बंगाल'चे ते दृश्य पाहून सारा भारत हादरला व हेलावलादेखील. गिरणीत साच्यावर काम करणाऱ्या अण्णा भाऊंना बंगालची हाक ऐकू आली आणि 'बंगालीची हाक' हा पोवाडा त्यांनी करुणार्द्र होऊन लिहिला–

*बंगाल मारितो हाका। भारतीय युवका ।*
*उठा आता ऐका ।*
*वाचवा त्याला, धरा सावरून । सर्व जनतेत*
*ऐक्य उभारून ।*
*निराशा दुर्बलता झुगारून ।।*
*परतंत्र देश भारत । मतभेद त्यात ।। फितुरीचा हात ।*
*त्याने दुःखाचा बांध फुटला ।।*
*बंगालवरती कडा तुटला । भुकेचा महादैत्य उठला ।।*
*ती वंगभूमी सुंदर । परंपरा थोर । क्रांती आगरा ।*
*स्वाभिमानाचा बालेकिल्ला ।।*
*जिथे टागोरांचा जन्म झाला । तिथे भुकेने कहर केला ।।*
*नफेबाज भांडवलदार । नफ्यावर नजर ।*
*करिती गुरगुर ।*
*युद्धाचे नाव पुढे केले । झोळी भरण्यात गुंग झाले ।*
*जनतेच्या मानेवर बसले ।।*

स्वातंत्र्यलढ्याच्या अंतिम पर्वात स्वातंत्र्य प्राप्त करून घेण्यात यश येत असतानाच बांडगुळासारख्या या देशात टिकून राहिलेल्या सरंजामी संस्थांनी राजवटीविरुद्धही जनतेने लढा पुकारला. निजामी राजवटीविरुद्ध तेलंगणच्या शेतकरी कामगार श्रमिक स्त्री-पुरुषांनी साम्यवादी तत्त्वज्ञानाने

प्रेरित होऊन जो जनतेचा लढा दिला तो तत्कालीन भारतीय इतिहास काळात विलक्षण गाजला. स्वाभाविकच शाहीर अण्णा भाऊंची शाहिरी प्रतिभा 'तेलंगणाचा संग्राम' हा पोवाडा लिहायला व गायला सर्व जण सतेज झाली. स्वातंत्र्याबरोबरच या देशात काळाबाजार आला. 'काळा बाजार' हादेखील अण्णा भाऊंच्या छोटेखानी पोवाड्याचा विषय होतो. काळ्या बाजाराच्या रोगाचं नेमकं ठोस व उग्रतम वर्णन अण्णा भाऊ पोटतिडिकेने करतात ते असे...

*काळ्या बाजाराचा रोग आला । मागं लागला । गोरगरिबाला ।*
*सुखाचा घास मिळना झाला । काळ हा अता बिकट आला ।*
*वरती बैसले चौर नफेबाज ।*
*करिती ते आज आपुले काज ।*
*म्हणती देशात आमुचे राज ।।*
*सारा माल ठेविती दाबून । विकती चोरून । दामदुपटीनं ।*
*नियंत्रण कायदा । दिला उडवून ।*
*किमती मनसोक्त घेती अडवून ।*
*काढिती लोकांनाच बडवून ।।*

संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत 'महाराष्ट्राची परंपरा' हा अण्णा भाऊंचा फार गाजलेला पोवाडा. अण्णा भाऊ प्रारंभीच पोवाड्याच्या आपल्या एका तुकड्यात महाराष्ट्राचे सळसळते, रसरसते भूमिचित्र रेखाटतात ते असे.

*सह्याद्री, पसरला जिथे शेषासम गिरी ।।*
*दौलत घेऊनी सत्तावीस गड शिरी ।।*
*भेसून कड्यावर बुरूज पहारेकरी ।*
*ताड, माड सागराची झाडे त्यांच्या शेजारी ।।*
*कळकीचे बेट आकाशात झुकांड्या मारी ।*
*करवंदी, बाभळ आणि बोरी ।।*
*चिल्लार कठीण काटेरी ।।*
*खाली सुपीक शेती जमीन काजळापरी ।।*
*महाराष्ट्राची ती शेतसरी । सुवर्ण आणि भुवरी ।।*
*कापूस, ऊस, गूळ, भेंडी, तूर, तिळं, हवरी ।।*

◆ ***अण्णा भाऊंनी तमाशाचे तंत्र परंपरागत चालत आलेलेच वापरले असले तरी त्यांना जो नवा मंत्र (आशय) लोकांपुढे मांडायचा होता तो जास्तीत जास्त प्रभावी करण्यासाठी अनेक वेळा जुन्या तंत्राला मुरड घालावी लागली.*** ◆

*कराळा फुले गोजिरी । उधळून महाराष्ट्रावरी ।*
*राळ्याचे लोंब पुढे लवून मुजरा करी ।।*


शाहीर अण्णा भाऊ साठे आपल्या या पोवाड्यात मराठी भाषेचा उगम आणि ठिकाणापासूनची बंडखोरीची महाराष्ट्राची परंपरा वर्णन करतात. आम्हांला म्हणजे मराठी माणसाला दास्याची चीड कशी आहे व त्या दास्याविरुद्ध महाराष्ट्राने केलेल्या लढ्याची इतिहासाची साक्ष ते आपल्या पोवाड्यात नोंदवून ठेवतात. ज्ञानाच्या मक्तेदाऱ्यांविरुद्ध ज्ञानेश्वरांनी केलेले बंड, वीर मावळ्यांना बरोबर घेऊन मोगल साम्राज्यशाहीविरुद्ध शिवरायांनी दिलेली झुंज, इंग्रजी सत्तेविरुद्ध, राजवटीविरुद्ध तात्या टोपे, झाशीची राणी, उमाजी नाईक, वासुदेव बळवंत फडके आणि मग थोर देशभक्तांच्या नेतृत्वाखाली जनतेने केलेला स्वातंत्र्यसंग्राम, १९४६चे मुंबई बंदरात नाविकांनी केलेले बंड, त्यांना मुंबईच्या वर्गजागृत लढाऊ झुंजार कामगार वर्गाने दिलेली साथ आणि मग स्वातंत्र्यानंतर मराठी जनतेने संयुक्त महाराष्ट्राला घातलेली हाक व केलेला मुजरा... असा या पोवाड्याचा बाज आहे.

शाहीर अण्णा भाऊंनी आपली शाहिरी फुलविताना व सादर करताना लोकनाट्याचा आपला स्वयंभू आविष्कार साधीत नवे गण, नव्या गौळणी, नवे कटाव, नवी गीते, नव्या लावण्या लिहिल्या. त्यातील काही लेखनप्रकार त्यांचे अपुरे राहिलेलेही आपल्याला दिसतात. मराठी शाहिरांची त्यांनी विशद केलेली 'शाहिरांनो' या आपल्या कवनातील भूमिका अण्णा भाऊंच्या कवनाचे रहस्य विशद केल्यावाचून राहत नाही. ते लिहितात–

*शाहिरांनो, जनता केली तुम्ही*
*आपुली शाहिरी ।*

*होवो स्वागत आज तुमचे या*
*जनी-मन-मंदिरी ।।ध्रु.।।*
*महाराष्ट्र देश तुमची मायभूमी गोजिरी ।*
*भूतलीची रेशमासम ही मराठी साजिरी ।*
*वाजली येथे निशीदिन भोरिसंगे तंबुरी ।*
*सगन, होना यांचे कवना भाळला सह्यगिरी ।*
*गडकरी, केशवसुतांच्या होति जी जिव्हेवरी ।*
*रास सरस्वतीची नांदे आज तव ओठावरी ।*
*घेऊनि ते राग पाहिले या नव्याने आळवा ।*
*सजवूनिया कवनास उठवा दीन दुर्बल मानवा ।*
*सुखशांतीचा पोवाडा, गांजल्यांना ऐकवा ।*
*जाऊ द्या, ती खोल खोली दामिनीसम शाहिरी ।।*

शाहीर अण्णा भाऊ जनजागृतीचे व जन-उठावाचे आपले जीवनकार्य सतत दृष्टीसमोर ठेवून मराठी लोककाव्याचे भारुडापासून तो ओवी अभंगापर्यंतचे प्रकार लीलया हाताळतात. ‘एकजुटीचा नेता’, ‘महाराष्ट्र देशा आमुच्या’, ‘उठला मराठी देश’, ‘तू मराठमोळा’, ‘महाराष्ट्रावरती टाक ओवाळून काया’, ‘शिवारी चाल’, ‘लवादाचा ऐका परकार’, ‘जागरणाला या’, ‘चिनी जनांची मुक्तिसेना’, ‘लेनिन शुभनामाचे गाऊ गान’, ‘भारताची पहिली दीपावली’ त्यात त्यांच्या कवितांचा, गीतांचा, शाहिरीचा चोखंदळ मराठी वाचकाला व चिरजागृत मराठी जनतेला कधीही विसर पडणारा नाही, असे श्री. नेरुरकर यांना वाटते. विशेष म्हणजे समाज बांधणीचा आपला शाहिरी बाणा जपत असताना शाहीर अण्णा भाऊ



◆ *'मराठी साहित्याच्या विकास प्रक्रियेमध्ये लेखक, संवेदनशील कार्यकर्ता आणि कवी म्हणून अण्णा भाऊ साठे यांचे मोलाचे योगदान आहे.* ◆

साठे निसर्गकविता व भावकविताही हळुवार व भावस्पंदने साधीत व साकारीत रसप्लुत लिहितात. 'भाग्याची माउली' या कवितेत शेतकरी जीवनात उगवलेल्या सकाळच्या प्रहरांचे ते ग्रामीण चित्र रंगवितात. 'दुनियेची दौलत सारी' या गीतात ते शेतकऱ्याच्या शिवारी पिकलेले दौलतीचे चित्रदर्शी रसदार वर्णने शेतकऱ्याच्या शब्दातच करतात. त्याच्या तोंडून 'जीवापरीस त्याला प्यारी असलेली त्याची धरणी कसेल त्याची सारी होईल आणि ऐतखाऊंना ती पळवून लावील' असा लढाऊ निर्धारही व्यक्त करतात. 'बाई मी बागडी मैना' या छोटेखानी गीतात अण्णा भाऊ हलक्याफुलक्या शृंगाररसाची डूबही आपल्या कवितेला लीलया देतात आणि 'भारताची पहिली दीपावली' (स्वातंत्र्यानंतरची) आपल्या ओवीसदृश कवितेतून चितारताना एका भावाला ओवाळणाऱ्या आपल्या बहिणीच्या मुखातून ते तिचा भावानंद व्यक्त करतात. तिचा भाऊ रणधीर आहे. तात्या टोपेबरोबर तळहाती शीर घेऊन तो लढतो, तसाच नौकेवरून हाक येताच सारी मुंबापुरी जागी करून वैऱ्याची दैना करतो. आपल्या भावाची ओवाळणी करताना ती म्हणते...

*मंगल ग माझा पहिला । कोटी कुंकवाचे मोल दीप लागला ।।*
*दिल्लीच्या ग दरबारात । हृदयाच्या कोंदणात ।*
*पतंगाच्या घोळक्यात । दीप माझा मालवित ।*
*मावळू नको देऊ याला ।*
*कोटी कुंकवाचे मोल दीप लागला ।।*

भारतातील कोट्यवधी दलित व बहिष्कृत जनतेला आपली चेतना व अस्मिता युगनिर्माणक वर्ण लढा देऊन प्राप्त करून देणारे व नाठाळ जीर्णवाद्यांच्या माथ्यावर विसाव्या शतकातील मरणांतिक प्रहार करणारे भारताचे महान भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मरणही अण्णा भाऊ आपल्या गीतातून जनतेला करून देतात आणि त्यांच्या क्रांतिकारी परिवर्तनशील तत्त्वज्ञानाचा ओजस्वी संदेश दलित शोषितांपर्यंत

◆ ***अण्णा भाऊंना 'संयुक्त महाराष्ट्र चळवळी'चे प्रणेते म्हणून ओळखले जाते.*** ◆

पोहचविताना म्हणतात–

*जग बदलून घालूनी घाव ।*
*सांगून गेले मला भीमराव ।*
*गुलामगिरीच्या या चिखलात ।*
*रुतून बसला का ऐरावत ।*
*अंग झाडूनी निघ बाहेरी ।*
*घे बिनीवरती घाव ।।*

असे ते खूप हेलावून व क्रुध्द होऊन लिहितात. शाहीर अण्णा भाऊंच्या शाहिरीचे विविध पैलू व पदर उलगडून पाहताना आपल्याला सतत जाणवते ते हेच की, अण्णा भाऊ हे केवळ भारतातीलच नव्हे, तर यच्चयावत् विश्वातील नाडलेल्या, पीडलेल्या, पिळल्या गेलेल्या व शोषणग्रस्त श्रमिक दलित जनतेचे शाहीर होते. पूर्णपणे लोकांचे होऊनच त्यांनी आपले लोककाव्य आणि लोकनाट्य लिहिले. त्यांच्या काव्यनिर्मितीचा व जीवनवादाचा पिंड मार्क्सवादी व साम्यवादी तत्त्वज्ञानावर सक्रियतेने तसेच समृद्धतेने पोसलेला होता.

Marxism and Poetry (मार्क्सवादी आणि कविता) या आपल्या मौलिक पुस्तकात त्याचा लेखक 'जॉर्ज थॉमसन' म्हणतो ते अण्णा भाऊंच्या कवितांबाबतही मानता येईल. तो लिहितो, ''But all poetry is in origin a Social Act, in which poet and people Commune'' (परंतु सर्व कविता ही मुळातच एक सामाजिक क्रिया आहे. जिच्यामध्ये कवी आणि लोक उत्कृष्ट संवाद करतात.) कॉम्रेड श्रीपाद अमृत डांगे यांनी अण्णा भाऊंना उद्देशून लिहिलेल्या शब्दात सांगावयाचे तर, ''आमचे कलावंत माणसात राहतात, जनतेत वावरतात, तिच्याशी समरस होतात. तिच्या जीवनलढ्यात असतात. तिच्यासाठी व तिच्याविषयी ते लिहितात.'' अण्णा भाऊंची शाहिरी जनतेतूनच स्फुरण पावली होती...!

## महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे तर्फे अण्णा भाऊंना अभिवादन

‘अण्णा भाऊ साठे यांचे सबंध साहित्यच विद्रोही तत्त्वज्ञानावर उभे आहे. हे विद्रोही तत्त्वज्ञान त्यांना मार्क्स, गॉर्की, फुले, शाहू आणि आंबेडकर यांच्याकडून मिळाले. या विद्रोही तत्त्वज्ञानातून प्रेरणा घेऊन अण्णा भाऊंनी मराठी साहित्याच्या भूमीत समाजपरिवर्तनाचा विचार पेरला’ असे मत महाराष्ट्र साहित्य परिषदेचे कार्याध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी यांनी व्यक्त केले. महाराष्ट्र साहित्य परिषद आणि दलित साहित्य परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने अण्णा भाऊ साठे यांच्या स्मृतिदिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. व्यासपीठावर कोषाध्यक्ष सुनीताराजे पवार, धर्मराज निमसरकर (अध्यक्ष, दलित साहित्य परिषद), दीपक करंदीकर उपस्थित होते. महाराष्ट्र कल्चरल सेंटरचे कलावंत हर्षद राजपाठक व सचिन जोशी यांनी अण्णा भाऊंच्या ‘सापळा’ आणि ‘रक्ताचा टिळा’ या कथा आणि ‘माझा रशियाचा जीवनप्रवास’ या ग्रंथातील ‘लाल ताऱ्यायाखाली’ आणि ‘कलेचं माहेरघर’ या लेखांचे वाचन केले.

प्रा. मिलिंद जोशी म्हणाले, ‘मराठी साहित्याच्या विकास प्रक्रियेमध्ये लेखक, संवेदनशील कार्यकर्ता आणि कवी म्हणून अण्णा भाऊ साठे यांचे मोलाचे योगदान आहे. शोषित, पीडित, दलित आणि उपेक्षित वर्गाच्या वेदना त्यांनी समर्थपणे आपल्या साहित्यातून मांडल्या. त्यांच्या साहित्याने मराठी साहित्याला नव्या जीवन जाणिवा दिल्या. त्यांचे शाहिरी वाङ्मय अक्षर, नवे परिमाण देणारे ठरले. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीचे प्रतिबिंब अण्णा भाऊंच्या साहित्यात आहे याचे कारण स्वतः अण्णा भाऊ साठे हे ‘लोकनाट्य’ या शब्दाचे जनक मानले जातात. पारंपरिक तमाशात प्रारंभी गणात गणपती आणि विविध तमाशाला अनेक प्रकारच्या देवदेवतांना वंदन करून सुरुवात होत असे. यात बदल करून अण्णा भाऊंनी महापुरुषांना वंदन करण्याची नवी पद्धत अस्तित्वात आणली. परंपरागत तमाशातील रंजकता कमी करून समाजपरिवर्तनासाठी आवश्यक असणाऱ्या बंडखोर जाणिवा त्यांनी लोकनाट्यातून व्यक्त केल्या. आपल्या समग्र साहित्यातून अण्णा भाऊंनी महत्त्वाचे कार्य केले. तसेच

विद्रोही जीवन मूल्यांची पेरणी केली. सामाजिक परिवर्तनाचा ध्यास हा अण्णा भाऊंच्या साहित्यविश्वाचा श्वास आहे.'

## रयत विद्यार्थी विचार मंचच्या वतीने अण्णा भाऊंना अभिवादन...

नेल्सन मंडेला यांनी आपले संपूर्ण जीवन डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारधारेवर व्यतीत केले. नेल्सन मंडेला हे दक्षिण आफ्रिकेचे पहिले राष्ट्रपती होते. रक्ताचा एक थेंबही न सांडता दक्षिण आफ्रिकेत त्यांनी क्रांती घडवून आणली. काळे आणि गोरे अशा वर्णभेदाला अहिंसेच्या मार्गाने मूठमाती देऊन कृष्णवर्णीयांच्या अंधारमय जीवनात त्यांनी प्रकाश आणला. सुमारे तीन शतकांच्या वर्णवर्चस्वानंतर दक्षिण आफ्रिकेस लोकशाही राष्ट्र बनवण्याचे श्रेय त्यांना जाते.

तसेच अण्णा भाऊ साठे हे एक थोर समाजसुधारक लोककवी आणि लेखक होते. अण्णा भाऊ साठे हे केवळ दीड दिवस शाळा शिकले, तरी त्यांनी ३५ कादंबऱ्या, १५ लघुकथा, १३ लोकनाट्ये, ३ नाटके, १३ कथासंग्रह, १ शाहिरी पुस्तक, १५ पोवाडे, १ प्रवासवर्णन इत्यादी विपुल प्रमाणात त्यांनी लेखन करून समाज परिवर्तनाचे काम केले. अण्णा भाऊंना 'संयुक्त महाराष्ट्र चळवळी'चे प्रणेते म्हणून ओळखले जाते. त्यांनी आपल्या लेखणीतून नेहमीच शोषित, पीडित वंचितांच्या व्यथा जगाच्या वेशीवर मांडल्या.

नेल्सन मंडेला यांची जयंती आणि अण्णा भाऊ यांची पुण्यतिथी निमित्त या दोन महान विभूतींना रयत विद्यार्थी विचार मंचच्या वतीने अभिवादन करण्यात आले.

## अण्णा भाऊंचे बाबासाहेबांना अभिवादन

अण्णा भाऊ साठे यांची निष्ठा जशी छत्रपती शिवाजी महाराजांवर होती तशीच ती डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यावरसुद्धा होती. हे त्यांच्या लेखनातून तसेच बोलण्यातून आढळून येते.

अण्णा भाऊंनी त्यांची 'फकिरा' ही कादंबरी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या झुंजार लेखणीला अर्पण केली होती. ६ डिसेंबर १९५६

◆ *अण्णा भाऊ साठे यांची निष्ठा जशी छत्रपती शिवाजी महाराजांवर होती तशीच ती बाबासाहेब आंबेडकर यांच्यावरसुद्धा होती.* ◆

साली डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे महानिर्वाण झाले. त्यावेळी आणि त्याच्यानंतर सगळ्या देशांमधून, राज्यांमधून, जिल्ह्यांमधून, तालुक्यांमधून आणि नगरा-नगरांमधून बाबासाहेबांना श्रद्धांजली देण्याचा कार्यक्रम सतत होत होता. अशाच वेळी आपल्या महाराष्ट्रातील सगळे त्यावेळचे ख्यातनाम गायक, प्रसिद्ध कवी, शाहीर यांनी ठरवले की, आपणही बाबासाहेबांना आदरांजली किंवा श्रद्धांजली म्हणून एक कार्यक्रम ठेवायचा आणि प्रत्येकाने बाबासाहेबांबद्दल अभिवादनपद एक गाणे श्रद्धांजली म्हणून गायचे आणि गाण्याच्या रूपाने बाबासाहेबांना श्रद्धांजली वाहायची. त्या कार्यक्रमाची तारीख ठरली. अंधेरीमधला एक हॉल निश्चित झाला आणि कार्यक्रम वेळेत सुरू झाला.

त्या कार्यक्रमाला वामनदादा कर्डक, गोविंद म्हशीलकर, प्रल्हाददादा शिंदे, विठ्ठल उमप, विठ्ठल शिंदे आणि अण्णा भाऊ साठे अशी बरीच गायक मंडळी उपस्थित होती. या कार्यक्रमात सगळेच मंचावर बसून गायक मंडळी व शाहीर मंडळी स्वतःचे गाणे सादर करत होते. सगळ्यांचे सादरीकरण झाले. एकच शाहीर राहिले होते आणि ते म्हणजे अण्णा भाऊ साठे... त्यावेळेस कवी, गायक, वामनदादा कर्डक अण्णा भाऊंना म्हणाले की, ''अण्णा तुला गाणं नाही म्हणायचं का? आणि तू जर गाणंपण लिहून आणले नाही मग तू बाबासाहेबांना गाण्याच्या रूपाने श्रद्धांजली कसा वाहणार. गाणं कसा म्हणणार?'' त्यावेळी अण्णा भाऊ खिशातून पेन आणि कागद काढतात आणि गाणे लिहायला सुरुवात करतात... त्या लिखाणाची, त्या कवितेची, गीतेची सुरुवात ते ''जग बदलू घालुनी घाव, सांगून गेले मला भीमराव'' ह्या ओळीने करतात... या गाण्यामुळे सर्वांना जीवन जगण्यास प्रेरणा मिळाली आहे. ते गाणे पुढीलप्रमाणे आहे –

*जग बदल घालूनी घाव...*
*जग बदल घालूनी घाव ।*

*मराठी कादंबरीच्या त्या काळात जेव्हा शहरी आणि उच्चवर्णीयांचेच प्रतिनिधित्व होत होते, तेव्हा अण्णा भाऊंनी कनिष्ठ आणि ग्रामीण जनतेचे विश्व साहित्यात आणले.*

*सांगुनी गेले मज भीमराव ।।*
*गुलामगिरीच्या या चिखलात ।*
*रुतून बसला का ऐरावत ।*
*अंग झाडूनी निघ बाहेरी ।*
*घे बिनीवरती घाव ।*
*सांगुनी गेले मज भीमराव ।।*
*धनवंतांनी अखंड पिळले ।*
*धर्मांधांनी तसेच छळले ।*
*मगराने जणू माणिक गिळिले ।*
*चोर जहाले साव ।*
*सांगुनी गेले मज भीमराव ।।*
*ठरवून आम्हा हीन अवमानीत ।*
*जन्मोजन्मी करून अंकित ।*
*जिणे लादून वर अवमानीत ।*
*निर्मून हा भेदभाव ।*
*सांगूनी गेले मज भीमराव ।।*
*एकजुटीच्या या रथावरती ।*
*आरूढी होऊन चलवा पुढती ।*
*नव महाराष्ट्रा निर्मून जगती ।*
*करी प्रगट निज नाव ।*
*सांगुनी गेले मज भीमराव ।।*

मराठी कादंबरीच्या त्या काळात जेव्हा शहरी आणि उच्चवर्णीयांचेच प्रतिनिधित्व होत होते, तेव्हा अण्णा भाऊंनी कनिष्ठ आणि ग्रामीण जनतेचे विश्व साहित्यात आणले. साहस या गुणाचे चित्रण त्यांच्या अनेक कादंबऱ्यातून आढळते.

◆ *दलित वर्गाचे अथांग जीवन दिसण्यासाठी लेखकाला एक दिव्यदृष्टी असावी लागते. तो त्या वर्गाशी एकनिष्ठ असावा लागतो.* ◆

'फकिरा' या त्यांच्या सर्वाधिक प्रसिद्ध कादंबरीत त्यांनी आपले खऱ्या आयुष्यातले मामा फकिरा राणोजी मांग यांची साहसी जीवनकथा मांडलेली आहे. फकिरा ही पुढे अतिशय गाजलेली कादंबरी त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या झुंजार लेखणीला अर्पण केली. अण्णा भाऊ साठे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यावर फक्त 'जग बदल घालुनी घाव। सांगूनी गेले मला भीमराव' हे गीत लिहिले तेव्हा एका पत्रकाराने अण्णा भाऊंना विचारले... 'अण्णा भाऊ तुम्ही बाबासाहेब यांच्यावर कादंबरी का नाही लिहिली?' तेव्हा अण्णा भाऊ त्या पत्रकारावर संतापले आणि म्हणाले, ''अरे... बाबासाहेब सूर्य आणि त्या सूर्याला मी एका पुस्तकात कैद करूच शकत नाही... ज्यांनी बाबासाहेबांवर पुस्तकं लिहिली त्यांच्या लेखणीला आणि त्यांना माझा दंडवत.''

अण्णा भाऊ साठे यांचे 'फकिरा' कादंबरीमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यावरील असलेले प्रेम-

''लौकर चला! बेडसगावच्या त्या बामनाच्या वाड्यात ती दौलत अडकून पडलीय'' फकिरा आवाज चढवीत म्हणाला, ''तिला मोकळी करा! हो, पन आदी मला आईला, बाबाला, थोरल्या आईला एकदम भेटून येऊ दे. पर तुम्ही मानसांची जुळनी करा! शंभर मानसं कडवी घ्या नि चला'' हे सारं भिवानं ऐकलं होतं. तो पुढे म्हणाला, ''पर बामनाकडं बंदूक हाय. आनी बंदुकापुढं बळ बेकार व्हतं. भलताच मार हाय, म्हनं. माझं बळ तोफेपुढे बेकार व्हनार हाय!''

फकिरा तीव्र स्वरात म्हणाला, ''बंदूक? असू दे बंदूक! किती गोळ्या उडवील ती? एक एक मानूस दहादहा गोळ्या खाऊ या! पन जरा मानसावानी नी हिमतीनं! पंत म्हनीत, एक राजा हतं झाला. त्येच नाव मी इसरलो. त्यो राजा म्हनत व्हता, शेळी हूनशान शंभर वर्स जगन्यापरास वाघ हूनशान एक दिवस जगावं. आनी त्येच खरं हाय. वाघच होऊ नि वाघासारखं मरू या! चला, जमवा मानसं नि चला.''

या परिच्छेदातील ''त्यो राजा म्हणत व्हता, शेळी हूनशान शंभर वर्स जगन्यापरास वाघ हूनशान एक दिवस जगावं.'' डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अण्णा भाऊ साठे यांनी केलेले हे मानाचे वंदन आहे!

फकिरा या बहुचर्चित कादंबरीत बेडसगावचा खजिना लुटण्याची योजना आखतो तेव्हा भिवा शंका व्यक्त करतो म्हणूनच फकिरा त्याला वरील उत्तर देतो. याच कादंबरीत जॉनसाहेबांपुढे समर्पण करताना फकिराने हातातली तलवार टेबलावर ठेवली तेव्हा जॉनसाहेब फकिराला विचारतात, ''ही तलवार कुठं मिळाली?'' तेव्हा फकिरा म्हणतो, ''ही तलवार माझ्या पूर्वजाला शिवाजीराजानं दिली, ही तलवार घेऊन माझा बाप खोतासंग लढला नि मीही हिला घेऊन तुमच्याशी लढलो. तलवारीला धार नसेल तर ती काय कामाची? धारेवाचून तलवार नि बळावाचून बंड लटकं असतं.''


छत्रपती शिवाजी महाराज आणि क्रांतिसूर्य भीमरायांच्या स्वाभिमानी हिंमतबाज लढ्याला अण्णा भाऊ आपल्या कादंबरीतून केवळ वंदन करीत नाहीत तर त्यांना जनतेपुढे आणून प्रेरणा देतात. मांग-महारांच्या शौर्याची गाथा असलेली ही कादंबरी वाचकवर्गाला मोठ्या प्रमाणात स्पर्श करून गेली.

❖❖❖

# अण्णा भाऊ साठे यांचे महाराष्ट्र दलित साहित्य संघ उद्‌घाटनपर भाषण, दि. २ मार्च १९५८

नियोजित अध्यक्ष, स्वागताध्यक्ष, कार्यवाह व बंधू भगिनींनो,

या महाराष्ट्र दलित साहित्य संमेलनाचे उद्‌घाटन माझ्यासारख्या एका दलितानं करावं हा एक अपूर्व असा योग असला, तरी हे आचार्य अत्रे यांचे कार्य करीत आहे याची जाणीव आहे.




दलित साहित्यिकाचे वेगळे संमेलन भरवून हा सवतासुभा का उभा करता, असा प्रश्न काही मंडळी करीत आहेत. काहींच्या मते अस्पृश्यता निवारण करणारा कायदाच अस्तित्वात असल्यामुळे आज दलित हा शब्दच निरर्थक झाला आहे. सर्व काही ठीक आहे. परंतु हा प्रश्न निर्माण करणारे दलितांना माणूस मानतात; पण त्या दलितांचा एक वर्ग आहे ही गोष्ट ते मान्य करीत नाहीत आणि त्यामुळेच हा वरील प्रश्न निर्माण

होत आहे.

कारण केवळ महाराष्ट्रापुरतेच बोलायचे झाले, तरी दलित माणसाचा मोठा वर्ग या महाराष्ट्रात अस्तित्वात आहे. त्यांचे जीवन वेगळे असून, इतर वर्गाशी ते संलग्न आहे. हा वर्ग या देशात अग्रेसर असून त्याच्या न्यायी संघर्षाचे परिणाम सर्व समाजावर होत असतात. तो या देशाचा सामाजिक, सांस्कृतिक पाया आहे. परंतु तो पिळला जाणारा नि कष्ट करणारा दलित म्हणून निराळा आहे, नि उपेक्षित आहे.

आणि अशा या दलिताला आपले जीवनाचे स्पष्ट प्रतिबिंब आजच्या मराठी साहित्यात दिसत नाही. आजचे साहित्य आरशासारखे स्वच्छ असावे. त्यात आपले प्रतिबिंब स्पष्ट असावे एवढीच त्याची मागणी आहे. आपला चेहरा आहे तसा दिसावा असं वाटणं गैर नाही.

कारण तरंगमय तळ्यात पडलेली सावली जशी लांबळुकी नि डगमगती दिसते तद्वत आजचा दलित आजच्या साहित्यात दिसतो. हा दलित आजच्या समाजाचे हृदय आहे, त्या हृदयाचे स्पंदन होत असते. हा माणूस कष्टासारखे खडतर कर्म का करतो हे जोपर्यंत लेखकाला कळत नाही, तोपर्यंत तो त्याचे दलिताचे साहित्य निर्माण करू शकत नाही. दलित वर्गाचे अथांग जीवन दिसण्यासाठी लेखकाला एक दिव्यदृष्टी असावी लागते. तो त्या वर्गाशी एकनिष्ठ असावा लागतो. तो वस्तुनिष्ठ असावा लागतो आणि त्याचा दलितवर्गाच्या सर्व न्यायी संघर्षावर नि त्याच्या अंतिम विजयावर विश्वास असला पाहिजे. म्हणजे तो लेखक ध्येयवादी असला पाहिजे, नि त्याची कल्पकताही अशीच हवी.

माणूस जगतो का? नि जगण्यासाठी एवढा धडपडतो का? याचा विचार आम्ही करणे जरूर आहे. त्या धडपडणाऱ्या पतिताला आम्ही भित्रा समजून जो उंच गगनात गेलेल्या विद्युतमय मनोऱ्यावर उभे राहून हा दलित विजेच्या तारा जोडतो, खाणीत उभ्या कड्यावर चढून सुरुंगांना पेट देतो किंवा पोलादाच्या रस करणाऱ्या भट्टीवर तो निर्भय वावरतो आणि या सर्व ठिकाणी मृत्यू त्याची वाट पाहत असतो. कधी कधी त्याची व मृत्यूची गाठ पडून हा दलित कष्ट करीतकरीत मरण पत्करतो. ही जगण्याची नि मरण्याची आगळी रीत आहे. ती लेखकाने समजून घ्यावी. सुरुंगांना पेट देता-देता किंवा पोलादाच्या रसात बुडून मरणे,

◆ *'साहित्याला नुसते कल्पनेचे डोळे असून भागत नाही, तर जीवनाचे पंखही हवे असतात.'* ◆

नाही तर विजेच्या धक्क्याने मरणे, आणि दिवाळे निघाले म्हणून शेअर बाजारात मरणे या मरणातील अंतर लेखकाने मोजून पाहणे नि श्रेष्ठ मरण कोणते ते निश्चित ठरवावे.

इतरांप्रमाणे दलिताच्याही सर्व भावना सदैव जागृत असतात. पण तो इतरांपेक्षा जरा निराळा असतो. कारण तो हाडामांसाचा केवळ एक गोळा नसतो. तो निर्मितीक्षम असतो. तो वास्तव जगात कष्टाचे सागर उपसून दौलतीचे डोंगर रचतो. अशा या महान मानवावर महाकाव्य रचणारा त्याला हवा असतो.

एका झाडाखाली तीन दगडांची चूल करून मडक्यात अन्न शिजवून दोन मुलं नि बायको यांना जगविणारा हा दलित वरवर कंगाल दिसला, तरी त्याची संसार करण्याची इच्छा केव्हाही पवित्र अशीच असते. कुटुंबसंस्थेवरचा त्याचा विश्वास मुळीच ढळलेला नसतो. परंतु त्याची कुटुंबसंस्थाच भांडवलदारी जगाने त्या झाडाखाली हाकलून देणारी असते. त्याचे आम्ही निरीक्षण करावे, याची कारणपरंपरा शोधावी आणि मग त्या कंगाल दिसणाऱ्याविषयी लिहावे. जपून लिहावे. कारण या समाजाची घडीन्‌घडी त्या दलिताने व्यापवली आहे. अधिक काव्यमय शब्दात बोलायचे झाले तर असे म्हणता येईल की, ''हे जग, ही पृथ्वी शेषाच्या मस्तकावर नसून दलितांच्या तळहातावर तरलेली आहे.'' अशा या दलिताचे जीवन खडकातून झिरपणाऱ्या पाझराप्रमाणे असते ते जवळ जाऊन पाहा. मग लिहा. कारण ''जावे ज्याच्या वंशा तेव्हा कळे'' हे तुकारामांचे म्हणणे खोटे नाही.

म्हणून दलिताविषयी लिहिणाऱ्यांनी प्रथम त्याच्याशी एकनिष्ठ असले पाहिजे. 'तू गुलाम नाहीस हे जग तुझ्या हातावर आहे.' याची जाणीव करून द्यावी. त्याचे जीवन वरच्या पातळीवर नेण्याची शिकस्त करावी आणि त्यासाठी लेखक हा सदैव आपल्या जनतेबरोबर असावा लागतो. कारण जो कलावंत जनतेबरोबर असतो त्याच्याबरोबर जनता असते. जनतेकडे पाठ फिरवणाऱ्याकडे साहित्यही पाठ फिरवीत असते. जगातील

सर्व श्रेष्ठ कलावंतांनी वाङ्मय हा जगाचा तिसरा डोळा मानला आहे आणि तो डोळा सदैव पुढे जनतेबरोबर असणे जरूर आहे.

परवा मराठी भाषेसाठी जनतेने अभूतपूर्व असा संग्राम दिला. खऱ्या अर्थाने तो लढा मराठी साहित्यासाठीच होता नि आहे. त्या लढ्यात सोळा सोळा वर्षांच्या मुलींनी आत्मबलिदान दिले. त्या लढ्यात जे कलावंत जनतेबरोबर होते त्यांनी या महाभारतावर कवने रचली. कुणी मराठी भाषेची महती गायली. त्या कलावंतांना हा महाराष्ट्र कधीच विसरणार नाही. परंतु जो कलावंत जनतेबरोबर नसतो, जो बंद खोलीतील कला मांडीवरच्या खुणा मोजतो ती मांडीवरच्या खुणा मोजणारी आम्हा दलितांची कला नसते. आमची कला डमडम गोळीच्या खुणा मोजते, ते आमचे साहित्य. त्याचबरोबर दलित स्त्रियांच्या गालावरच्या तिळावर जी सुंदर कलाकृती असेल ती कलाकृती आमची. जो कलावंत ध्येय जाणत नाही. जनता जाणत नाही, तो कोणत्या मार्गाने जातो याची कैक उदाहरणे देता येईल. आम्हांला जे दिसते ते आम्ही लिहितो, कला ही वर्गातीत असावी, प्रचारातीत असावी असा त्याचा दावा असतो. आणि अशा या कलावंताचा आज बोलबालाही कमी नाही. परंतु जो जनतेला जाणत नाही, तो तिला विद्रूप करतो याचे नमुने मराठी साहित्यात मुबलक मिळतात.

एका बारा वर्षांच्या मुलीचे बोक्यावर प्रेम बसणे आणि त्याने कामवासना तृप्त करावी म्हणून तिची चड्डी फेडणे या कथेला काय नाव देता येईल? ही माणसाला हैवान करीत नाही? एक कारकून संततिनियमन करावे म्हणून स्वतःवर शस्त्रक्रिया करून घेतो. पण त्याची तिसऱ्यांदा पत्नी गरोदर राहते म्हणून जो झुरतो याचा अर्थ ती बाई व्यभिचारी होत नाही? कथेपासून आम्ही काय शिकावे?

महिला संघाची अध्यक्ष बाई पुण्याहून मुंबईस येत असता गाडीत भेटलेल्या एका माणसाबरोबर अखेरचा डाव खेळते. ही माणसांची निंदा नाही का? या कमला फडकेच्या कथेत मराठी माणूस आणि दलित तर मुळीच नाही हे फडके पत्नी-पतीचे वाङ्मय 'असेच' नाही याचाच अर्थ जो ध्येय जाणत नाही तो जनतेला विद्रूपच वाटतो. हे सर्व मनोविश्लेषणवादाची रापी घेऊन माणसांची कातडी सोलू लागले

◆ ***उत्तम कला प्रचारकी होतेच व उत्तम प्रचार हा कलात्मक बनतो. उत्तम कलेचा विषय हा मनुष्य असल्यामुळे व मनुष्याचे जीवन व आत्मा वर्गबद्ध समाजामध्ये वर्गीय गुणांनी वेढलेला असल्यामुळे त्या कलेला वर्गीय स्वरूप येतेच येते.*** ◆

आहेत. म्हणून हे दलितांचे वेगळे साहित्य संमेलन भरत आहे एवढेच. हे मनोविश्लेषणवादी आपल्या वाङ्मयाचे समर्थन करताना म्हणतात, जीवनाच्या दोन बाजू असतात. पैकी एकीचा खोल जाऊन आम्ही अंत घेतो. परंतु नाशिकात गंगा आणि गटार दोन्ही अस्तित्वात आहे. तुम्ही गंगेऐवजी गटारच का पसंत करता?

आम्हांला गंगेसारखे पवित्र साहित्य हवे आहे. आम्हाला मांगल्य हवे आहे. आम्हांला मराठी साहित्याच्या थोर परंपरेचा अभिमान आहे.

कारण मराठी साहित्याची नांदी आमच्याच जीवन संघर्षाने झडली आहे, जेव्हा दलितांची सावली असह्य होती. महानुभावपंथीय साहित्यिकांनी सर्वांना ज्ञान मिळाले पाहिजे, ज्ञान हे मोक्ष असे समजून त्यांनी बंड केले. ते आमचे साहित्यिक. माणसाला माणूस म्हणून जगता आले पाहिजे असा दावा मांडून ज्यांनी दलितांच्या भाषेत महाराष्ट्राला सुंदर ज्ञानेश्वरी दिली ते आमचे साहित्यिक आणि चुकलेले महाराचे मूल कडेवर घेऊन जाणारे ते एकनाथ, ते आमचे साहित्यिक. जो दलिताला कडेवर घेतो, त्याला जिभेवर घेतो आणि ज्याला जो विद्रूप करतो, त्याला दलित विद्रूप करतो अशी इतिहासाची साक्ष आहे.

शब्दांना नुसता आकार देणे शक्य व सोपे असते. त्या आकाराला आत्मा देणे त्याहून अवघड आहे. तेदेखील काही लेखकांना सहज साधून जाते. पण त्या आत्म्यामागची इतिहासपरंपरा शोधणे आणि तिचा अर्थ लावणे फार अवघड आहे.

हा आचार्य अत्रे यांचा खुलासा आम्ही दलित लेखकांनी समजून त्याचा अर्थ लावावा आणि इतिहासपरंपरा शोधण्याचा प्रयत्न करावा. आपण आपल्या वर्गाचे इमान पटवून त्याचा उपमर्द होणार नाही याची काळजी घेऊन त्याचे साहित्य निर्माण करू या. या दलिताचे जीवन सुखी

व समृद्ध कसे होईल याची काळजी करू या, या दलिताला नि त्याच्या जीवनाला वरच्या पातळीवर नेण्याचा आपल्या कलेतून प्रयत्न करू या.

काही विद्वान म्हणतात, ''अस्पृश्यता कायद्याने नष्ट केली आहे. तेव्हा दलित हा प्राणी अस्तित्वात नाही. परंतु हा केवळ भ्रम आहे. एका गावात एका सार्वजनिक आडावर पाणी भरताना उच्चवर्णीय हिंदूंची काळजे धडधडतात. महारमांगाचा पोवरा जोपर्यंत पाण्यात आहे तोपर्यंत आपला पोवरा पाण्यात सोडत नाहीत. कित्येक होटेलात 'खास' कप ठेवलेले आढळतात. याचे कारण युगायुगाचे समज एका क्षणात नष्ट होत नसतात. म्हणून आम्ही दलित साहित्य निर्माण केले पाहिजे. एके ठिकाणी गॉर्की म्हणतो, ''शब्द आणि कल्पनाच्या साधनावर उभारलेल्या या कलेचे खरे वैशिष्ट्य मानवी चुकांचे ज्ञान करून देणे हेच आहे असे म्हणता येत नाही. मानवाला त्याच्या बाह्य जीवनाच्या परिस्थितीतून वरच्या पातळीवर नेण्याचा प्रयत्न करणे, त्याला कमीपणा आणणाऱ्या वास्तव जगाच्या बंधनातून मुक्त करणे आणि 'तू गुलाम नाहीस तू वास्तव जगाचा धनी आहेस, तू जीवनाचा स्वतंत्र निर्माता आहेस.' असा साक्षात्कार मानवाला करून देणे हे वाङ्मयाचे खरे वैशिष्ट्य आहे. या अर्थाने वाङ्मय सदैव क्रांतिकारक असते.'' म्हणूनही वरील अर्थाने परिपूर्ण असे साहित्य निर्माण करू या आणि लेखण्या दलितांच्या चरणी अर्पू या एवढेच.

**- अण्णा भाऊ साठे**

२ मार्च १९५८

❖❖❖

## ● पारंपरिक मराठी साहित्य

रात्रीच्या शाळेत मार्क्सवादाचे धडे घेणारे अण्णा भाऊ १९४५ सालाचे ‘नवकथेचं युग’ म्हणून समीक्षक कौतुक करतात. त्याच काळात लेखक म्हणून लिहायला लागले हा काही योगायोग नाही. जिथे नुसती एकेरी वर्गीय भूमिका घेऊन लिहिले तर कोलाहल माजत होता. तिथे वर्गीय जातीचे चित्रण केले तर काय झाले असते? मराठीतल्या अशा करंट्या तुसडेपणाची परंपरा जातिप्रथेत पाय रोवून उभी आहे.

हिंदू उच्चजातीय समाजसुधारक जातीचा प्रश्न मानसिक मानीत असल्याने त्यांनी जातीचा प्रश्न कौटुंबिक जीवनात (उच्चजातीय) हिंदू कुटुंबापुरता मर्यादित सुधारणा करण्यासाठी हाती घेतला. म्हणून हे समाजसुधारक औषनिषदीय व ख्रिश्चन एकेश्वरवादाच्या व अध्यात्मवादी तत्त्वज्ञानाच्या पलीकडे गेले नाहीत. त्यांच्या प्रभावाखालील मराठी साहित्यात ‘‘इंग्रजी राज्य येण्यापूर्वी विद्येच्या प्रांतात ब्राह्मण-प्रभू-सारस्वत इत्यादी जमाती आघाडीवर होत्या. त्यामुळे पाश्चिमात्य विद्येचा प्रसादही प्रथम त्यांच्याच हातावर पडला. परंतु येथील साहित्याच्या विकासाला त्यामुळे जबरदस्त कुंपण पडलेले आहे, हे मात्र नाकारता येणार नाही. गेल्या शंभर वर्षांच्या दलित वाङ्मयात एक प्रकारचा तोचतोचपणा कोंदाटून बसला आहे. असा आक्षेप वारंवार घेतला जातो. ज्या परिस्थितीचा मी निर्देश केला, त्या परिस्थितीत असे होणे अनिवार्य की आपल्या जागेवरून समग्र समाजजीवनाचे यथार्थ दर्शन त्याला कधीच घेता यावयाचे नाही. उंबरातल्या किड्याने कितीही धावपळ केली तरी तो त्या चिमुकल्या जगाची सरहद्द ओलांडू शकत नाही. त्याप्रमाणे या लोकांच्या प्रतिभाही जातिभेदांच्या सीमेजवळ पांगळ्या पडतात.’’ अशा प्रकारे वि. वा. शिरवाडकरांनी मराठी साहित्यावरील ब्राह्मणी प्रभाव दाखवला आहे.

## अण्णा भाऊंची साहित्यविषयक भूमिका

‘साहित्याला नुसते कल्पनेचे डोळे असून भागत नाही, तर जीवनाचे पंखही हवे असतात.’ अशा शब्दात अण्णा भाऊंनी आपली साहित्याविषयी भूमिका ठसठशीतपणे मांडली आहे. त्यांच्या ‘वैजयंता’ कादंबरीच्या प्रस्तावनेत आणि १९५८ मध्ये मुंबई येथे भरलेल्या पहिल्या दलित साहित्य

◆ *भाऊंनी ''जे हौसेने उपवास करतात त्यांच्या साहित्यात विनोद येतो, परंतु जे सक्तीने उपवासी असतात त्यांच्या साहित्यात क्रांतीच्या ठिणग्या उडत असतात.'' अशा कडक शब्दांत ठणकावले* ◆

संमेलनाच्या उद्‌घाटनप्रसंगी भाषणातून त्यांनी मार्क्सवादी दृष्टिकोन कलेच्या संदर्भात व्यक्त केला आहे. त्यांच्यावर ते प्रचारकी लिहितात. असा आरोप होताच मराठीतील रंजनवादाचा समाचार त्यांनी 'चित्रा' या कादंबरीच्या प्रस्तावनेत, ''गाठी मारण्याचा आणि सोडण्याचा माझा काही परंपरागत धंदा नाही. तसा मी पुरोहित नाही. हे काम आम्ही फडक्यांकडे सोडून दिले. मी जन्मलो मांग जातीत. माझ्याकडे वास्तव जीवनानुभवाच्या आणि जीवनाच्या आघाडीवर अथक लढणाऱ्या कष्टकरांच्या संघर्षाचा भरपूर साठा आहे. त्यामुळे कथांचे पीळदार दोर मी वळत असतो.'' अशा शब्दात अण्णा भाऊंनी मराठी ब्राह्मणी रंजनवादाला शरण जाण्याचे नाकारले. ते केवळ 'कम्युनिस्ट कलावंत' असल्याने हे शक्य झाले हे आपण लक्षात घेतले पाहिजे. जीवनातील अनुभवाला वास्तवाच्या पायावर उभे करून अण्णा भाऊंनी रंजनाला सामाजिक ध्येयाची जोड देऊन अजोड साहित्यनिर्मिती केली.

त्यांच्या साहित्यनिर्मितीला समीक्षकांनी प्रचारकी हिणकस ठरवल्याने व ते 'कम्युनिस्ट' असणे हा ब्राह्मण मराठी समीक्षेच्या ठायी गुन्हा असल्याने या प्रवृत्तीचा समाचार कॉ. डांगेंनी अण्णा भाऊंच्या शाहिरीला प्रस्तावना लिहिताना घेतला–

''कम्युनिस्ट कलावंताची कृती वर्गीय दृष्टिकोनाची असते व ती प्रचारकीही असते. पण हा गुन्हा नाही. कारण वर्गबद्ध समाजाच्या साहित्यामध्ये आजपर्यंत ज्या ज्या नामांकित कलाकृती झाल्या त्या प्रचारकीच होत्या. उत्तम कला प्रचारकी होतेच व उत्तम प्रचार हा कलात्मक बनतो. उत्तम कलेचा विषय हा मनुष्य असल्यामुळे व मनुष्याचे जीवन व आत्मा वर्गबद्ध समाजामध्ये वर्गीय गुणांनी वेढलेला असल्यामुळे त्या कलेला वर्गीय स्वरूप येतेच येते. मराठी वाङ्‌मयाचेच बोलायचे तर विचारून पाहा, की महानुभवाचे गद्य दडविले का गेले? त्यांची सुंदर कलाकृती

'रुक्मिणी स्वयंवर' आदी मराठी भाषेतील आद्यग्रंथ लुप्त का करण्यात आले? व कोणी केले? विचारून पाहा, की ज्ञानेश्वरीकर्त्यावर जुलूम का झाले? तुकारामाच्या गाथा बुडविल्या का व कुणी? आणि तरीसुद्धा जनता त्यांना विसरली का नाही? आणि कोण म्हणेल की त्यामध्ये कला-काव्य नाही. त्यात प्रचार नाही व वर्गदृष्टी नाही?''

*(शाहीर : प्रस्तावना - एस. ए. डांगे. पृष्ठ ९/१०)*

कॉ. डांगेंच्या ठायी अण्णा भाऊंचे लिखाण गुन्हा नसले तरी प्रस्थापित ब्राह्मणी मराठी समीक्षेच्या ठायी गुन्हाच होता.

या व्यवस्थेने उच्च जातींना श्रम नाकारले व शूद्रातिशूद्रांना ज्ञान! अण्णा भाऊ साहित्यिक बनून एक अतिशूद्र मांग लेखक म्हणून सारस्वतांच्या दरबारात विराजमान होऊ पाहत होता, हा धर्मशास्त्रदृष्ट्या त्यांचा गुन्हा होता म्हणून एक तर त्यांना अनुल्लेखाने मारले गेले किंवा प्रचारकी म्हणून नाकारले गेले. मराठीत विनोदाची पाणपोई उघडणाऱ्यांना अण्णा भाऊंनी ''जे हौसेने उपवास करतात त्यांच्या साहित्यात विनोद येतो, परंतु जे सक्तीने उपवासी असतात त्यांच्या साहित्यात क्रांतीच्या ठिणग्या उडत असतात.'' अशा कडक शब्दांत ठणकावले आणि आपल्या कादंबऱ्यांमधून सुसंस्कृत कष्टकरी माणसांचा, त्यांच्या जगण्याचा निखारा फुलत ठेवला.

फकिरा, वैजयंता, चंदन, चित्रा या अण्णा भाऊंच्या कादंबऱ्या म्हणजे भांडवली व जातीय व्यवस्थेच्या ऊर्मी प्रहार आहे.

'फकिरा' ही अण्णा भाऊंची सर्वोत्तम कादंबरी आहे. अण्णा भाऊ भूतकाळाबद्दल जास्त लिहितात वर्तमान लिहीत नाहीत. अशी तक्रार वि. स. खांडेकरांनी फकिराच्या प्रस्तावनेत केली आहे. फकिरादी मांग महारांची अस्पृश्य वस्ती व कुलकर्णी, पाटलांची सवर्ण वस्ती यांना विभागणारी निवडुंगाची सीमारेषा जातिव्यवस्थेची नसून वर्गव्यवस्थेची आहे, हे अण्णा भाऊंनी फकिरात दाखवले आहे. फकिराच्या काळात ग्रामीण महाराष्ट्रात वर्गव्यवस्थेपेक्षा जातिव्यवस्था निश्चितच प्रबळ होती. पण अस्पृश्य शेतमजुरांचे दुःख स्पृश्य शेतमजुरांच्या वर्गीय दुःखाएवढेच असते. असे मनावर ठसवले गेलेल्या अण्णा भाऊंची प्रतिभा जातीय वर्गीय दुःखाचा ठाव घेऊ शकली नाही. असा आरोप कॉ. शरद पाटलांनी त्यांच्या 'अब्राह्मणी साहित्याचे सौंदर्यशास्त्र' मध्ये केला आहे.

अण्णा भाऊ वाटेगावला जन्मले. त्या काळी फकिरा हा वारणा खोऱ्यात प्रसिद्ध दरोडेखोर होता. अण्णा भाऊ जन्मले तेव्हा फकिरा वाटेगावला आला होता व इंग्रजांच्या लुटलेल्या खजिन्यातून त्याने अण्णा भाऊंच्या आईची सुवर्णमोहरांनी ओटी भरली होती. अण्णा भाऊ वयात आले तेव्हा घरातील मांगवाड्यातील म्हातारी माणसे फकिराच्या कथा रंजकपणे सांगत. लहानपणापासून मनात घर करून बसलेला फकिरा अण्णा भाऊंनी प्रौढपणात कादंबरी रूपाने पुढे आणला. मराठी साहित्यात 'मांग दरोडेखोर' नायक होणे हीच मुळी एक क्रांतिकारक घटना आहे. दुष्काळ पडल्यावर विष्णुपंत कुलकर्णी महारमांगांना धान्याची मदत करतो किंवा फरारी दरोडेखोरांना सोडवण्यासाठी जामीन राहतो. दक्षिण महाराष्ट्रात ब्राह्मणेतर चळवळीमुळे ब्राह्मण- ब्राह्मणेतरांत विस्तव जात नसला तरी अण्णा भाऊंचा विष्णुपंत जातीयवादी नाही. उलट साम्राज्यवादी इंग्रज सरकार दरोडेखोर सापडत नाहीत म्हणून मांगांची दारकोंड करतात. खजिना लुटण्यासाठी फकिराबरोबर असलेला मराठा सत्या त्यांच्या जातीची दारकोंड सरकार करीत नाही. इंग्रजांच्या फोडाझोडा नीतीवर अण्णा भाऊ अशा प्रकारे प्रकाश टाकतात. दुष्काळ, तापाची साथ, भूक-भूक करून मरणारे महार, मांग, रामोशी व त्यांच्या पाठीशी असलेला गाव असे एकीचे विदारक चित्रण अण्णा भाऊ करतात. सत्यशोधक चळवळी संस्कार दक्षिण महाराष्ट्रावर असल्याने तेथील पाटील सरंजामी नव्हते. जे मराठी चित्रपटात खलनायक म्हणून दिसले. मराठा शेतकरी जातीचे व त्यांच्या गावाशी असलेल्या भावकीचे भेदक चित्रण 'वारणेचा वाघ' व 'अकलूज' या कादंबऱ्याही उत्कृष्टपणे अण्णा भाऊंनी केले आहे.

मराठी शेतकरी जातीचे राजकीय चित्रण म्हणून ज्या ताम्रपटाला अरुण साधूसारख्या लेखकाने गौरविले आहे त्याच्या किती तरी अगोदर अण्णा भाऊंनी आपल्या कादंबऱ्यांमध्ये ते केलेले आहे.

'वैजयंता' ही अण्णा भाऊंनी तमाशा कलेवर बेतलेली कादंबरी. नर्तकी गजरा आपल्या मुलीला तमाशात न नाचवता चांगले जीवन देण्याचे स्वप्न पाहते. परंतु एकदा तरुण चंद्रा व गजरा यांच्या कलगीतुऱ्यात गजरा हारते व चंद्राचा पराभव करण्यासाठी वैजयंताला तमाशात आणते. भांडवली व्यवस्थेत स्पर्धा असते व दुसऱ्याचा द्वेष केल्याशिवाय माणसं स्पर्धा

◆ *फकिरा, वैजयंता, चंदन, चित्रा या अण्णा भाऊंच्या कादंबऱ्या म्हणजे भांडवली व जातीय व्यवस्थेच्या ऊर्मी प्रहार आहे.* ◆

जिंकू शकत नाहीत. माणसं बेफाम होतात. ईर्षेला पेटतात व आयुष्याची राखरांगोळी करून घेतात. तमाशातील स्त्रियांच्या वाट्याला येणारे सारे दुःख पुढे वैजयंताच्या वाट्याला येते. तमाशा ही पोटार्थी कला असली तरी अण्णा भाऊंच्या स्त्री नायिका आपले शील विकत नाहीत. त्यासाठी प्राणपणे संघर्ष करतात. आपल्या समाजव्यवस्थेने पाटलाची स्मिता व ब्राह्मणांची जयश्री चित्रपटातील तमाशात नाचली तर नर्तकी ठरते पण मांगाची विठा तमाशात नाचली तर ती नाचीण ठरते. अशा प्रकारे शूद्रातिशूद्रांच्या कलेला सन्मान नाकारला आहे. या सांस्कृतिक विभागामुळेच अण्णा भाऊ साठेमधला शाहीर तमाशा कलावंतांवर आपल्या कादंबऱ्यांचा फोकस ठेवतो.

'चंदन' आणि 'चित्रा' त्या अण्णा भाऊंच्या स्त्रीजीवनाचे दोन पदर उलगडणाऱ्या कादंबऱ्या. 'चंदन' ही एक लढाऊ कामगार स्त्री आहे. ती विधवा असल्याने मुंबईत जिथे जिथे कामाला जाते तिथे तिथे वासनेने वखवखलेल्या लांडग्यांकडून तिचा भोग घेण्याचे प्रयत्न होतात. परंतु धैर्यशील चंदन त्याचा सामना करते. प्रसंगी जेलही भोगते. कामगार म्हणून जगत असताना स्त्रीत्वामुळे येणारे दुःख पुरुष कामगाराच्या तुलनेत किती भयानक असते याचे हृदयस्पर्शी चित्रण अण्णा भाऊंनी केले आहे. परंतु अण्णा भाऊंची ही कामगार स्त्री विद्रोही नाही. ती केवळ स्त्रीच राहते. सामान्य कामगार म्हणूनच जगते. या तुलनेत आयटकच्या कार्यकर्त्या कॉ. पार्वतीबाई भोर यांची मुंबईतील बिटयी मिलच्या संपाच्या पार्श्वभूमीवर एका रणरागिणीची कहाणी. ही कादंबरी लढाऊ गिरणीकामगार स्त्रियांचा विद्रोह जास्त यथार्थपणे प्रतिबिंबित करते.

'चिखलातील कमळ', ही कादंबरी मुरळीच्या जीवनकथा सांगते. तुळसाला पाटलापासून सीता होते व पाटलाच्या आजारपणात त्याला बरे वाटावे म्हणून खंडोबाला नवस करून तुळसा सीतेला मुरळी बनवते. एका पिढीचा भोगवटा दुसऱ्या पिढीकडे चालू राहतो. स्त्री भोगवस्तू, उच्च

जातीयांची दासी इथपर्यंतच ही कादंबरी मजल गाठते. मुरळी जीवनाचे वर्गीय जातीय चित्रण बाबूराव बागूलांनी सूडमध्ये केले आहे. त्यांच्या जानकीसारखा विद्रोह ना तुळसा करते वा सीता. त्या मुरळीपणातच मिरवताना अण्णा भाऊ दाखवतात. त्यामुळे अण्णा भाऊ रचनातंत्रात प्रतिबिंबवादाचे बळी ठरल्याने ते आपल्या स्त्री पात्रांना विद्रोही म्हणून चितारत नाहीत. त्यांची स्त्री पात्रे मने हेलावतात. हादरवून सोडतात. पण मुक्या मुक्यानेच सोसतात. अण्णा भाऊंच्या स्त्री नायिकांचे हेच सामर्थ्य व मर्यादा आहे.

अण्णा भाऊंच्या कादंबऱ्यांतील सर्व पात्रे त्यांच्या भाषेत सांगावयाचे म्हणजे ''ही माझी माणसे असल्याने मी त्यांना कुरूप करत नाही.'' ही त्यांची प्रतिज्ञा असल्याने एक सत्त्वशील, नीतिमान सत्याचा आदर्श मानणारे व असत्याशी संघर्ष करणारी माणसे आपल्याला त्यांच्या कादंबऱ्यांमध्ये भेटतात. खरे तर आजचे दलित साहित्य हे जीवनातील कुरूपतेला प्रकाशात आणते आहे. अण्णा भाऊंच्या जीवनातील सौंदर्यावरच लिहीत राहिले. खरे तर त्यांना कुरूपता फार समर्थपणे चितारता आली असती. पण त्यांनी सभ्यपणाची, सुसंस्कृतपणाची स्वप्ने पाहत सौंदर्यच तेवढे टिपले. अण्णा भाऊंच्या या सौंदर्यस्थळात 'वर्गकलह' सुप्तपणे तर कधी उघडपणे व्यक्त होतो. त्याचे स्वागत आजच्या प्रकाश यत्रींनी करायला हवे.

अण्णा भाऊंची 'माकडीचा माळ' ही एक कलाकृती एक विलक्षण चित्र भरारून टाकणारी. कधीही विसरली न जाणारी अशी आहे. यात मनुष्य आणि प्राणी (माकड) याचं विलक्षण दर्शन तर आहेच. पण मनुष्यांची विविध रूपं येथे कोरीव लेण्यासारखी साकार झाली आहेत. भटक्या जमातीतील एक जगावेगळे जग आणि माकडवाला यंकू, त्याची आई वेगळी पोर, दुर्गा आणि यंकूचे माकड, गंग्या आणि माकडीण रंगी यांचा हा भटका संसार. यंकूचे व्यक्तिमत्त्व अफाट आहे. पण सारी कलाकृती दुर्गाभोवती फिरत आहे. लाडकी अवखळ लेक दुर्गा गावच्या इमानदाराच्या रंगराव पाटलाच्या वासनेचा वास होऊ घातलेली दुर्गा, यमूवर निखळ प्रेम करणारी दुर्गा अशी ही निर्मळ स्वच्छंद निर्भय आणि जिद्दीची दुर्गा कादंबरीभर आहे. या दुर्गासाठी तापापासून प्रियकरांपर्यंत आणि पोळलेल्या माकडापर्यंतही प्रत्येक जण प्राण देण्यासाठी तयार आहे.

◆ *दुष्काळ, तापाची साथ, भूक-भूक करून मरणारे महार, मांग, रामोशी व त्यांच्या पाठीशी असलेला गाव असे एकीचे विदारक चित्रण अण्णा भाऊ करतात.* ◆

अशी ही दुर्गा बापाच्या आधाराने साऱ्या संकटापासून पार पडून अखेर सुखाच्या मार्गावर पाऊल टाकते. बापाची हत्या होते. माकडे आपला जीव देतात, दोघांचीही कबर गोरगावचे लोक एकमेकांच्या शेजारीच खणतात. आपल्या अटळ भटकेगिरीवर येमूबरोबर निघतात. अखेरचा निरोप घेताना दुर्गा गोरीजवळ घुटमळत राहते. म्हणते, ''बापा, मी जाते. मी सासरी निघाले. तू आता मला दिसणार नाहीस. तुझी दुर्गा तुला दिसणार न्हाई. माझा सुखी संसार पाहायला तू दोन दिवसही जगला नाहीस. माझ्या लग्नापर्यंत जगायचं म्हणून तू सर्व काही करीत होतास. गंग्या आणि रंगी ही नशीबवान इमानी ठरली. त्यांनी तुझं इमान राखलं. तुझ्या अन्नाला ती जगली. ती दोघं चिरंतन तुझ्याजवळ राहणार. तुझ्या हाडाबरोबर यांचीही हाडं मातीला मिळणार.''...

**अण्णा भाऊ साठे यांची चित्रबोली - सतेज पोटे**

पंचाहत्तर वर्षांपूर्वी, वाटेगाव नावाच्या लहानग्या खेड्यात सह्याद्रीच्या काळ्या कडेकपारीत वसलेल्या एका चहुबाजूनं अंधारलेल्या, कसंबसं उभं असलेल्या घरात असू नये इतक्या गरीब, दलित कुटुंबात एका मुलानं जन्म घेतला आणि आपल्या जन्मजात हुन्नरबाज कला साहित्यगुणांवर, दुःखी-कष्टी अज्ञान अंधारात गुदमरलेल्या उभ्या मराठी मुलखातल्या माणसाला, जागं करून अवसान दिलं. आत्मभान दिलं. स्वाभिमान जागवला. माणूस म्हणून जगण्यासाठी अखेरपर्यंत झुंजार लढत द्यायला, माणसा-माणसाला हत्तीचं बळ दिलं.

तोच हा अण्णा भाऊ. पुढे तालेवार शाहीर, कथा कादंबरीकार अण्णा भाऊ साठे म्हणून नावाजत, गाजत राहिला!

ग्रामीण जीवनाचं पिळदार अनुभवदर्शन त्यांच्या असंख्य वाचकांना देत राहिला. मराठी माणसानं त्यांचं हे काळीजबोलीचं अक्षरधन आपल्या

लाडक्या एकुलत्या मुलासारखं जपलं!

मराठी चित्रपट जगात, भालजी पेंढारकर, ग. दि. माडगूळकर, व्यंकटेश माडगूळकर, दिनकर द. पाटील, शंकर पाटील, रणजित देसाई, वसंत सबनीस, द. मा. मिरासदार अशा प्रख्यात लेखकांनी आपल्या सुरेख ग्रामीण कथांनी, ग्रामीण मराठी बोलपट आरंभापासून आजपर्यंत बोलता ठेवला आहे. बंद्या रुपयाचं कौतुक मिळवलं आहे!

त्यांच्याच पंगतीत अण्णा भाऊ साठ्यांचा रंगीत पाट होता. मराठी चित्रपट निर्माता नव्या जोरकस चित्रकथांच्या शोधात असताना अण्णा भाऊंच्या कादंबऱ्या सहजी त्याच्या मनात भरल्या.

आणि बघता-बघता सलामीलाच त्यांच्या 'फकिरा' कादंबरीनं चित्रपटाचं अक्षय नवं रूप घेतलं. महाराष्ट्रातल्या मराठमोळ्या चित्रपट शौकिनांनी 'फकिरा' चित्रपटाचं उत्सवी स्वागत केलं आणि मग पाठोपाठ एकापेक्षा एक रगेल, रंगेल, वैजयंता, मुरली मल्हारी रायाची, अशी ही साताऱ्याची तऱ्हा, टिळा लावते मी रक्ताचा, डोंगरची मैना आणि वारणेचा वाघ, हे चित्रपट रुपेरी पडद्यावर रसिकप्रिय झाले. ज्या कादंबऱ्यांवरून हे चित्रपट आकारले त्या कादंबऱ्या होत्या; फकिरा, अलगुज, आवडी, माकडीचा माळ, चिखलातलं कमळ, वैजयंता आणि वारणेचा वाघ.

अण्णा भाऊ साठे या शब्दशक्तीच्या, प्रतिभाशाली बहाद्दर लेखकाने मराठी चित्रपटाच्या वैभवशाली नकाशावर आपलं सातारी ग्रामीण बोलीचं निशाण उंच फडकत ठेवलं!

अण्णा भाऊंच्या रूपानं एक अद्‌भुत गोष्ट आपण अनुभवतोय की, ते शाळेच्या कुठल्याच इयत्तेत शिकायला म्हणून मुद्दलात गेलेच नाहीत. मग प्रश्न पडतो साधारण माणसाला की, महाविद्यालयात जाऊनसुद्धा पदरी न पडणारं साहित्यिक शहाणपण त्यांच्यापाशी आलं कुठून?

मला तर याचं सोपं आणि स्वच्छ उत्तर समजलंय ते म्हणजे त्यांच्यापाशी काही उपजतच होतं आणि उरलेलं अनुभवी 'बिनभिंतीच्या विश्वविद्यालयातनं' अपार कष्टानं त्यांनी ते गोळा केलं होतं!

एक गोष्ट इथं समजून घेतली पाहिजे, की मुद्दलात अण्णा भाऊंनी ज्या कथा, कादंबऱ्या लिहिल्या त्या चित्रपटासाठी म्हणून मुद्दाम ठरवून लिहिल्याच नव्हत्या. परंतु त्यांची कथानकं मराठी माणसाशी आणि

◆ *तमाशा ही पोटार्थी कला असली तरी अण्णा भाऊंच्या स्त्री नायिका आपले शील विकत नाहीत. त्यासाठी प्राणपणे संघर्ष करतात.* ◆

मातीशी इमान राखणारी होती. रक्ताशी नातं जोडणारी होती. त्या चित्ररूपी कथा-कादंबऱ्या होत्या. कथा, प्रसंग, वातावरण, व्यक्तिरेखा, भवताल त्यांची अस्सल ग्रामीण रूपं, त्यांची शंभर नंबरी स्वाभाविकता, त्यांची काळजातली बोलभाषा, स्वभावविशेष हे सारं नाट्यमय तर होतंच शिवाय खरंखुरं होतं. कथारंभ आणि शेवट चढता आणि अखेर काळजाला भिडणारा होता.

खेड्यापाड्यातल्या माणसाच्या रोजच्या जगण्यातलं भलंबुरं, सुख-दु:ख, वेदना, पिळवणूक, श्रद्धा, अंधश्रद्धा, माणसामाणसातलं नातं, गावकुसाबाहेरील रात्रंदिवस भुकेनं तडफडणारं, अंधारानं, गरिबीनं मातीला टेकलेलं, अन्यायानं, रक्ताळलेलं, बेअब्रूनं देशोधडीला लागलेलं जगणं, मुलामाणसांचे आक्रोश अन्यायाविरुद्ध दिलेली झुंज हे सारं त्यात होतंच होतं.

शिवाय ज्या डोंगर दऱ्याखोऱ्यातला रानवारा पशुपक्षी, निसर्ग, झाडंवेली जिवंत माणसापेक्षा बोलकी होऊन, जिवलगासारखं जिवाभावाचं सुख:दु:ख बोलत होती.

त्यांच्या चित्रपटातल्या नायिका, नायक जयश्री गडकर, सूर्यकांत, अरुण सरनाईक, सुलोचना, उमा, असे गुणी कलाकार जिवंत करून गेले आणि गजानन जागीरदार, अनंत माने, वसंत पेंटर, गोविंद कुलकर्णी, मुरलीधर कापडी असे वेगवेगळ्या वैशिष्ट्यांचे हुशार दिग्दर्शक आपली ठळक ओळख देऊन भालजी पेंढारकर, ग. दि. माडगूळकर, व्यंकटेश माडगूळकर, शंकर पाटील... दिनकर द. पाटील, वसंत सबनीस, द. मा. मिरासदार, रणजित देसाई या ठळक लेखकांनी जसे ग्रामीण भाषेतले चित्रपट लिहिले, तसेच सरस नागरी भाषेतलेसुद्धा चित्रपट लिहिले. पण आमच्या अण्णा भाऊंनी खास चित्रपटासाठीच म्हणून कथा, पटकथा, संवाद लिहिले असं दिसत नाही. तशी संधी मिळाली असती तर चित्रपटाच्या तांत्रिक चौकटीत त्यांची तरबेज लेखणी काय पराक्रम दाखवू शकली असती याचा अंदाज करता

येत नाही! साहजिकच त्यांना कुणी चित्रपट लेखक म्हणून मोजत नाहीत! हे असं असलं तरी मराठी चित्रपटाच्या नोंदपटावर अण्णा भाऊंचं नाव झळकत राहिलंच!

**संदर्भ :**

लोकशाहीर तथा लोकलेखक अण्णा भाऊ साठे (संदर्भ ग्रंथ), प्रथम आवृत्ती - ऑगस्ट १९९६, प्रकाशिका - शुभांगी कन्नडकर, झेप प्रकाशन, द्वारा - शासकीय निवासस्थान, सी-१-३०३, पेठ रोड, नाशिक - ४२२००३.

## अण्णा भाऊ साठे यांच्या कथाविश्वातील नायक
## - डॉ. प्रकाश खरात

मराठी कथासाहित्याच्या इतिहासात अण्णा भाऊ साठे यांचे कथालेखन संख्यात्मक व गुणात्मकदृष्ट्या महत्त्वाचे आहे. त्यांच्या कथासाहित्याचा विविध अंगांनी मराठी समीक्षेत अभ्यास व्हायला पाहिजे होता. तो झाला नाही, असे डॉ. प्रकाश खरात म्हणतात. दलित साहित्य अथवा आंबेडकरवादी साहित्य चळवळीनंतरच खऱ्या अर्थाने त्यांच्या साहित्यलेखनाला न्याय मिळाला. मराठी कादंबरीच्या इतिहासात त्यांच्या कादंबरीचा साधा उल्लेखही केला नाही. हे दुःख अण्णा भाऊ साठे यांनी व्यक्त केले. हे जसे कादंबरीच्या बाबतीत घडले त्याप्रमाणे कथासाहित्याच्या बाबतीतही घडले. हे दिसून येते.

अण्णा भाऊंच्या कथासाहित्याने मराठी कथा समृद्ध झाली हे सत्य आज नाकारता येत नाही. आशय, विषय, वातावरण, उद्देश व पात्रे या कथारचनेतील महत्त्वाच्या घटकतत्त्वांनी त्यांच्या कथांचे निराळेपण सिद्ध केले आहे आणि प्रस्तुत लेखात डॉ. खरात यांनी 'नायक' यांचे निराळेपण या सूत्राचा विचार मांडला आहे.

अण्णा भाऊ साठे यांच्या कथालेखनात विविध प्रवृत्तींचा नायक वावरताना आढळतो. जगण्याचे विविध प्रश्न घेऊन संघर्ष देताना हे नायक दिसतात. कधी हा संघर्ष शहरातून वाढणाऱ्या झोपडपट्टीतील माणसांचा असतो. तर कधी हा संघर्ष खेड्यातून जीवन जगणाऱ्या व्यक्तींचा असतो. कधी हा संघर्ष सामाजिक न्यायासाठी असतो तर कधी हा संघर्ष पोटात अन्न घालण्यासाठी उचलणाऱ्या कष्टाचा असतो. त्यामुळे अण्णा भाऊंच्या

◆ *आपल्या समाजव्यवस्थेने पाटलाची स्मिता व ब्राह्मणांची जयश्री चित्रपटातील तमाशात नाचली तर नर्तकी ठरते पण मांगाची विठा तमाशात नाचली तर ती नाचीण ठरते.* ◆

कथाविश्वातील विविध व्यक्ती विविध प्रश्नांसाठी जीवननिष्ठ पद्धतीने व्यक्त होतात हे त्यांच्या कथांमधील निराळेपण आहे. त्यांना समकालीन असलेल्या कथालेखकांची पात्रे ज्या पद्धतीने बोलतात, कथेत वावरतात. त्यांची विचार करण्याची पद्धत ही दलितांच्या उन्नतीची बीजतत्त्व घेऊन साकार झालेली आहे. त्यांच्या अंतःकरणात प्रबोधनाचा विचार वादळासारखा घोंगावताना दिसतो. आपला विचार मांडताना त्यांच्या पात्रांच्या ठिकाणी निर्भीडपणा दिसतो. 'कोंबडीचोर' या कथेतील रामू, 'स्वराज्य कोणाला प्राप्त झाले?' हा सवाल गांधीवादी पुढाऱ्यासमोर टाकतो. स्वतंत्र भारतात दलितांना अजूनही पोटभर जेवण मिळत नाही. त्यांच्याकडे उत्पादनाची साधने नाहीत. शिक्षण घेऊन नोकरी मिळत नाही. सुंदर महानगरातील झोपडपट्टीमधील दलित माणूस आजही प्राचीन मध्ययुगीन आर्थिक दास्य भोगतो. या गुलामगिरीचे काय? या शोषणाचे काय? याला स्वराज्य म्हणायचे का? असे प्रश्न घेऊन अण्णा भाऊंचे नायक मराठी कथेत प्रकट झाले आहेत. हे जे चित्र आहे ते फक्त अण्णा भाऊच काढू शकले. असे नायक त्या काळात फक्त अण्णा भाऊंच्याच कथाविश्वात प्रकटले आहे. या नायकांची जी भाषा आहे ती मानवतेच्या आंदोलनाने प्रेरित झालेली आहे...

'स्मशानातील सोनं'मधील भीमा हा कोल्ह्यांसोबत झुंज देतो. प्राण्यासोबत अन्नासाठी झगडा करतो. स्वतःचे अन्न मिळवत असताना अडथळे निर्माण करणाऱ्या कोल्ह्यांना पिटाळतो. सभोवतालच्या जीवनात गरिबांची भाकर म्हणजेच हक्क हिसकावून घेऊन चैन करणारी माणसं अण्णा भाऊंनी पाहिली आहेत. त्यांच्यासमवेत झुंज घेतल्याशिवाय भाकर म्हणजेच हक्क मिळणार नाहीत. ही जाणीव अण्णा भाऊंची पात्रे देतात. त्यांच्या कथालेखनातील नायक शिकवतात. अशी चेतना देणारी पात्रे फक्त अण्णा भाऊंच्याच कथेत विपुल प्रमाणात आढळतात. त्यांचे नायक हे 'भाकर' जशी भाकर आहे हे सांगताना भाकर हे एक मानवी मूल्य

आहे हेदेखील सांगतात आणि त्यासाठी झुंज देणारी माणसं त्यांच्या कथालेखनात प्रकट झालेली आढळतात. ...

अण्णा भाऊंचे नायक हे प्रामुख्याने भारतीय समाजातील पिळले गेलेले जे सामाजिक स्तर आहेत त्यामधून आले आहेत. आर्थिक व सामाजिक दृष्टीने जे वर्तमान भारतात पराकोटीचे दारिद्र्य जगतात अशा मानवी समूहातून ते नायक प्रकट झाले आहेत. आधुनिक साहित्यात अशी माणसं वा नायक अण्णा भाऊंचीच आहेत त्यांना समकालीन असलेली नवकथा व नवकथाकार कथेला जीवनाकडे घेऊन न जाता तंत्रवादाकडे नेत होते. नवकथाकार गंगाधर गाडगीळ, अरविंद गोखले, व्यंकटेश माडगूळकर यांनी आपापली पहिलीवहिली कथा प्राण्यावर लिहिली आणि अण्णा भाऊ साठे, बंधुमाधव, शंकरराव खरात यांनी पहिली कथा माणसांवर लिहिली. यामधून जीवनाकडे पाहण्याचे त्यांचे दृष्टिकोन आपणास दिसतात. माणूस हा केंद्र मानून कथा लिहिणे यामधून करुणा साकार झालेली आढळते. ...

अण्णा भाऊंचे नायक जसे दारिद्र्याबद्दल बोलतात त्याप्रमाणे इतिहासाबद्दलही बोलतात. संशोधक इतिहासकाराच्या मनाने इतिहासाचा शोध घेत प्रकटतात. भारताचा पराक्रमी इतिहास दलितांना वगळून साकार झालेला नाही. संपूर्ण समाजव्यवस्था दलितांनी तोलून धरली. एक मोठी भूमिका त्यांच्या श्रमाने साकार झाली. म्हणूनच अण्णा भाऊंनी म्हटले होते की, पृथ्वी शेषाच्या मस्तकाने तोलून धरली नसून दलितांनी तळहातावर तोलून धरली आहे. कारण उंच उंच आकाशाचा मुका घेणाऱ्या इमारती दलितांच्या श्रमातून उभ्या राहिल्या आहेत. ...

अण्णा भाऊंच्या कथेत अनेक विनोदी नायकही आहेत. ते फक्त विनोदासाठी निर्माण करीत नसून, समाज परिवर्तनाचे तत्त्व घेऊन विनोद करतात. त्यांची पात्रे एका उच्च कोटीतील विनोदाला जन्म देतात. हे त्यांच्या व्यक्तिरेखांचे वैशिष्ट्य आहे.

अण्णा भाऊंची 'सावळा' ही व्यक्तिरेखा चारित्र्यप्रधान अशी आहे. इतर अनेक नायकांमध्ये सावळा हा उठून दिसतो. जन्माने मातंग असलेला हा नायक जन्माने श्रेष्ठ म्हणविणाऱ्यांमध्ये महान आहे. त्याच्या ठिकाणची नैतिक मूल्ये उच्च कोटीतील आहेत. एका श्रेष्ठ नैतिक मूल्यांची धाराच नायकातून, त्याच्या रक्तातून वाहताना दिसतो. अण्णा भाऊंना 'सावळा'

◆ *अण्णा भाऊंच्या कादंबऱ्यांतील सर्व पात्रे त्यांच्या भाषेत सांगावयाचे म्हणजे ''ही माझी माणसे असल्याने मी त्यांना कुरूप करत नाही.''* ◆

या नायकांत ही श्रेष्ठ मूल्ये दिसली. त्यामुळे त्यांचा हा नायक चारित्र्यप्रधान म्हणून स्मरणातून हरपत नाही. कोणत्याही पारंपरिक देवादिकापेक्षा सावळाचे चारित्र्य जास्त माणुसकीने भरलेले वाटावे, असेच आहे.

भीमा, भोमक्या, चंगीजखान, काळेमाशार, शामा, बरबाद्या कंजारी, हरबा, दादा न्हावी, गणू, रामू, वेताळ असे किती तरी नायक त्यांच्या कथासृष्टीत वावरताना दिसतात. गणूजी रामोशी, चिमा म्हातारी अशी वृद्ध माणसेही अनेक भेटतात. वयोमानानुसार किती तरी व्यक्तिदर्शन अण्णा भाऊंनी घडविली आहेत. हे सगळे स्त्री-पुरुष अण्णा भाऊंनी मराठी कथेत साकार करून एक विराट मेळावाच वाङ्मयाच्या दरबारात उभा केला. या सगळ्या स्त्री-पुरुष व्यक्तिरेखा वेगवेगळ्या भावभावनांनी डवरून आल्या आहेत. वेदना तसेच विद्रोहाच्या धाग्यांनी आडवी उभी विणली आहेत. करुणा, प्रेम, मैत्री व नीतिमत्ता या मूल्यजाणिवांची रंग घेऊन आविष्कृत झाली आहेत. त्यामुळे त्यांची एक अण्णा भाऊ साठे नावाची कथामुद्राच मराठी कथासृष्टीत आकाराला आली आहे आणि त्यामधील नायक मुद्रेवर जीवनवादी व परिवर्तनवादी आशयतत्त्व कोरलेले आहे. त्याला अण्णा भाऊंच्या मनाचे सौंदर्य आहे. त्यांची न्यायावर आधारलेली जीवनसृष्टी आहे. इतिहासाकडून प्राप्त झालेले द्रष्टेपण आहे. त्यामुळे अण्णा भाऊंचे नायक या समग्र मराठी कथालेखनात स्वतःचे निराळेपण घेऊन आले आहेत. ...

## अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यातील नायिका
## - श्रीमती तारा रेड्डी, प्रा. इंदिरा आठवले

अण्णा भाऊंच्या नायिकांचे दर्शन घेत असताना विविध साहित्यप्रकारांतून त्या आविष्कृत झालेल्या दिसून येतात. अण्णा भाऊंची नायिका सर्वप्रथम लोकनाट्याची आणि वगनाट्याची नायिका म्हणून लोकनाट्य, तमाशाच्या दृश्याला या माध्यमाच्या द्वारे रसिकांसमोर आली. त्यानंतर कथा, कादंबरी,

नाटक या वाङ्मय प्रकाराच्या माध्यमातून अण्णा भाऊंची नायिका वाचकांसमोर आली आहे. अण्णा भाऊंची नायिका मराठी साहित्य विश्वाला त्यापूर्वी माहीत नसलेली, ज्ञात नसलेली एक आगळीवेगळी नायिका आहे.

प्रत्यक्ष जगलेल्या जीवनाने दिलेल्या अनुभवाच्या कटुतेची चव अण्णा भाऊंच्या जिभेवर तरळते आहे. मिश्र जीवनानुभवाच्या आधारावर अण्णा भाऊंचे कलाविषय उमलले आहेत. त्यामुळे त्यातील अण्णा भाऊंची नायिका ही रणझुंजार, संघटक अशी ती जीवन व्यवहारातील नायिका आहे. अण्णा भाऊंच्या कलापथकामध्ये त्या काळातल्या सुशिक्षित, प्रशिक्षित, सुप्रसिद्ध स्त्रियांनी कामे केली आहेत. कुसुम अमर शेख, उषा उर्ध्वरेषे, सौ. पटेल, शांता साठे, प्रेरणा अमर शेख ही त्यापैकी काही नावे होत. या स्त्रियांनी उभी केलेली नायिका ही १९४० ते १९६० या काळात भारताच्या जनसंघर्षाच्या अग्रदलाची नेतृत्व करणारी नायिका आहे. नायिकेचे पारंपरिक दर्शन अण्णा भाऊंनी नाकारले... या काळातल्या लेखनातील एक प्रातिनिधिक नायिका या दृष्टीने अण्णा भाऊंची 'माझी मैना' या छक्कडमधील नायिका प्रत्यक्षात समजून घेण्यासारखी आहे.

*'माझी गावावर राहिली मैना*
*माझ्या जीवाची होतीया दैना'*

या धृवपदामध्ये प्रीती विरहाने व्याकूळ झालेल्या नायकाने रसिकासमोर उभी केलेली करुणार्द्र मैना उभी राहते.

*ओति बांधा । रंग गव्हाळा ।*
*कोर चंद्राची । उदात्त गुणांची ।*
*मोठ्या मनाची । सीता माझी रामाची ।*
*हसून बोलायची । मंद चालायची ।*
*काठी आंधळ्याची । तशी ती माझी गरिबाची ।।*

नायिकेचे हे वर्णन मराठी शाहिरी वाङ्मयात पूर्णतः नवीनच मानावे लागेल. स्त्री वर्णनाची ही अभिजात अभिरुची मराठी शाहिरी वाङ्मयात शोधून तरी सापडते का? स्त्री आणि तिचे जीवन समग्र जीवन व्यवहाराचा एक भाग आहे. त्याचे भान कलावंत अण्णा भाऊंनी कधीही सोडलेली नाही. म्हणूनच 'माझी मैना' या छक्कडचा शेवट करताना कवी म्हणतो :

*चीड बेकीची । गरज एकीची ।*

◆ ***आपल्या फुलाफळांच्या रूप, रस, गंधातून ते व्यक्त करावे, तसा अण्णा भाऊंच्या साहित्याने सारा परिसर जिवंत केला आहे.*** ◆

*म्हणून विणवणी आहे या शिवशक्तीला शाहिराची ।*
*आता वळू नका । कुणी पळू नका । कुणी चळू नका ।*
*बिणी मारायची अजून राहिली ।*
*माझ्या जीवाची होतीया कायली ।।*

या लावणीतील मैनेचे व्यक्तिमत्त्व अण्णा भाऊंचे समाज जीवनाचे आकलन, त्यांच्या वर्गीय जाणिवेची खोली, चिकित्सा करणाऱ्या चिंतनाची कुवत, प्रीती विरहाने व्याकूळ झालेल्या नायकाचे दर्शन घडविणारी जिवंत तळमळ आणि विद्रोहाचा वणवा घेऊन पेटलेली, कमालीची आशावादी जीवनधारणा पाहिली म्हणजे अण्णा भाऊंच्या प्रतिभेच्या धगधगत्या अंगाराचे दर्शन घडल्यावाचून राहतच नाही.


कथांमधून व्यक्त होणारी नायिकादेखील अशीच लढाऊ, आत्मविश्वासाने बहरलेली नायिका आहे. फुला, निखारा, डोळे या कथांच्या अण्णा भाऊंच्या नायिका मुळातून पाहण्यासारख्या आहेत. 'चोराची संगत' या कथेमधील आकू मनाला भुरळ पाडून जाते. 'चिरागनगरची भुतं' मधली मंकी, रमी या नायिका झोपडपट्टीमधल्या बेदरकार स्त्रियांचे दर्शन घडवतात. 'डोळे' या शोकांत कथेची नायिका गीता वाचकांच्या डोळ्यांत पाणी उभे केल्याशिवाय राहत नाही. अण्णा भाऊंच्या प्रेमकथातील नायिका वाचकांना खिळवून ठेवतात. 'कोकिळा', 'वेड वारं'मधली गंगू राणी, 'तमाशा'मधली गोजा, रंभा, पिला, बिलवरी आबी या आणि अशा स्वरूपाच्या अण्णा भाऊंच्या कथेतील अनेक नायिका जिवंत कष्टकरी स्त्रियांचे दर्शन घडवतात. आपल्यावर बलात्कार करण्याचा प्रयत्न करणाऱ्या गुंड्या या गावगुंडाला शेवटी फुला ही नायिका त्याच्या रानातल्या घरात कोंडून मारते. जाळून मारते. बापाने आजारी, अयोग्य नवऱ्याशी लग्न लावून दिले म्हणून त्याला सोडून जाणारी 'बरबाद्या कंजाऱ्या'ची मुलगी आणि मुलीच्या भल्यासाठी समाजाचे वैर ओढून घेणारा बरबाद्या. या कथामध्ये चुकीचे संबंध फेटाळणाऱ्या नायिकेचे दर्शन घडते.

अण्णा भाऊंच्या नायिकेचे खरे विस्तृत जीवन त्यांच्या कादंबरीत होते. ‘फकिरा’ कादंबरीतील फकिराची आई, वारणेचा वाघमधील मेरी आणि सई, राणगोपामधील मोहना आणि लक्ष्मी, तारा, चंद्रा (पाझर) या नायिका अण्णा भाऊंच्या स्त्रीविषयाच्या धारणा स्पष्ट करतात.

अण्णा भाऊंच्या काही कादंबऱ्या नायिकाप्रधान आहेत. चित्रा, वैजयंता, चंदन, चिखलातील कमळ, फुलपाखरू, रत्ना, आवडी, टिळा लावते मी रक्ताचा, या कादंबऱ्यांमधील नायिका स्त्रियांचे प्रश्न मांडणाऱ्या प्रातिनिधिक नायिका आहेत. तर अलगुज (रंगू), रणगंगा (प्रभा), संघर्ष (सुलभा), अहंकार (अवंतिका) या प्रेमकथामधल्या नायिका उदात्त हृदयस्पर्शी प्रीतीचे दर्शन घडवतात.

‘माकडीचा माळ’मधील दुर्गा, चंदन, आवडी, चित्रा, वैजयंता, रत्ना, ‘माझी मैना’मधील मैना, फुला (निखारा) यांनाच खऱ्या अर्थाने अण्णा भाऊंच्या प्रातिनिधिक नायिका मानावे लागेल. या नायिकांचे वर्णन करत असताना अण्णा भाऊंनी स्त्रीला पुरुषाच्या बरोबरीचा. सन्मानाचा, आदराचा दर्जा दिलेला आहे. अण्णा भाऊंच्या नायिका केवळ शरीर सौंदर्याचे वर्णन करणाऱ्या कचकड्याच्या बाहुल्या नाहीत. त्या रणरागिणी, महिषासुरमर्दिनीच्या स्वरूपातील आहेत. खांद्यावर बंदूक घेऊन पुरुषांच्या बरोबरीने ब्रिटिशांच्या बरोबर लढणारी ‘मंगला’ येथे आढळते. फिरत्या जमातीतील असणारी वासनेने बरबटलेल्या रानरेड्यांशी झुंज देणारी






◆ *निखळ कला रूपापेक्षा जीवन संघर्षाचे वास्तव रूप मांडणारे साहित्य हेच या साहित्याचे खरे रूप आहे.* ◆

दुर्गा भेटते. वेश्या वस्तीत राहूनही त्या बंदिखान्यातून बाहेर पडणारी चित्रा भेटते.

अण्णा भाऊ नायिकांच्या सौंदर्याचे वर्णन करताना पायाच्या नखापासून सुरुवात करतात. म्हणजे स्त्री सौंदर्याकडे विनम्र आदराने पाहणारा अण्णा भाऊ हा दुर्मीळ लोककलावंत आहे. अण्णा भाऊंच्या साहित्यात स्त्रीच्या शीलरक्षणाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. अण्णा भाऊंची नायिका ही भारतीय समाजजीवनातील प्रामुख्याने दलित, कष्टकरी, शेतमजूर, कामगार, झोपडपट्टीवासीय अशा कष्टकरी समाजजीवनातील नायिका आहे. या समाजात स्त्री-पुरुषाच्या संबंधाला प्रेमाला, संसाराला लोक नैतिकतेचा शीलरक्षणाचा, प्रेम संवर्धनाचा, मानवतेचा आणि शोषण तसेच अन्यायाविरुद्ध लढणाऱ्या लोकसंघर्षाचा मजबूत पाया कसा आहे याचे दर्शन अण्णा भाऊंच्या साहित्यातून घडते... स्त्री मुक्तिचा सर्वंकष विचार ज्यांना खऱ्या अर्थाने समजून घ्यायचा आहे त्यांनी अण्णा भाऊंच्या नायिका समजून घ्याव्यात.

अण्णा भाऊंच्या बहुतेक कथा-कादंबऱ्या नायिकाप्रधान आहेत हे त्यांच्या वाङ्मयाचे अद्बितीय आगळेवेगळेपण म्हणावे लागेल. जेथे नायक प्रधान आहे तिथेही नायिका त्या कथावस्तूला सर्वांगांनी वेढून आहे. मनुष्याच्या जीवनावर स्त्रीचा जबरदस्त प्रभाव हे मराठी वाङ्मयात फक्त अण्णा भाऊंच्याच कथाविश्वात स्पष्ट आणि रोखठोक प्रकटला आहे...

## स्त्रीभावनांची कदर करणारे लेखक अण्णा भाऊ साठे

अण्णा भाऊंनी निर्माण केलेल्या नायिका अंतर्बाह्य सत्‌शील वर्तनाच्या आहेत. व्यभिचारी अथवा चवचालपणा करणाऱ्या नाहीत. मोकळ्या मनाच्या या स्त्रिया वाचकांनाही भुरळ घालतात. वाचकांच्या लक्षात राहणाऱ्या अण्णा भाऊंच्या नायिका सरळ वृत्तीच्या, उदार मनाच्या, धाडसी कर्तबगार महिला समाजापुढे एक आव्हान उभे करून आहेत. अण्णा भाऊंनी या

स्त्रियांना महत्त्वाचे स्थान त्यांच्या कथा-कादंबऱ्यांमधून प्राप्त करून दिले आहे. 'चित्रा' कादंबरीतील सोना, 'कुरूप' कादंबरीतील ताई, 'रूपा' कादंबरीतील नायिका, 'फकिरा'मधील स्त्रियांच्या भावनांचे सम्यक दर्शन अण्णा भाऊंनी अत्यंत तेजस्वीपणे घडवले आहे. अण्णा भाऊंच्या कथा-कादंबऱ्यांतील या स्त्रिया आगंतुक येत नाहीत अथवा दुय्यमही नाहीत. या स्त्रियांना अण्णा भाऊंनी प्राथम्य स्थान दिलेले असते. स्त्रियांचा गौरव करणे, हा जो त्यांचा दृष्टिकोन आहे तो प्रभावीपणे त्यांच्या प्रत्येक कादंबरीत दृग्गोचर झाला आहे. या सर्व नायिका इतर कादंबऱ्यांत वर्णन करताना त्याहून भिन्न असल्याने त्यांचा वाचकाला विसर पडणे शक्य नाही. या नायिका रंगवताना अनेक पैलू स्पष्टपणे रेखाटलेले असले तरी त्याकडे समीक्षकाकडून दुर्लक्ष झालेले असले तरीही या नायिका नारी समाजाच्या खऱ्या स्वरूपातल्या प्रतिनिधित्व करणाऱ्या आहेत हे निश्चितच!

**संदर्भ :**

लोकशाहीर अण्णा भाऊ साठे (संदर्भ ग्रंथ)

★अण्णा भाऊ साठे यांच्या नायिकांचा अधिक सविस्तर तपशील (पान क्र. १५७ पासून १६५ पर्यंत) आहे.

★ तसेच त्यांच्या कथेचा मागोवा - पान १२९

★ कथाकारांमध्ये त्यांचे स्थानांकन - पान ११८ वर पाहा.

## अण्णा भाऊ साठे यांची वगनाट्ये - स्वरूप आणि संदर्भ :

**- प्रा. डॉ. एस. एस. भोसले**

अण्णा भाऊ साठे यांची वगनाट्ये ही सर्वसाधारणपणे जनसामान्यांच्या कलात्मक लोकभूमिका आहेत. पूर्वपरंपरेने चालत आलेल्या पारंपरिक 'तमाशा'तून अंग आणि बळ धरलेली अण्णा भाऊंची अस्सल वगनाट्ये. पुढे चालून ती 'लोकनाट्ये' झाली. प्रामुख्याने ती लोकांसमोर राखून झाली. विचारांची कडकडीत बांधिलकी जशी महत्त्वाची होती तशी डोळ्यांसमोर सतत तरळणारी लोकगर्दीही कमी महत्त्वाची नव्हती. तीही तितकीच मोलाची होती. किंबहुना विचार वैभवाची बांधिलकी आणि लोकगर्दीचा सनातन येणारा प्रवाह हीच मुळी मूलतः अण्णा भाऊंच्या वगनाट्यांची बलस्थाने होती.

*समकालीन कम्युनिस्ट लेखक कलावंतांशी*
*◆ तुलनात्मक पद्धतीने अभ्यास केल्यास अण्णा भाऊंचे ◆*
*कम्युनिस्ट कलावंतातले वेगळेपण स्पष्ट जाणवते.*

आणखी एक होते : तत्कालीन शासनाची अहंता असे शासन ज्यांच्या आधार-विचारावर चालते त्या धनवंत बलिष्ठांची शोषकता अशा साऱ्या माणसाशी वैर करणाऱ्या घटकांची पुरेपूर जिरवण्याची पार खडूसपणे जिरवण्याचेही एक जिगर या वगनाट्याच्या निर्मितीच्या बुडाशी सरळसरळ सळसळत होती. हे शासन किंवा हे बलिष्ठ मग कुणीही असोत, स्वकीय असोत किंवा परकीय, त्यांच्याशी दोन हात करण्यात आणि शक्यतो त्यांना चारी मुंड्या चीत करण्यातच या अण्णा भाऊंच्या वगनाट्यांची इतिश्री आहे,'' असे प्रा. भोसले अण्णा भाऊंच्या वगनाट्याबद्दल सांगतात. पुढे ते म्हणतात-

''या इतिश्रीचे गर्भस्थान साम्यवादी विचारधारेची कडकडीत बांधिलकी हे आहे. हे इतके स्पष्ट आहे की, ते तसे आहे हे सांगण्याचीही गरज राहत नाही. या गर्भस्थानासंबंधी, साम्यवादाच्या लखलखीत अंगीकारामुळेच अण्णा भाऊंना हे सहजभावे शक्य आहे असेही म्हणता येईल. त्यात वावगे काही ठरणारे नाही. तसेच जागरूकतेच्या अंगाने सतत तेजाळणारे लोकमन लोकातच उभा असलेला देह, दीन-दलितांविषयीच्या कल्याणाबाबत अनिवार ओढ, शोषकासंबंधात कमालीची घृणा आणि सामान्यास चेतवणारी साम्यवादी विचारधारा यांवरच्या जाज्वल्य निष्ठेने अण्णा भाऊंना हे कर्तव्य कधीच अवघड वाटले नाही.

## अण्णा भाऊंच्या पिंडाला मानवणारा वाङ्मय प्रकार

प्रा. भोसले म्हणतात- ''मराठी भाषेत सांगायचे झाले तर 'चार बुकं' ही धड शिक्षण न झालेल्या 'अडाणी' अण्णा भाऊंना हे सारे प्रकरण अवघड जायला हवे होते. 'घर'च नसलेल्या घराण्यात जन्म झालेल्या अण्णा भाऊंना संस्कृतीचा स्पर्श नव्हता की, प्रगतशील विचारप्रणालीचा वारसा. गुन्हेगारांच्या बराकीत पूर्वजांच्या पिढ्यान्‌पिढ्या खतम झालेल्या. अण्णा भाऊ हे त्यापैकीच एक खोड. पण वसे, वारसे, स्पर्श, शिक्षण,

संस्कृती हे सारेच अण्णा भाऊंनी खोटे पाडले. नैसर्गिक प्रतिभा आणि विचाराची बांधिलकी मिळून कोण साक्षात्कार घडवते याचे प्रात्यक्षिक अण्णा भाऊंनी दाखवले. मुद्दाम दाखवायचे म्हणून दाखवले. बंगाली बाबू बोलबोल म्हणता रुपयामागून रुपयांच्या चलती काढतो; अशा चलती काढून लोकांना आश्चर्यचकित करण्याच्या उघड हेतूनेच तो हे करतो'' तसे काही खास करून दाखवण्याचा हेतू अर्थातच अण्णा भाऊंचा नव्हता. प्रारंभी किमानपक्षी तरी नव्हता. प्रारंभ काळात तरी सहजस्वभावेच हे घडले. नंतर नंतर जसजसा विकास होत राहिला तसतसे हेतू उद्दिष्टांचे पदर अधिक घट्टपणे चिकटत गेले असे दिसते. अंतर्बाह्य पुराव्यावरून तसे म्हणणे शक्य होते. अण्णा भाऊंच्या उभ्या साहित्याची घडण लक्षात घेता, त्यांच्या नाट्यमय वगनाट्यांच्या संदर्भात हे तीव्रतेने आढळते. त्यामानाने कथा, कादंबरी, प्रवासवर्णन इत्यादी त्यांच्या लेखनात हे प्रमाण खूपच समर्पक आहे.

वैचारिक बांधिलकीच्या संदर्भात वगनाट्य हा अण्णा भाऊंच्या पिंडाला अतिशय मानवणारा वाङ्मय प्रकार आहे. त्यांनीही त्या ताकदीने तो हाताळलेला आहे. या हाताळणीत एक राजकीय कार्यकर्ता आहे, एक प्रचारक आहे, शाहिरी वाङ्मयाचा एक भोक्ता आहे. परंपरागत मराठी शाहिरी वाङ्मयपरंपरेचा एक विचारक आहे आणि त्या सर्वांच्या तळाशी कविमन आहे. मुळात ते संवेदनशील आहे...

अण्णा भाऊंची वगनाट्ये ही खऱ्याखुऱ्या अर्थाने लोकनाट्ये झाली.

## अण्णा भाऊंच्या वगनाट्याची सप्तपदी

अण्णा भाऊंच्या वगनाट्यांच्या वैशिष्ट्यांची पंचसूत्री सांगता येते. रंजन, प्रबोधन, प्रक्षोभ, विध्वंस आणि रचना ही ती पंचसूत्री. मराठी शाहिरीच्या उज्ज्वल परंपरेचा गौरवशाली वारसा आणि लोकमानसाचे अव्वल भान ही दोन पावले त्या बरोबर चालली की, अण्णा भाऊंच्या वगनाट्यांच्या वैशिष्ट्यांची सप्तपदी पूर्ण होते. या सप्तपदीचे एक विशेष रूपही आहे. ते आहे; पारंपरिकतेचा सांगडा शाबूत ठेवल्याचा आभास बेमालूमपणे जोपासून नवतेचे प्रयोग करण्याची अण्णा भाऊंच्या ठायी असलेली लक्षणीय बौद्धिक चमक. साम्यवादी विचाराच्या बांधिलकीला

◆ *गॉर्कीला त्यांनी आपला वाङ्मयीन गुरू मानले आहे. आपल्या गुरूला ते आयुष्यभर गिरवत राहिले नाहीत.* ◆

प्रखर प्रचाराचे औत जुंपले असले तरी लोकभिमुखता, प्रतिभाशालित्व आणि जनसामान्यांच्या तळामुळात घुसण्याची केसाच्या मुळात तेल जिरते तसे अपूर्व ताकद यामधील अण्णा भाऊंचे अजोडपण हे खास आणि खास करून अण्णा भाऊंचेच होते. माणसाची, माणसाशी आणि एकाच्या प्रतिभाशक्तीशी दुसऱ्या प्रतिभाशक्तीशी तुलनाच मुळी संभवत नसल्याने या 'खास आणि खास करून'ची तुलना मागच्या पुढच्याशी करण्याचे सुतराम कारण नाही. यासंबंधातील अण्णा भाऊंचे कर्तृत्व हेच मुळी स्वयंभू आणि स्वयंप्रकाशी असल्याने तुलनाच संभवत नाही, ती करण्यात कसलाच अर्थ नाही. म्हणून या संदर्भात, एकमेव असे अण्णा भाऊच विचारार्थ उरतात. ते तसेच स्वीकारण्यात उपुयक्तही ठरतात.

अण्णा भाऊंच्या वगनाट्यातून प्रवाहित होणारे सर्वसामान्य सूत्र आहे, दीनदलित जनसामान्यांचा संघर्षप्रवण विजय आणि लब्धप्रतिष्ठित दांडगेसरांचा परिचय. हा जनसामान्याच्या टाळूवरील लोणी खाण्यात आणि तेही हृदयद्रावक व वेदनायुक्त असला तरी शेवटी त्याचे स्वरूप पराजयाचेच असते. हा पराजय पुढील दीनदलितांसाठी विजयात परावर्तित होतो. त्या अर्थाने व अंतिम उद्दिष्टांच्या दृष्टीने अण्णा भाऊंच्या वगनाट्यातून उभारून येणारे सर्वसामान्य सूत्र थेट समाजसत्तावादी कल्याणकारी कामगार राज्याचे स्वप्न पाहते. सरळ व सोप्या मार्गाने हे स्वप्न तसे वास्तवात उतरणारे नाही. पण वास्तवात उतरावे म्हणून प्रयत्न करण्यात अडचण कसली? प्रयत्नात अपुरेपणा कशासाठी? अंतिम उद्दिष्ट ईप्सित साध्य होण्याविषयीचेच असेल तर ते प्रत्यक्षात येईल न येईल असा विचार तरी कशासाठी? मनात असा विचार उद्‌भवणे म्हणजे लढाईचा विचारच अर्धवटपणे करणे नव्हे काय? त्याहूनही लढाई सुरू करण्यापूर्वीच लढाई हरण्यासारखे नाही का? शेवटी 'दीन-दलितांची लढाई, शोषितांची लढाई ही अपुऱ्या साधनांनीच लढावी लागते. अशी लढाई कधीच सोपी नसते; खूप खूप अवघड असते. काळीज उचकटून टाकणारी असते. पण

तीही लढाईच असते. ईप्सित ठरलेले असते. निश्चित असते. त्याची नशा, ही ह्या लढाईच्या दिशेनेच खेचत असते. मग ही लढाई कुणाशीही असो...

अण्णांमधल्या 'कडव्या' साम्यवाद्याला हे पक्के ठाऊक आहे; अण्णा भाऊमधल्या कडकडीत दलित्वाला याचे सजग भान आहे. याबाबत अण्णा भाऊ कुठेच ढिले नाहीत. मोकळीक किंवा तडजोड असल्या कुठल्याच नारदीय लोकांना, मुंगी शिरेल एवढाही तिथे वाव नाही. अण्णा भाऊंच्या वृत्तीतच ते नाही. वैचारिक बांधिलकीने त्यावर भला मोठा प्रस्तर लोटून दिला आहे. साहजिकच अशी, ही लढाई एकट्याने किंवा दुकट्याने कशीही असली तरी लढाईचीच असा अण्णा भाऊंचा निर्धार होता. ही लढाई प्रसंगी चिरडून टाकणारी ठरते. हे अण्णा भाऊ जाणत नव्हते असे नाही. अण्णा भाऊंना माणूस, परिस्थिती आणि त्यामधला व्यवहार यांचे इतके मर्मग्राही ज्ञान आहे, की काय घडेल आणि जे काही पडेल त्यातून नेमके काय उद्बोधेल याचा स्वच्छ अंदाज आहे. त्यामुळेच तर अण्णा भाऊ अख्खी लढाई लढले ते या नेटाने. प्रसंगानुरूप वृत्ती आणि मार्ग यामध्ये बदल अपरिहार्य होतात. तसे ते झाले; पण जिद्द, निर्धार आणि जिगर कायम तीच राहिली. ती ओघळती असती तर अण्णा भाऊंच्या संघर्षाचा कणाच कोलमडून गेला असता. मोडून त्याचा खुळखुळा झाला असता. तसे घडले नाही. अंगीकृत बांधिलकीच्या अपरंपार निष्ठेचे हे फलित आहे...

## लोकनाट्यपूर्व पोवाड्यांचा रियाज

अण्णा भाऊंनी वगनाट्ये लिहिली ती शाहिरी वाङ्मयाच्या रियाजानंतर पहिल्यांदा. अण्णा भाऊंनी पोवाडे-लावण्या लिहिल्यानंतर क्रमाने वगनाट्ये लिहिली. पोवाड्याइतकीच तीही गाजली आणि गर्जलीही. अण्णा भाऊंच्या वगनाट्यांना पोवाड्याची डूब आहे; पोवाड्यातली इरेसरीची भावना आहे. मात्र थाट, माट, ढंग, आदब आणि जोरसोर वगनाट्यांच्या पोटात आहे. पोवाड्याची सुधारित आवृत्ती म्हणजे वगनाट्य असे नसले तरी पोवाड्याचा ठसका आणि प्रबोधनाच्या धडका या वगनाट्याला धरूनच असतात. पोवाडा आणि वगनाट्य यांचा प्राणभूत सूर आणि सूत्र लोकजागरण, लोकप्रबोधन आणि लोकपरिवर्तन असे समानच आहे. हे समान सूत्र अण्णा भाऊंनी पक्केपणाने घट्ट पकडून ठेवले आहे.

◆ ***अण्णा भाऊंची वैचारिक वाढ अधिक चौरस सक्षम, सकस, सखोल, जीवनानुभवावर आधारित म्हणून अधिक वास्तव, तर्कसंगत आणि सजीव वाढ झालेली आहे.*** ◆

अण्णा भाऊंनी एकूण पंधरा पोवाडे लिहिल्याची नोंद आहे. मात्र प्रत्यक्ष उपलब्ध दहाच पोवाडे आहेत.

१) नानकीन नगरापुढे - १९४२ २) स्टॅलिनग्राडचा पोवाडा - १९४२ ३)बर्लिनचा पोवाडा -१९४२ ४) बंगालची हाक - १९४४ ५) पंजाब-दिल्लीचा दंगा - १९४७ ६) तेलंगणाचा संग्राम - १९४९ ७) महाराष्ट्राची परंपरा - १९४७ ८) अमळनेरचे अमर हुतात्मे - १९४७ ९) मुंबईचा कामगार - १९४९ १०) काळ्या बाजाराचा पोवाडा - १९४९.

अशा या दहा पोवाड्यांचे विषय राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय असे दोन्ही आहेत. अण्णा भाऊंच्या प्रतिभेला मिळालेले आवाहन सार्वकालिक व सार्वजनिक आहे. चीनमधील नानकीन, सोव्हिएत युनियनमधील स्टॅलिनग्राड, जर्मनीतील बर्लिन, हिंदुस्थानातले बंगाल, पंजाब, दिल्ली, तेलंगण, अमळनेर, मुंबई असा हा सर्वदूर परिसर आहे. त्याला कोणत्याही सीमा नाहीत. बंधने, अडथळे यांचा अटकाव नाही. सुखेनैव भरारी हेच अण्णा भाऊंच्या प्रतिभाशक्तीचे मुक्तांगण अनघड प्रतिभाशक्तीचा हा मुक्ताविष्कार आहे.

अण्णा भाऊंचा ‘नानकीन नगरापुढे’ हा पोवाडा आज उपलब्ध नसला तरी कॉ. श्रीपाद अमृत डांगे यांच्यासारख्या कम्युनिस्ट चळवळीमधल्या अध्वर्यूने त्याची नोंद केल्याचे आढळते. अनुपलब्ध म्हणून ‘नानकीन नगरापुढे’ पहिला नव्हे. असे गृहीत धरले तर ‘स्टॅलिनग्राडचा पोवाडा’ हा अण्णा भाऊंचा पोवाडा पहिला ठरतो. कम्युनिस्ट वर्तुळातील जवळीक त्याबाहेरील प्रकाशझोत, कम्युनिस्ट विचारधारेचा लेखक, प्रचारक शाहीर म्हणून ख्याती, शाहीर अमर शेख, शाहीर द. ना. गव्हाणकर या मित्राचा लाभ, ‘लाल बावटा’ कलापथकाचे संघटन अशा एकामागून एका गोष्टीचे घबाड अण्णा भाऊंना दिसले, भेटले ते या पोवाड्यामुळेच. ‘‘आंतरराष्ट्रीय सर्वहारा वर्गाशी अनुबंध जुळवू पाहणारा हा पोवाडा अण्णा भाऊंची

व्यापक विचारविश्वाची सखोल जाण स्पष्ट करतो' असे मत डॉ. बाबूराव गुरव यांनी 'अण्णा भाऊ साठे : समाज विचार आणि साहित्य विवेचन' या प्रबंधात व्यक्त केले आहे. (पृ. १७४) त्यानंतर अण्णा भाऊंनी एका पाठोपाठ एक पोवाडे लिहिले. १९४२-(२), १९४४, १९४६ (प्रत्येकी एक), १९४७-(४), १९४९-(२) अशा या पोवाड्यांची वर्गवारी आहे.

अण्णा भाऊंच्या पोवाड्यामध्ये वर्गवारी आहे. विषयांचे आणि हाताळणीचे दोन्ही प्रकारचे वैविध्य आढळते. 'बर्लिनचा पोवाडा' जागतिक महायुद्धावर या रशियन फौजांच्या पराभवाचे वर्णन करतो. बंगालमध्ये पडलेल्या दुष्काळाच्या हाहाकारांची भेदक कहाणी 'बंगालकी हाक' मध्ये मांडली आहे. हिंदू-मुस्लिममध्ये प्रतिगामी दंगे देशाच्या ऐक्याला आणि एकात्मतेला कसा सुरुंग लावतात त्याचे त्वेषपूर्ण विवेचन 'पंजाब दिल्लीचा दंगा'त केले आहे. तेलंगणच्या लढ्याला वर्गयुद्धाचे शास्त्रपूत स्वरूप देण्याचा 'तेलंगणचा संग्राम'मध्ये अण्णा भाऊंचा प्रयत्न दिसतो. महाराष्ट्राची परंपरा 'अमळनेरचे अमर हुतात्मे' व 'मुंबईचा कामगार' हे पोवाडे महाराष्ट्रातील घटना प्रसंगाशी निगडित आहे. खास क्षेत्र असून तो त्यांच्या जिव्हाळ्याचा विषय आहे. तत्त्वज्ञानाच्या बांधिलकीशीही ते जुडून असलेले.

लोकशाहीर म्हणून अण्णा भाऊ पहिल्यांदा लोकांसमोर उभे राहिले. लोकांसमोरचे हे उभे राहणे हा लोकशाहीर अण्णा भाऊंचा साहित्यिक म्हणून जन्म होणे होय, या आशयाचे डॉ. बाबूराव गुरव यांचे मत (पृ. १९८) सर्वच अर्थाने उचित ठरावे असेच आहे.

## वगनाट्यांमधील परिष्कृत शाहिरी

अण्णा भाऊंमधील शाहिरीची ही बैठक त्यांच्या वगनाट्यामध्ये परिष्कृत असल्याचे दिसते. पोवाड्याच्या तुलनेत वगनाट्याची प्रकृती व्यापक जनसंपर्काशी संवाद साधणारी. श्रमाने अण्णा भाऊंनी ही नस पकडली आणि परिणामैक्याचा व्यापक पट हाताळला असे दिसते. पोवाड्याच्या लेखनाच्या समाप्तीच्या जवळपास अण्णा भाऊंच्या वगनाट्यांची निर्मिती हे या परिस्थितीचेच द्योतक म्हणणे योग्य ठरेल.

'अकलेची गोष्ट' हे वगनाट्य, अण्णा भाऊंनी १९४५च्या आसपास

◆ *देश, काल, भाषा यांच्या सीमारेषा ओलांडून अण्णा भाऊंच्या साहित्याची रणहलगी खणखणत राहिली. त्याचे कारण स्वतःच्या जीवनानुभवाच्या धगीने ती चांगली शेकली होती.* ◆

लिहिले. क्रमाने वगनाट्ये अशी लिहिली आहेत. १) अकलेची गोष्ट १९४५, २) खापऱ्या चोर १९४६, ३) देशभक्त घोटाळे १९४६, ४) निवडणुकीत घोटाळे १९४६, ५) शेठजीचं इलेक्शन १९४६, ६) बेकायदेशीर १९४७, ७) माझी मुंबई १९४८, ८) मूक मिरवणूक १९४९, ९) लोकमंत्र्यांचा दौरा १९५२, १०) पुढारी मिळाला! १९५२, ११) पेंग्याचे लग्न, १२) बिलंदर बुडवे, १३) दुष्काळात तेरावा.

अशी १३ वगनाट्ये साध्या, सोप्या शब्दांत त्यांनी लिहिली आहेत.

पैकी 'पेंग्याचे लग्न', 'दुष्काळात तेरावा', 'पुढारी मिळाला' व 'बिलंदर बुडवे' ही चार आत्तापर्यंत अनुपलब्ध असलेली 'अप्रकाशित वगनाट्ये अण्णा भाऊ साठे' या मथळ्याखाली डॉ. एस. एस. भोसले यांच्या संपादनाने प्रकाशित झाली आहेत. औरंगाबाद, कोल्हापूरच्या लेखन, वाचन प्रकाशनाने ती प्रसिद्ध केली आहेत. 'लेखन वाचन प्रतिष्ठान' संचलित समस्या नियतकालिकाच्या खंड १, २, १९९१ मधून पहिल्यांदा ती उजेडात आली. बाकीची वा. वि. भटांच्या 'लोकसाहित्य प्रकाशन', अभिनव प्रकाशन, खेरीज चंद्रकांत शेट्ये, प्रकाशन मंदिर यांच्या 'नवे तमाशे'सारख्या संग्रहातून साधारणपणे १९५१ मध्ये लोकांसमोर आली आहेत. एखाद-दुसरे अन्यही प्रसिद्ध असल्याचे आढळते.

मात्र सांप्रत समोर तेरा वगनाट्यांची बेरीज असली तरी प्रत्यक्ष अण्णा भाऊंनी मात्र आपण १५ वगनाट्ये लिहिल्याचा निर्देश, शाहीर नामदेव कापडे यांच्या. त्यांनी घेतलेल्या प्रत्यक्ष मुलाखतीच्या आधारे डॉ. बाबूराव गुरव यांनी 'अण्णा भाऊ साठे' समाजविचार आणि साहित्य' विवेचनामध्ये केला आहे.

अण्णा भाऊंच्या या सगळ्या वगनाट्यांवरून नजर टाकली की, त्याचे स्थूल स्वरूप लक्षात येते. धनदांडग्यांची शोषणाची वृत्ती-जिचा उल्लेख भांडवलदारी मनोवृत्ती म्हणून केला जातो व तिच्या विरोधात दंड थोपटून

उभी टाकलेली कष्टकरी शेतकरी मजुरांची धडपड हे त्यामधले साधारण समान असे सूत्र आहे. मात्र सूत्र समान असले तरी विषयांचा स्तर, विषयानुरूप, माणसा-माणसांचा थर त्यांच्या समोरच्या प्रश्न-अडचणीचा स्तर आणि लढाईच्या मार्गाचे स्तर हे वेगवेगळे आहेत. त्यामुळे विषय आविष्कृती असे सारेच नवे बनून येते. कोरं करकरीत होऊन नजरेसमोर लखलखत राहते. अण्णा भाऊंच्या वगनाट्यांबाबत असे घडते. हे घडणेच अण्णा भाऊंचे प्रतिभासामर्थ्य दाखवते. प्रचंड जनसंपर्काच्या मुरण्याने हे प्रतिभासामर्थ्य फुलून-उमलून-बहरून येते आणि हे वारंवार घडते.

अण्णा भाऊंच्या वगनाट्याचे आवाहन लोकसमूहाला आहे. त्यांच्यामधील सामुदायिक शहाणपणाला सामुदायिक पुरुषार्थाला हे आवाहन आहे. अण्णा भाऊंनी ते जबऱ्या ताकदीने केले.

## अण्णा भाऊ साठे यांची काही लोकनाट्ये
## - पा. तु. पाटणकर

अण्णा भाऊ साठे हे मराठी सारस्वताला पडलेले एक विस्मयकारक स्वप्न होते. तो एक वाङ्मयीन चमत्कारच होता. अशिक्षित असलेल्या अण्णा भाऊंनी कसलेही पूर्वसंस्कार नसताना मराठी वाङ्मयात कथा, कादंबरी, लोकनाट्ये, चित्रपट व कथा व शाहिरी काव्य अशा बुलंद शिल्पांची लेणी कशी काय खोदली असतील, असा विचार पाटणकरांच्या मनात आला व त्यामुळे त्यांचे मन अचंबित होते. प्रस्तुत लेखात अण्णा भाऊंच्या लोकनाट्यांचाच विचार अत्यंत डोळस सामाजिक जाणिवेतून, लोकरंजनाच्या प्रयत्नातून व लोककलांच्या बाजातून केलेला आहे. अण्णा भाऊंचे साहित्य वाचायचे असेल त्यांचे विचार आत्मसात करायचे असेल तर आपल्यालादेखील त्यांच्या विचाराशी एकत्रित व्हावे लागेल.

अण्णा भाऊ प्रतिभावंत शाहीर, नट, लोकनाट्यकार, कलापथकांचे चालक अशा विविध नात्यांनी मराठी प्रेक्षकांसमोर वावरले. जगण्यासाठी धडपडणाऱ्या उपेक्षित सामान्य माणसाची व्यथा, त्यांचे विचार, त्यांचा व्यावसायिक गुंता व एकूणच त्यांच्या जीवनाची होणारी परवड यांना केंद्रस्थानी ठेवून त्यांनी लोकनाट्ये सजवली, रंगवली, उभारली. लेखनात व सादरीकरणात हा सच्चेपणा त्यांच्यात असल्याने व त्यांना प्रतिभेचा स्पर्श

◆ *लढाऊ कलावंताच्या विचारस्वातंत्र्याचे अव्वल, निर्भय, प्रतीक म्हणून अण्णा भाऊ पुढील पिढ्यांना मार्गदर्शक ठरतील.* ◆

झाल्याने ती अमाप लोकप्रिय झाली.

अण्णा भाऊ ज्या मातंग समाजात जन्मले, वाढले तिथे तमाशा ही अत्यंत लोकप्रिय कला होती. त्यांनी तर लहानपणी तमाशात हौसेने कामेही केली होती. अशा तमाशातील विलक्षण बोचरे विनोद, त्यातील चटपटीतपणा, रोखठोक सादरीकरण व काळजाला हात घालणारे ओघवान शाहिरी काव्य यांची महती ते जाणून होते. प्रारंभ मार्क्सवादाच्या प्रभावामुळे प्रचारकी वाटणारी त्यांची काही लोकनाट्ये आज कालबाह्य वाटत असली तरी काही लोकनाट्ये मात्र काळजावर आरूढ होऊन टिकणारी आहेत.

**लोकनाट्य शब्दाचे जन्मदाते**

लोकनाट्य हा तमाशाचा आधुनिक अवतार मानला जातो. 'लोकनाट्य' या शब्दाचे जन्मकर्तृत्व मात्र अण्णा भाऊंकडे गमतीदार योगायोगाने आले. संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या आधीचे दिवस होते ते. महाराष्ट्रापासून मुंबई तोडून ती गुजरातच्या पारड्यात टाकण्यासाठी किंवा स्वतंत्र ठेवण्यासाठी महाराष्ट्रद्वेष्ट्या राजकारण्यांची तेव्हा जोरात खटपट चालली होती. अण्णा भाऊ तेव्हा लाल बावटा कलापथकाद्वारे लेखणीचे फटकारे अशा संधिसाधू, भोंदू व स्वार्थी राजकारण्यांवर व मुंबई शासनावर ओढीत होते. त्यामुळे चिडून जाऊन मोरारजी देसाईंनी त्यांच्या कलापथकावर व तमाशावर बंदी आणली. अण्णा भाऊंनी डोके लढवले. त्यांनी 'माझी मुंबई' हा वग लाखो कामगारांसमोर सादर केला व सुरुवातीला स्टेजवरून जाहीर केले की ''मायबाप सरकारने तमाशावर बंदी आणली आहे. म्हणून आज आम्ही आपल्यासमोर 'माझी मुंबई' हे 'लोकनाट्य' सादर करीत आहोत.'' टाळ्यांच्या कडकडाटात व पोलिसांच्या उपस्थितीत तमाशाचे 'लोकनाट्य' असे बारसे करण्याचे एक ऐतिहासिक कार्य अण्णा भाऊंनी केले व आपल्या मिस्कीलपणाने त्यांनी शासनाला हात चोळीत बसायला लावले.

अण्णा भाऊंनी शाहीर अमर शेख व द. ना. गव्हाणकर यांच्या जोडीने लाल बावटा कलापथक चालवले व संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत मोलाची कामगिरी केली. धरपकड तुरुंगवास, भूमिगत प्रचार, दगदग व लोकनाट्यलेखन व लाखो लोकांसमोर त्यांचे सादरीकरण असा सतत धावपळीचा कालखंड होता. १९५२ ते १९६२ पर्यंतचा हा धकाधकीचा व धावपळीचा कालखंड होता. त्यात स्वकीय व स्वपक्षीय उपेक्षा, अपेक्षाभंग व मानसिक अस्वास्थ्यहेही त्यांच्या वाट्याला आले. तरीही त्यांचे या काळात लेखन मात्र अव्याहत चालू राहिले.

अण्णा भाऊंनी लोकनाट्य लिहिली ती गरजेतून. कष्टकरी जनतेच्या मनातील व्यथा व्यक्त करताना स्वार्थी व भोंदू राजकारण्यांच्या ढोंगीपणावर आसूड ओढताना तसेच समाजातील खालच्या थरातील बोकाळलेली बुवाबाजी, अंधश्रद्धा, अज्ञान इत्यादी अवगुणांवर वेळोवेळी कोरडे ओढताना त्यांना 'लोकनाट्य' या पारंपरिक लोककलेचा आधार घ्यावा लागला.

### अण्णा भाऊंची लोकनाट्ये

अण्णा भाऊंनी एकूण १४ लोकनाट्य लिहिली आहेत. त्यातील बरीचशी अत्यंत प्रभावी, ग्रामीण ढंगाची व गोष्टीरूप नाट्य प्रगट करणारी आहेत. साधारण १९४५ ते १९६२ पर्यंत ही लोकनाट्ये त्यांनी लिहिली व स्वतःच ती सादरही केली.

अकलेची गोष्ट, बिलंदर बुडवे, खापऱ्या चोर, शेठजीचे इलेक्शन, पुढारी मिळाला, मूक मिरवणूक, पेंग्याचे लग्न, निवडणुकीतील घोटाळे, दे. भ. घोटाळे, दुष्काळात तेरावा, बेकायदेशीर, माझी मुंबई, लोकमंत्र्याचा दौरा ही त्यांची लोकनाट्ये त्या काळात तुफान गाजली होती. त्यात ते स्वतः भूमिकाही करत. लेखक, दिग्दर्शक, नट, शाहीर, निर्माता अशा सर्व अंगांनी लोकनाट्य जगलेल्या शाहीर अण्णा भाऊंव्यतिरिक्त दुसरा लोकनाट्य कलाकार महाराष्ट्रात दुर्मीळच असेल!

'अकलेची गोष्ट' हे त्यांचे पहिलेच लोकनाट्य होते. अत्यंत नावाप्रमाणेच ते चटपटीत तसेच दर्जेदार होतेच पण रसिकांच्या डोळ्यात अंजन घालणारे होते. संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या पूर्वकाळात हे लिहिल्यामुळे

◆ *अण्णा भाऊंच्यापाशी काही उपजतच होते आणि उरलेले अनुभवी 'बिनभिंतीच्या विश्वविद्यालयातून' अपार कष्टाने त्यांनी ते गोळा केले होते!* ◆

या लोकनाट्याच्या विषयात वेगळेपणा आलेला आहे. अण्णा भाऊंनी कम्युनिझम व कार्ल मार्क्स भाषांतरित स्वरूपात वाचलेला होता. त्या तत्त्वज्ञानाने ते पूर्णपणे भारावून गेलेले होते. श्रमजीवी, अर्धपोटी अवस्थेत संसाराचा गाडा ओढणाऱ्या कामगाराला मार्क्सचे तत्त्वज्ञान समजावून सांगणे हा अण्णा भाऊंचा हेतू होता. तसेच या मार्क्स तत्त्वज्ञानाची कास धरल्याने कामगारांना लढण्याचे बळ देऊन त्यांचा उत्कर्ष कसा होईल हे त्यांना पटवून देण्यासाठी अण्णा भाऊ साठे यांनी हे लोकनाट्य रंगमंचावर आणले. त्यांच्या गाजलेल्या लोकनाट्यांपैकी हे एक असून, त्यातील प्रसंग, भाषा, लावण्या व कटाव अतिशय प्रभावी होते. विषय रुक्ष असूनही त्यांनी तो अतिशय रंजक व प्रभावशाली शैलीत मांडला होता. त्यात गद्य संवादापेक्षा पद्यमय संवाद अधिक रंजक होते.

जानबा हा त्या लोकनाट्याचा नायक, तो किसानसभेचा कार्यकर्ता असतो. बंडू हा दुधाचा व्यापारी व गुंडू हा सावकार. या तिघातील वाद म्हणजे हे 'लोकनाट्य' होय. त्याचे मूळ अतिशय प्रभावी आहे. या तिघांनी एकमेकांना अकलेची गोष्ट सांगायची. जो दुसऱ्याची गोष्ट खोटी म्हणेल त्याने दंड भरायचा, अशा अटी ठरतात. बंडू व गुंडू आपल्या पूर्वजांच्या थोरवीच्या गोष्टी शाहिरीमधून सांगतात. जानबा आपल्या आजोबांची गोष्ट सांगतो. आपले आजोबा स्वतः शेतात कष्ट करायचे. उत्तम शेतीमुळे घर धनधान्याने भरलेले होते. बंडू व गुंडूचे आजोबा खोटेपणा करून, गरिबांना लुबाडून, त्यांना फसवून सावकारी करीत व गरिबांच्या श्रमांवर ऐषआराम करीत. छानछोकीत त्यांनी सर्व संपत्ती लयाला गेली तेव्हा आपल्या आजोबांनी त्यांना लाख खंडी धान्य व कडबा उधार दिला, त्यांचे पैसे त्यांनी अजून फेड केले नाहीत. हे ऐकून बंडू व गुंडू चूप होतात... कारण गोष्ट खोटी म्हटले, तर दंड भरावा लागेल व खरी म्हटले, तर धान्याचे व गवताचे पैसे द्यावे लागतील. एकूण जानबाच्या हुशारीमुळे व बंडू, गुंडूच्या फजितीमुळे प्रेक्षकवर्ग खूश व्हायचा.

या लोकनाट्याची गंमत अशी की, कष्टकरी कामगार व शेतकरी यांना हे आपल्याच जीवनाचे प्रतिबिंब वाटावयाचे व लुबाडणाऱ्या भांडवलदारांच्या प्रतिनिधींची होणारी फजिती पाहून प्रेक्षक फार खूश व्हायचे.

## खापऱ्या चोर

'खापऱ्या चोर' या लोकनाट्यात अण्णा भाऊ साठे यांनी शेतकऱ्यांच्या कष्टकरी जीवनाचा आढावा विनोदी शैलीने घेतला आहे. घाम गाळणाऱ्या कामगार शेतकऱ्यांचे संसार सुखी, समृद्ध व्हावेत ही त्यांची आस होती. ती त्यांनी बहुतेक लोकनाट्यांतून छोट्या मार्मिक व विनोदी संवादातून भेदकपणे मांडली आहे. येथेही गावातले सावकार, जमीनदार हे पिळवणूक करण्याचे प्रतिनिधी आहेत. शेतकरी जागृत होऊन त्यांची कशी फजिती करतात. अनेक युक्त्या योजून ते सावकारांनी हडप केलेल्या आपल्या जमिनी कशा सोडवतात, त्याचे इरसाल चित्रण 'खापऱ्या चोर' मध्ये केले आहे. लुबाडला गेलेला सनगरवाडीचा शेतकरी दाजी बाजी देशोधडीला लागतो व शेवटी 'खापऱ्या चोर' म्हणून प्रसिद्ध होतो. आजूबाजूच्या सर्व खेड्यात त्याची जबर भीती निर्माण होते. एकदा तो भोलाराम सावकाराचीच चोरी करतो. गावचा पाटील आडदांड असतो. खापऱ्या सीताच्या मदतीने आपली व सीताचीही जमीन सोडवतो व यापुढे गरीब शेतकऱ्यांना नडणार नाही, अशी शपथ भोलारामला घ्यायला भाग पाडतो. हे सारे अतिशय विनोदी अंगाने व चुणचुणीत प्रत्ययकारी संवादांनी अण्णा भाऊ या लोकनाट्यात मांडतात. यातली खापऱ्याचोराची भूमिका स्वतः अण्णा भाऊ फार विनोदी पद्धतीने रंगवीत असत.

## बिलंदर बुडवे

'बिलंदर बुडवे' या अण्णा भाऊंच्या इरसाल लोकनाट्यात निखळ विनोदाचा झरा प्रसन्नपणे वाहताना आढळतो. एक गावरान अडाणी माणूस जो पैसा लावून सर्वांना बुडवीत असतो, त्यालाच शेवटी कसा शेरास सव्वाशेर भेटतो, त्याची विनोदी कथा नाट्यरूपात मांडली आहे. छोटे छोटे ओघवते संवाद, सुलभ कटाव व मार्मिक कथावस्तू यामुळे हे लोकनाट्य तेव्हा अतिशय लोकप्रिय झाले होते. आज नुसते आठवले तरी

◆ ***‘वारणेचा वाघ’ या चित्रमय कादंबरीतली सारी व्यक्तिचित्रे, ज्या अंगभूत ग्रामीण बोलीत चितारली होती, ती संवादबोली, बावनकशी सोन्याच्या मोलाची होती!*** ◆

हसू येईल, असा त्याचा बाज होता.

‘बिलंदर बुडवे’ हे अतिशय अतिबंदिस्त, त्रोटक म्हणावे, इतके बंदिस्त लोकनाट्य आहे. विषय सामाजिक, ग्रामीण धाटणीचा. यात चोरवाडीचा बाबूराव बाजी बुडवे, मलकापूरचा राणोजी पाटील व त्याची बायको हौसा ही त्यातील प्रमुख पात्रे होती. बाबूराव बुडवे महाबिलंदर असतो. एका झाडाखाली राणोजी व हौसाशी त्याची गाठ पडते. तेव्हा तो आपली ओळख करून देताना सांगतो. आपले बापजादे खूपच श्रीमंत होते. आता मात्र खायचे वांदे आहेत. त्यामुळे त्याचे लग्नही होऊ शकले नाही. आपल्या श्रीमंतीचे वर्णन तो पुढीलप्रमाणे करतो-

*सौदागर असे जहाजे भरूनी ।*
*न्यायचे दर्यावरूनी ।*
*घेत होतो ना व्यापार करूनी ।*
*आमुची ही होती अवघी करणी ।*
*घरी होत्या घोड्याच्या पागा ।*
*हवेशीर बागा । किल्ले भुईकोट ।*
*तटावरूनी मारिले वैरी मैदानी ।*

बाबूराव पुढे सांगतो, आता हे सर्व बुडाले. आमच्या पूर्वजांनी लोकांची कर्जे काढली आणि बुडवली. म्हणून आम्ही ‘बुडवे’ झालो. आपलाही बुडवेगिरीचाच धंदा आहे.

राणोजीला ही सर्व थापेबाजी आहे हे कळत असूनही व बायकोच्या विरोधाला न जुमानता तो त्याला वीस रुपये देतो व एक हजाराचा कागद भरून घेतो. हे एक हजार कर्ज कसेही वसूल करण्याचे आव्हान राणोजी स्वीकारतात. एक वर्षानंतर त्या कर्जवसुलीसाठी राणोजी बुडव्याकडे येतो. बुडवे सरळ हात वर करतो व त्याच्या मालकीची असलेली एकच एक वस्तू म्हणजे त्याचा मरायला टेकलेला म्हातारा बाप तो राणोजीला सरळ

देऊन टाकतो. मात्र जाताना तो राणोजीला बजावतो की, म्हातारा मेला तर मात्र तो होता तसा भरून द्यावा लागेल, नाही तर नुकसानभरपाई म्हणून एक लाख रुपये द्यावे लागतील. त्याला खात्री होती की, या अटीमुळे राणोजी म्हाताऱ्याला मरू देणार नाही. म्हणजे त्याच्या आजारपणाची आयती देखभाल झाली. मेलाच तर एक लाख रुपये मिळतील.

मधल्या काळात बिलंदर बुडवे, आपला म्हातारा नक्की मरणार व आपल्याला एक लाख रुपये मिळणार असे सांगून गावकऱ्यांकडून तो कर्ज नव्या नव्या पद्धतीने उकळतच असतो. शेवटी बुडव्याला खबऱ्यांकडून म्हातारा मेल्याचे व त्याची चिता जळत असल्याचे कळते. 'म्हातारा दे नाही तर एक लाख रुपये नुकसानभरपाई दे' म्हणून बुडवे धरणे धरतो व गावकऱ्यांकडून तो एक हजार रुपये कर्ज घेऊन राणोजीला देतो. आपले पैसे वसूल झाल्यावर राणोजी लपवून ठेवलेला त्याच्या म्हाताऱ्या बापाला त्याच्यापुढे हजर करतो... अशी ही विलक्षण गमतीदार कथा अण्णा भाऊंनी मोठ्या कौशल्याने सादर केली व शहरी व ग्रामीण भागात त्याचे शेकडो प्रयोग केले.

## प्रसिद्ध लोकनाट्य 'माझी मुंबई'

'माझी मुंबई' हे अण्णा भाऊंचे लोकनाट्य मराठी माणसाची प्रादेशिक अस्मिता जागवणारे म्हणून दीर्घकाळ लक्षात राहील, असे लोकनाट्य आहे. अर्थात तो संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीचा काळ असल्याने काळाची गरज म्हणून जरी लिहिले गेले असले, तरी अण्णा भाऊंचा व्यासंग, तळमळ, युक्तिवाद व सुंदर शाहिरी यांचा मनोज्ञ मिलाफ त्या लोकनाट्यात दिसून येतो. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीचा उज्ज्वल इतिहास लिहिताना या लोकनाट्याच्या जनमानसावरील प्रभावाचा उल्लेख केल्यावाचून पुढे जाता येणार नाही.

'माझी मुंबई' या लोकनाट्यात विष्णू हा मराठी कामगार व मुनीमजी हा गुजराथी बनिया यांच्यातील 'मुंबई कोणाची?' या मुद्द्यावरील संगीतमय जुगलबंदी म्हणजे हे लोकनाट्य आहे. त्यात संयुक्त महाराष्ट्राची चळवळ, त्याचा पूर्वेतिहास तसेच युक्तिवाद असे अनेक उल्लेख आहेत. भाषा प्रांतरचनेसाठी पावसकर, पण्णीकर, कुंझरू समितीचा अहवाल आला.

◆ *मराठी कथासाहित्याच्या इतिहासात अण्णा भाऊ साठे यांचे कथालेखन संख्यात्मक व गुणात्मकदृष्ट्या महत्त्वाचे आहे.* ◆

पण गुजरातसह द्विभाषिकाचे लोढणे महाराष्ट्राच्या गळ्यात अडकवण्यात आले. मुंबई महाराष्ट्राला मिळणे अवघड झाले. मुश्कील झाले. सारा महाराष्ट्र या अन्यायाविरुद्ध पेटून उठला. अशा ऐन धामधुमीच्या पेटत्या काळात हे लोकनाट्य रंगभूमीवर आल्याने त्याला अभूतपूर्व असे यश मिळाले. त्यातील कथानकात लाडोबा व मुनीमजी कारस्थानाने विष्णूला पोलिसांकरवी पकडतात. पण सारा महाराष्ट्र त्याच्या सुटकेची मागणी करतो. शेवटच्या सवाल-जबाबात विष्णू अर्थात मराठी माणूस जिंकतो असे दाखवले आहे. म्हणजे हे लोकनाट्य एक समर्थ रूपकच आहे.

असल्या प्रचारी लोकनाट्याची गरज कालांतराने सरतच असते. परंतु त्यात अण्णा भाऊंची शब्दकळा कशी दाणेदारपणे उमलली आहे, ते पाहण्यासारखे आहे. मराठी माणसाचे हे वर्णन ठसकेबाजच आहे-

*डोकीला नाही पागोटा ।*
*जोंधळा नाही गहू ।*
*खातो रबरी आटा ।*
*रस्त्यात झोपतो कुठं टाकाव्या खाटा ।*
*नफेबाज करिती बघा थट्टा ।*
*नीटचल म्हणती ये बेटा ।।धृ.।।*

अण्णा भाऊ आपल्या मुंबईचे समर्थन करताना विष्णूच्या तोंडून सांगतात.

*जशी गरुडाला पंखं । आणि वाघाला नखं ।*
*तशी ही मराठी मुलखाला ।।*

ग्रामीण ढंगाचे हे काव्य अण्णा भाऊंच्या शाहिरी प्रतिभेचे रम्य दर्शन ठायी ठायी घडविते.

अण्णा भाऊंचे ‘पुढारी मिळाला’ हे लोकनाट्य पक्षीय प्रचारावर आधारलेले होते. त्या काळात सर्व राजकीय पक्षांची स्वतःची कलापथके होती. काँग्रेस सेवादल, राष्ट्र सेवादल, रा. स्व. संघ, आंबेडकरी चळवळ

अशा अनेक सांस्कृतिक व प्रचारी कार्य करणाऱ्या संस्था होत्या. अण्णा भाऊ साठे, द. ना. गव्हाणकर, शाहीर अमर शेख (लाल बावटा कलापथक), पु. ल. देशपांडे, वसंत बापट, लीलाधर हेगडे (राष्ट्र सेवादल), ग. दि. माडगूळकर सारख्यांची काँग्रेस सेवादलेही कार्यरत होती. त्याला उत्तर म्हणून अण्णा भाऊंनी हे लोकनाट्य लिहिले.

त्याचे कथानक साधेसेच आहे. त्या काळात पक्षोपक्षाचे अनेक पुढारी गावात पुढारीपणा मिरवत असतात. त्यांच्या भाषणांच्या माऱ्याने लोक हैराण व्हायचे. तसाच वाघीरे गावचा गावकामगार पाटील, त्यातील कोणता पुढारी निवडावा व मतामतांच्या गलबत्त्यात कुठल्या पुढाऱ्याची कास धरावी, या संभ्रमात असतो. शेवटी गावपाटील युक्ती लढवितो व सर्व पुढाऱ्यांची एकाच स्टेजवर स्पर्धा लावतो. त्या वेळी त्या दिखाऊ पुढाऱ्याचे स्टेजवरील भांडण पाहून लोक चिडतात व सर्वांना नाकारून १९४२च्या स्वातंत्र्य लढ्यातील सच्चा क्रांतिकारी शेतकरी नेता क्रांतिसिंह नाना सत्तू यालाच पुढारीपण बहाल करतात. शेतकरी नेता सत्तू हे क्रांतिसिंह नाना पाटलांचे प्रतीक असते.

स्वातंत्र्यपूर्व व नंतरच्या सार्वत्रिक निवडणुकीतील विविध अनुभव, मतदानातील घोटाळे, पुढाऱ्यांचा मानभावीपणा व खोटेपणा, निवडून येण्यासाठी कोणत्याही थराला जाण्याची राजकारण्यांची वृत्ती व या महागड्या खेळात सामान्य जनतेची होणारी ससेहोलपट, गरीब-श्रीमंत यामधील रुंदावत जाणारी दरी असे विविध कडवट अनुभव अण्णा भाऊंनी लोकनाट्याचे विषय केले. त्यांची शेठजींचे इलेक्शन, दे. भ. घोटाळे, निवडणुकीतील घोटाळे व बेकायदेशीर ही खास निवडणुकीतील दांभिकपणावर कोरडे ओढण्यासाठी लिहिलेली, प्रसिद्ध लोकनाट्ये होती.

## शेठजींचे इलेक्शन

‘शेठजींचे इलेक्शन’ हे लोकनाट्य अण्णा भाऊंनी खास कम्युनिस्ट प्रचारासाठी लिहिले. काँग्रेस हा भांडवलशाही, श्रीमंतधार्जिण व कम्युनिस्ट पक्ष हा खरा नडलेल्या गरीब किसान कामगारांचा पक्ष असे कल्पून त्यांच्या धोरणातील दृष्टिकोनातील फरक भेदकपणे यात मांडलेला आढळतो. निवडणुकीतील घोटाळे ‘दे. भ. घोटाळे’ हे देखील लोकनाट्य

◆ *अण्णा भाऊ साठे यांच्या कथालेखनात विविध प्रवृत्तींचा नायक वावरताना आढळतो. जगण्याचे विविध प्रश्न घेऊन संघर्ष देताना हे नायक दिसतात.* ◆

पार्टी प्रचारासाठीच लिहिलेले होते. यात 'दे. भ. घोटाळे' हा काँग्रेसचा उमेदवार अखेर फजित पावतो व कम्युनिस्टांचा उमेदवार लोकप्रिय ठरतो. त्या त्या घडीला लोकांना हसवण्यात ही लोकनाट्ये यशस्वी झाली. या चारही लोकनाट्यांचा विषय तात्कालिक व पक्षीय प्रचाराचा असल्याने आज त्यांना फारसे महत्त्वही उरले नाही. फक्त अण्णा भाऊ अतिशय रुक्ष प्रचारी विषयसुद्धा कसा रंजक व अभ्यासू वृत्तीने व पोटतिडकीने सादर करीत हे दिसते.

वरील चार लोकनाट्यांच्या पावलावर पाऊल टाकूनच त्यांनी 'लोकमंत्र्याचा दौरा' व 'मूक मिरवणूक' ही लोकनाट्ये काँग्रेस व कम्युनिस्टांच्या ध्येयधोरणातील फरक सांगण्यासाठी लिहिली. मगरचंद हा भंपक मंत्री झोपडपट्टीत फिरतो व त्यांचे रास्त प्रश्न डावलून स्वच्छता ठेवा, झाडे लावा, अहिंसा पाळा असा पोकळ उपदेश करीत फिरतो. हेच मगरचंद मंत्री आपल्याला 'बेकायदेशीर' या लोकनाट्यातही भेटतात. तो भ्रष्ट मार्गांनी निवडून येतो व मंत्रीही होतो. मंत्री असताना संपात ते रघुनाथमल या मिलमालकाच्या बाजूचे होतात व गरीब कामगारांच्या विरुद्ध कौल देतात. त्यामुळे कामगारांचा संप होतो. शेवटी मालक व मगरचंद नमतात. यात कामगारांची एकजूट, सत्याचा विजय व लवाद संस्कृतीवरील भाष्य आढळते. 'लोकमंत्र्याचा दौरा' मध्ये अण्णा भाऊंनी या मगरचंद मंत्र्याच्या तोंडी कमी अन्न खा, सत्यमेव जयते, अधिक धान्य पिकवा असल्या निरर्थक घोषणांचा भडिमार केलेला दाखवला आहे. त्यामुळे हशाच हशा पिकायचा व सामान्य नागरिक अंतर्मुख व्हायचा.

'मूक मिरवणूक'मध्येही अण्णा भाऊंनी कम्युनिस्ट पक्षाची तळी उचलून धरली आहे. समाजवादी व कम्युनिस्ट हे त्या वेळचे दोन मातब्बर पक्ष होते. दोन्ही पक्ष तसे सत्तेपासून फार दूर राहिले. कारण लोकप्रिय असूनही त्यांना निवडणुकीत जागा मिळायच्या त्या नगण्य. दोन्ही पक्षांच्या

कलापथकातून शाहिरी काव्य व लोकनाट्य यांच्या माध्यमातून एकमेकांवर टीका व्हायची. ‘मूक मिरवणूक’मध्ये चाळीतल्या गरीब कामगारांची दैनंदिन ससेहोलपट दाखवली आहे. संघर्षाशिवाय त्यांच्या हक्काच्या मागण्या मान्य होणार नाहीत. असे यात विष्णू हा कॉम्रेड सांगतो. टेबलावरील तात्त्विक चर्चा व प्रत्यक्ष संघर्षाच्या वेळी तत्त्वज्ञान सांगून पळ काढण्याची वृत्ती ही समाजवाद्यांची वैशिष्ट्ये दाखवून यात त्यांना हास्यास्पद बनविले आहे. एकूण या लोकनाट्यात कम्युनिस्ट सोडून इतर सर्वच पक्षांवर वार केलेले आहेत.

### पेंग्याचं लग्न

अण्णा भाऊंनी नेहमीचा पक्षीय अभिनिवेश बाजूला सारून जरा वेगळा सामाजिक विषय ‘पेंग्याचं लग्न’ या लोकनाट्यासाठी निवडला आहे. उत्तर कोकणातील पेंग्याचं लग्न नेहमीप्रमाणे हुंडा न घेता व जीवघेणे कर्ज, उसनवारी इत्यादींचा खर्च टाळून कसे लावले जाते. त्याचे विनोदी वर्णन या लोकनाट्यात असून, ते खास कोकणसाठी लिहिलेले होते. येथेही सामान्य, गरीब जनतेची रुढिप्रियता, सुख-दुःख यांचा विचार प्रकर्षाने केल्याचे जाणवते.

अण्णा भाऊंनी अशी एकूण १४ लोकनाट्ये बहुतेक काळाची गरज म्हणून लिहिलेली असली तरी त्यात गरिबांबद्दलचा जिव्हाळा, कामगार-शेतकऱ्यांची धनदांडग्यांकडून होणारी पिळवणूक व त्याविरुद्ध संघर्ष पेटवण्याची प्रवृत्ती सहज लक्षात येते. त्यातून त्यांनी रंजल्या-गांजलेल्या अशिक्षित, रुढिप्रिय समाजाचे प्रबोधन करण्याचा प्रयत्न केला आणि तो करताना त्यांनी जी अजोड शब्दकळा. शाहिरी काव्य, लावणी व विनोदी संवादाद्वारे फुलवली. त्याला तोड नाही. ते स्वतः काळावर आरूढ झाले, पण त्यांची लोकनाट्ये मात्र पक्षीय अभिनिवेशामुळे काळाच्या मागेच राहिली. तमाशाचा फॉर्मच त्यांनी बदलला. परंपरागत गण, गौळण व बतावणी यांना त्यांनी फाटा दिला व थेट संकल्पित विषयालाच हात घातला. गणही वेगळ्या धर्तीचे लिहिले. पूर्वीच्या तमाशातून सतत दिसणारा बीभत्स शृंगार, काल्पनिक, पौराणिक कथा, अध्यात्म यांनाही त्यांनी लोकनाट्यातून हद्दपार केले. काळाच्या बरेच पुढे पाहून त्यांनी केलेली रचना वाचून अचंबा

*हजारो वर्षांची साचलेली गुलामगिरी नष्ट करण्यासाठी*
*निघालेल्या युद्धनायकाची ती तयारी आहे.*
*त्यांच्या नायकांनी छेडलेले युद्ध हे*
*व्यक्तिगत नाही ते सामाजिक आहे.*

वाटतो.

पण त्याच वेळी दुसरी एक कालबाह्य गोष्ट टोचत राहते. तमाशातील मांडणीच्या जुन्या चौकटी त्यांनी फेकून दिल्या खऱ्या, पण दुर्दैवाने कम्युनिझम, मार्क्सप्रणीत पोथीनिष्ठ पोपटपंचीच्या नव्या चौकटी स्वतःच्या लेखनावर लादून घेतल्या. कम्युनिस्ट पार्टीसाठी त्यांनी एवढे जिवाचे रान केले. अनेक कलापथके उभी करून नवे नवे वग लिहून कम्युनिझमचा प्रचार केला, त्या पार्टीकडूनही शेवटी त्यांची उपेक्षाच झालेली त्यांना पाहावी लागली.

त्यांची बरीचशी लोकनाट्ये आज प्रचारी, अंध कम्युनिस्ट भक्तीची अतएव कालबाह्य झाल्यासारखी वाटतात. जेव्हा हा पक्षपाती दृष्टिकोन न बाळगता निखळ विनोद, आकर्षक चमकदार व सामाजिक कथानक यांचेच केवळ साहाय्य घेतले. तेव्हा त्यांची लोकनाट्य अविस्मरणीय ठरली. म्हणूनच खापऱ्या चोर, बिलंदर बुडवे, पेंग्याचं लग्न, अकलेची गोष्ट ही त्यांची लोकनाट्ये आजही कोणी रंगभूमीवर आणली तर तेवढीच प्रयोगक्षम, मनोरंजक व लोकप्रिय होतील. यात काही शंकाच नाही.

## गुन्हेगारी जीवनाचे चित्रण करणाऱ्या कथा

मराठी साहित्यात गुन्हेगारी प्रवृत्तीच्या व्यक्तिरेखा खलनायक म्हणूनच आल्या आहेत. परंतु या व्यक्तिरेखा आणि त्यांच्याशी संबंधित घटना केंद्रस्थानी ठेवून त्यांच्यावर कथा लिहिण्याच्या कौशल्यात अण्णा भाऊंची बरोबरी करणारे लेखक विरळच.

'खुळंवाडी' संग्रहातील 'मेंढा' या कथेतल्या सांगावच्या लखूजी माने याने एक मजबूत आणि लढाऊ मेंढा पाळलेला असतो. हा मेंढा लखूजीच्या आक्रमक स्वभावाचे जिवंत प्रतीक म्हणूनच येतो. हा मेंढा त्याच्या लढतीसाठी आणि दमासाठी प्रसिद्ध असतो. पण तो कुणी तरी चोरून नेतो. आपला

मेंढा कुणी बरे चोरला असेल असा विचार करताना लखूजीला वाटते की, माणगांवच्या पंढरी पाटील या आपल्या प्रतिस्पर्ध्यानेच तो चोरला असावा. त्यामुळे पंढरीच्या या दुष्कृत्याचा बदला घेण्यासाठी लखूजी पंढरीचा मेंढा मारतो, आणि पुन्हा याचा बदला घेण्यासाठी पंढरीची माणसे लखूजीचा खून करतात.

'गजाआड' संग्रहातील 'तरस' या कथेत अनेक स्त्रियांवर बलात्कार करणाऱ्या तरसासारख्या एका माणसाचे चित्रण आहे. त्याच्या शरीरामध्ये व्यंग असल्याने तो एखाद्या तरसाप्रमाणेच चालत असतो. शिवाय त्याचे वागणेसुद्धा एखाद्या तरसाप्रमाणेच असते.

वास्तव जसे अनुभवले, तसेच चित्रित करण्याच्या अण्णा भाऊंच्या धोरणामुळे ते गुन्हेगार महिलांचे चित्रण करण्यातही मागेपुढे पाहत नाहीत. उदाहरण म्हणून 'हौशी' ही कथा घेता येईल. या कथेत लख्या बारपुत्याच्या हौशी या चंचल मनोवृत्तीच्या आणि सारासार विवेक नसलेल्या प्रेयसीचे चित्रण आहे. लख्या या आपल्या प्रियकरासाठी हौशी आपल्या पतीचा खून करते. त्यामुळे तिला अटक होते. कैदेतून सुटल्यावर ती लख्याला विसरते आणि राजा नावाच्या तरुणाबरोबर पळून जाते. अशा या बेलगाम तरुणीचे चित्रण या कथेत केलेले आहे.

'रानगा' या कथासंग्रहातील 'दारुबंदी' ही कथासुद्धा गुन्हेगारी जीवनाचे चित्रण करणारी आहे. हीच कथा 'गजाआड' या संग्रहात 'काळू' या शीर्षकाने प्रकाशित झालेली दिसते. काळू, काळूची प्रेयसी फातमा आणि काळूचा प्रतिस्पर्धी अकबर अशी तीन अट्टल गुन्हेगारांच्या गुन्हेगारी कृत्यांचे चित्रण या कथेत दिसते.

'आबी' या संग्रहातील 'आडवा आक्या' या कथेचा नायक आहे भिकारवाडीचा आक्या. आक्याचे आचार आणि विचार गावकऱ्यांच्या आचार-विचारांच्या अगदी विरुद्ध असे असतात. त्यामुळे गावातील लोक त्याला 'आडवा आक्या' असे म्हणत असतात. आक्याने तीन प्राणी पाळलेले असतात. - एक कुत्रा, एक गाय व एक बैल. हे सारे प्राणी त्यांच्या मालकाप्रमाणेच उपद्रवी आणि त्रासदायक असतात. त्यामुळे सारा गाव वैतागतो आणि आक्याला व त्याच्या 'प्रिय' प्राण्यांना धडा शिकवतो.

'हिकमत' ही 'गुऱ्हाळ' या संग्रहामधील कथा रावजी राघोजी

◆ *वास्तव जसे अनुभवले, तसेच चित्रित करण्याच्या अण्णा भाऊंच्या धोरणामुळे ते गुन्हेगार महिलांचे चित्रण करण्यातही मागेपुढे पाहत नाहीत. उदाहरण म्हणून 'हौशी' ही कथा घेता येईल.* ◆

(रामोशी) आणि रघू ठोमरे हे गावकऱ्यांची कशी फसवणूक करतात, याचे चित्रण करते. लोकांना नकली सोने देऊन आपले खरे सोने शाबूत ठेवण्यासाठी गावच्या देशमुखाने या दोघांना नोकरीला ठेवलेले असते. ते अनेकांची फसवणूक करतात. सर्वसामान्य खेडुतांचे अज्ञान आणि त्याचा धूर्त लोकांनी घेतलेला फायदा या कथेत दाखवला आहे.

'गधडा भिक्या' ही 'गुऱ्हाळ' या संग्रहातील कथा भिक्या अरपाट नांवाच्या एका उद्धट, विकृत आणि बेजबाबदार माणसाबद्दलची आहे. तो गाढवासारखा मूर्खपणाने वागत असल्याने त्याला गावकरी 'गधडा' म्हणत असतात. काही दिवसांनंतर गावच्या जत्रेत भिक्याची त्याचा शत्रू सदू नाईकडा याच्याशी मारामारी होते. सदू या मारामारीत भिक्याचा जीव घेतो.

'हेड्या हैबती' ही 'गुऱ्हाळ' संग्रहातील कथा हैबती या हेड्याचे व्यक्तिचित्र आहे. हेडा म्हणजे गुरांच्या बाजारातील दलाल. इतरांना फसवण्यावरच त्याचा व्यवसाय चालतो. गुरांच्या बाजारात दलाल म्हणून काम करून तो विक्रेता आणि ग्राहक अशा दोघांकडूनही दलाली कमावतो. आपल्या या व्यवसायासाठी तो खोटे बोलण्यालाही कचरत नाही. प्रत्यक्षात तो एका फडक्यात बांधलेल्या वहाणांच्या जोडावर हात ठेवून शपथ घेतो, पण बोलताना मात्र 'भाकरीवर हात ठेवून शपथ घेतोय्' असे सांगतो.

'घोडगोंधळ' ही 'गुऱ्हाळ' संग्रहातील कथा दोन बायकांच्या नवऱ्याचे व्यक्तिचित्र आहे. दोघीही त्याला त्रास देत असतात. त्यांना सरळ करण्यासाठी त्याला हिंसक आणि आक्रमक मार्गाचा अवलंब करावा लागतो. जिथे स्त्रियांवर फक्त हिंसा आणि धमक्या यांच्या सहाय्यानेच नियंत्रण ठेवता येते, अशा ग्रामीण जीवनाचे चित्रण या कथेत केलेले आढळते.

'हुबळवाडीची भानगड' या 'नवती' या संग्रहातील कथेत गुन्हेगारीच्या टोकावर पोहचलेल्या व्यक्तिरेखांच्या कारवायांचे चित्रण आढळते.

'दे. भ. चं. भूत' ही 'ठासलेल्या बंदुका' या कथासंग्रहातील कथा १९४२ सालच्या भारतीय स्वातंत्र्यलढ्याच्या पार्श्वभूमीवरील आहे. भुतासारखा दिसणारा महादेव (गावकरी तुच्छतेने त्याला 'महाद्या' म्हणत) आणि अण्णा थोरात हे गावकऱ्यांना घाबरवून आपला मतलब साधण्यासाठी स्वातंत्र्यलढ्याची संधी वापरतात. व्यापक अर्थाने विचार केला, तर स्वातंत्र्यलढ्याचा वापरसुद्धा काही लोकांनी स्वार्थ साधण्यासाठी करून घेतला. ते लोक खऱ्या अर्थाने देशभक्त नव्हते, तर या भुतांप्रमाणे नकली देशभक्त होते, असे दिसते...

## अंधश्रद्धांविरुद्धच्या कथा

अण्णा भाऊंच्या एकूण कथांपैकी बऱ्याच कथांना अंधश्रद्धांविरुद्धच्या कथा म्हणता येईल. या गटात येणाऱ्या कथा म्हणजे 'तीन भाकरी', 'बोलकं मुंडकं', 'भुतांचा वाडा', 'सूड', 'चालतं मढं' आणि 'मरीआईचा गाडा' यांच्यासारख्या कथा. अण्णा भाऊ हे वैज्ञानिक दृष्टी असलेले लेखक होते असे या कथा सूचित करतात.

'मरीआईचा गाडा' या 'कृष्णाकाठच्या कथा' या संग्रहातील कथेत जीवनाबद्दचा प्रामाणिक, वैज्ञानिक आणि नवा दृष्टिकोन कशा प्रकारे जुन्या, अशास्त्रीय व अंधश्रद्धेवर आधारित दृष्टिकोनावर विजय मिळवतो हे दाखवले आहे. या कथेतील नाना हे शास्त्रीय दृष्टिकोनाचे प्रवक्ते आहेत; तर सटवाजी, केरू नलावडा, भाऊ बाबाजी आणि म्हादबा हे जुन्या, अशास्त्रीय आणि अंधश्रद्धेवर आधारलेल्या दृष्टिकोनाचे प्रतिनिधित्व करणारे आहेत. नाना ही व्यक्तिरेखा ब्रिटिशांविरुद्ध बंडखोरी करणारे क्रांतिसिंह नाना पाटील यांच्यावर आधारलेली आहे असे म्हटले जाते, क्रांतिसिंह नाना पाटील हे महाराष्ट्रातील प्रसिद्ध कम्युनिस्ट नेते होते. मरीआई नावाची एक देवी कॉलरा वगैरे रोगांच्या साथी सुरू करते. तिला शांत करण्यासाठी तिची पूजा करून तिचा गाडा शेजारच्या गावच्या हद्दीत सोडल्यास त्या साथी आपल्या गावातून शेजारच्या गावात जातात, अशी एक अंधश्रद्धा महाराष्ट्रात प्रचलित होती. मरीआईसंबंधीच्या समजाचे समर्थन करणाऱ्यांचे मुद्दे कसे निरर्थक आहेत हे या कथेतील नाना स्पष्ट करतता...

*अण्णा भाऊंच्या एकूण कथांपैकी बऱ्याच कथांना अंधश्रद्धांविरुद्धच्या कथा म्हणता येईल. अण्णा भाऊ हे वैज्ञानिक दृष्टी असलेले लेखक होते असे या कथा सूचित करतात.*

**प्रेमकथा**

अण्णा भाऊंच्या कादंबऱ्यांप्रमाणेच त्यांनी लिहिलेल्या प्रेमकथांनाही वर्गजाणिवेचा स्पर्श आहे.

'कोकिळा' ही एका निष्पाप प्रेमाची दुःखान्त कथा आहे.

'वेडा वारा' ही एकूणच मराठी कथा-साहित्यात आपल्या वेगळेपणामुळे उठून दिसणारी कथा आहे; कारण मराठी साहित्यातील बहुतेक कथांमधील विवाहित तरुणी सासरहून माहेरी पळून जातात, परंतु 'वेडा वारा' मधील विवाहित तरुणी गंगू याच्या अगदी उलट वागते, पतीच्या प्रेमासाठी व्याकुळ झालेली गंगू माहेराहून सासरला पळून येते.

'राणी' या कथेत भाऊ पैलवान, आणि राणी यांचे एकमेकांवर प्रेम आहे. मारुतीच्या उद्धटपणामुळे भाऊ पैलवानाकडून त्याचा खून होतो. राणी आणि भाऊ पैलवान एकमेकांच्या इतके प्रेमात असतात, की खुन्याला पकडण्याची वेळ येते, तेव्हा भाऊ आणि राणी दोघेही एकमेकांना पुढील त्रासापासून वाचवण्यासाठी खुनाचा आरोप आपल्यावर घेऊ पाहतात.

'तमाशा' ही बापू आणि त्याच्या दोन प्रेयसी गोजा आणि नवटाक यांच्यामधील आदर्श प्रेमाची कहाणी आहे. एरवी एकाच पुरुषावर प्रेम करीत असलेल्या दोन स्त्रिया एकमेकींचा मत्सर करतात. पण गोजा आणि नवटाक या मात्र तसा मत्सर करीत नाहीत. बापूंवर आपला एकटीचाच हक्क प्रस्थापित करण्याचा प्रयत्न गोजा किंवा नवटाक करीत नाहीत.

'रंभा' या कथेतील रंभा ही एक सुंदर ग्रामीण तरुणी आहे. ती मीरा नावाच्या देखण्या तरुणाच्या प्रेमात पडते. 'मीरा' हा पुरुष असूनही तमाशात नाच्याची भूमिका करीत असतो. रंभा ही मीराच्या पिळदार शरीरामुळे त्याच्याकडे आकर्षित झालेली असते. त्याच्याबद्दलचे तिचे प्रेम इतके उत्कट आणि पक्के असते की, वेळ आल्यावर ती आपले घर आणि आपले आईवडील यांना सोडून त्याच्या मागे जाते.

'मंजुळा' या कथाची नायिक मंजुळा शूर आहे. आपल्या प्रियकरासाठी आपल्या वडिलांवर आणि इतर नातेवाईकांवर कुऱ्हाडीने वार करायला ती मागेपुढे पाहत नाही. याउलट तिचा प्रियकर शिलाजी हा समर्थ तरीही समतोल असतो.

'बिलवरी' ही कथा बिलवरी आणि अमीन यांच्यातील प्रेमाची कथा आहे. अमीन हा श्रीमंत अशा देशमुखांच्या पदरी काम करणारा एक गरीब कामगार असतो. या कथेतील सर्वात आकर्षक असे भाग म्हणजे - देशमुखाने देऊ केलेली प्रचंड संपत्ती बिलवरीने नाकारणे, देशमुखाचा विरोध असूनही बिलवरीने अमीनवर प्रेम करीत रहाणे, त्यामुळे आपले, आपल्या वडिलांचे व आपल्या जमातीचे जीवन धोक्यात घालणे, पण अमीनला धोका न देणे. 'पिला' ही 'पिला' नावाची कोळी जमातीतील एक स्त्री आणि उत्तम नावाचा एक सुशिक्षित कुंभार यांच्यामधील प्रेमाची कथा आहे. पिला आंधळी होते व उत्तमला वायुसेनेत नोकरी मिळते, तरी त्यांच्यातील प्रेमाचे बंधन कायम राहते.

'मानकी' ही 'चिरागनगरची भुतं' या संग्रहातील कथा प्रेमाची एक वेगळीच छटा दाखवते. दादू धावडा आणि बाबू चाकूवाला या आपल्या दोन प्रेमिकांपैकी एकाशीही मानकी एकनिष्ठ नसते. प्रियकर निवडण्यासाठी तिचा निकष असतो त्याचा धाडसीपणा. ती तुरुंगात गेल्यावर आपला पहिला प्रेमिक बाबू चाकूवाला याच्याकडे पाठ फिरविते व दादू धावडा याच्यावर प्रेम करू लागते.

'बोलकं मुंडक' ही कथा प्रेमभंगामुळे उद्ध्वस्त आणि वेडा झालेल्या एका तरुणाची कथा आहे. पिऱ्या हा तरुण गुणी नावाच्या सुंदर मुलीच्या प्रेमात पडतो, पण त्याचे प्रेम यशस्वी होत नाही. त्यामुळे तो 'ताऱ्या' नावाचं वाद्य वाजवीत, वेगवेगळ्या प्राण्या-पक्षांचे आवाज काढीत गावात भीक मागत फिरू लागतो. गावातली पोरे त्याची थट्टा करू लागतात, त्याला दगड मारू लागतात. त्यामुळे वैतागून दगडांचा त्रास वाचवण्यासाठी पिऱ्या नदीकाठच्या वाळवंटात आपले मानेपर्यंतचे शरीर पुरून घेतो. गावकऱ्यांना जेव्हा वाळूतून वर आलेले फक्त एक मानवी मुंडके तेवढे दिसते, आणि ते बोलते आहे हे त्यांच्या लक्षात येते, तेव्हा ते त्याला 'बोलकं मुंडक' असे म्हणू लागतात...

◆ *डॉ. भोसले लिहितात, ‘फुले-आंबेडकरांचा वारसा घेऊन उभे राहिलेले, मराठी साहित्य-संस्कृतीची परंपरा न नाकारणारे अण्णा भाऊ हे पहिले दलित बंडखोर लेखक झाले...’* ◆

## कौटुंबिक जीवनातील कथा

या प्रकारात मोडणाऱ्या अण्णा भाऊंच्या कथांपैकी सर्वात महत्त्वाच्या कथा म्हणजे ‘पाझर’ आणि ‘दाभाड्यांचा वाद’.

‘पाझर’ ही कथा स्त्रीच्या हृदयाला मायेचा पाझर कसा फुटतो याची कथा आहे. एक गोड मुल तिला स्वतःची आई मानते, तेव्हा तिला मायेचा पाझर फुटतो. ते मूल खूप लहान असतानाच त्याची आई दिवंगत झालेली असते.

कुटुंबीयांमधील मायेचे चित्रण ‘दाभाड्यांची वाद’ या ‘गुऱ्हाळ’ या कथासंग्रहातील कथेत सापडते. दाभाडे कुटुंबातील थोरला भाऊ जिजाबा दाभाडे आणि धाकटा भाऊ हणमा दाभाडे हे अगदी लहानसहान गोष्टीवरून वाद घालीत असतात - आईची काळजी घेणे, जिजाबाच्या बकरीने हणमाच्या सगळ्या भाकरी खाणे, घरांवर कौले घालणे, हणमाच्या कुत्र्याने जिजाबाच्या भाकरी पळवणे अशा लहानसहान गोष्टीवरून ते वाद घालीत असतात. पण जेव्हा हणमाला पोलीस अटक करणार आहेत असे जिजाबाला समजते, तेव्हा हणमाच्या सगळ्या चुका माफ करून तो त्याच्या बाजूने उभा रहातो आणि त्याला वाचवतो.

अगदी थोडे अपवाद वगळता मराठीतील बहुतेक समीक्षकांनी अण्णा भाऊंनी मराठी कथेला दिलेल्या योगदानाकडे दुर्लक्षच केले आहे. असे असले तरी, डॉ. एस. एस. भोसले हे अण्णा भाऊंच्या लेखनाकडे योग्य परिप्रेक्ष्यातून पहाणाऱ्या समीक्षकांपैकी प्रमुख समीक्षक आहेत.

अण्णा भाऊंनी मराठी कथेला दिलेल्या योगदानाचे सविस्तर असे खरेखुरे मूल्यांकन जाणून घ्यायचे असेल, तर डॉ. भोसले यांनी संपादित केलेल्या अण्णा भाऊंच्या प्रतिनिधिक कथांच्या संग्रहाला त्यांनी (डॉ. भोसले यांनी) लिहिलेली वीस पृष्ठांची प्रस्तावना वाचायला हवी. या प्रस्तावनेत एके ठिकाणी डॉ. भोसले लिहितात, ‘फुले-आंबेडकरांचा वारसा घेऊन उभे

राहिलेले, मराठी साहित्य-संस्कृतीची परंपरा न नाकारणारे अण्णा भाऊ हे पहिले दलित बंडखोर लेखक झाले...' याच संदर्भात प्रख्यात मराठी कवी नारायण सुर्वे यांनी अण्णा भाऊंचे जीवन आणि साहित्य यांचे मूल्यांकन करणारा, 'युगांतर' या साप्ताहिकाच्या १९६९ सालच्या अण्णा भाऊ - अमर शेख विशेषांकात लिहिलेला लेखही वाचण्यासारखा आहे.

उत्तम दर्जाच्या कथांबरोबरच अण्णा भाऊंनी साधारण दर्जाच्या कथाही बऱ्याच लिहिल्या. या कथा परिणामहीन, कृत्रिम आणि उथळ वाटतात. कधी-कधी त्याचत्याच व्यक्तिरेखा पुन्हा-पुन्हा वेगवेगळ्या कथांमध्ये आणि कादंबऱ्यांमध्ये येतात.


उदाहरणार्थ, निळू मांग, सावळा मांग आणि विष्णुपंत कुलकर्णी यांच्यावर अण्णा भाऊंनी स्वतंत्र अशा वेगवेगळ्या कथा लिहिलेल्या असूनही याच व्यक्तिरेखा त्यांच्या 'फकिरा' या प्रख्यात कादंबरीतही आल्या आहेत. किंवा दुसरे उदाहरण द्यायचे झाले, तर 'टिळा लाविते मी रक्ताचा' या कथेच्याच विषयावर आणि त्या कथेतीलच व्यक्तिरेखा घेऊन त्यांनी 'आवडी' ही कादंबरी लिहिली. चिरागनगरची बरीच 'भुतं' आपल्याला 'चित्रा', 'वैजयंता', 'आग', आणि 'फुलपाखरू' या कादंबऱ्यांमध्ये आधीच भेटलेली असतात. 'जखम' ही कथा म्हणजे त्याच विषयावर असलेल्या 'मास्तर' या कादंबरीचेच संक्षिप्त रूप आहे. तसेच, 'आवडी' या कादंबरीमध्ये भेटलेला लख्या बारपुते पुढे एका वेगळ्या कथेचा विषय बनतो.

असे असले तरी अण्णा भाऊंनी मराठी कथासाहित्याला दिलेल्या योगदानाच्या मूल्यमापनाचा निष्कर्ष काढताना असे म्हणता येईल की, अण्णा भाऊंनी अनेक पातळ्यांवर मराठी लघुकथेचा पांढरपेशेपणाचा मार्ग बदलला, विषय आणि अनुभव यांच्या संदर्भात मराठी कथेची क्षितिजे विस्तृत केली, ती अण्णा भाऊंनीच, उपेक्षितांचे आणि पददलितांचे जणू ते साहित्यातील प्रवक्ते बनले...

*('भारतीय साहित्याचे निर्माते अण्णा भाऊ साठे'*
*लेखक बजरंग कोरडे या पुस्तकातील काही भाग)*

## अण्णा भाऊ साठे यांचे प्रवासवर्णन
## माझा रशियाचा प्रवास : प्रा. डॉ. चंद्रकांत वर्तक

अण्णा भाऊ साठे यांच्या जीवनात अनेक प्रकारचे बदल घडत गेले. अनुभवांची पातळी वाढतच गेली. अशा धावत्या-उडत्या अनुभवांमध्ये मनावर चिरकाल संस्कार करण्याची क्षमता त्यांच्यात होती. त्यामुळे सर्वसामान्य अशा भाषेत त्यांचा 'रशियाचा प्रवास' हे प्रवासवर्णन वाचकांच्या मनाला आवडले. ते प्रवासवर्णन लहान, चिमुकले पण अर्थपूर्ण आहे. त्यामुळे ते वाचनीय झाले. त्याचे एकमेव कारण म्हणजे अण्णा भाऊंची 'प्रवास' सांगण्याची धाटणी!




त्यांच्या मनातील रशियाला जाण्यामधली उत्सुकता, अधीरपणा मात्र अतिशय उत्कट होता. त्यांनी पुस्तकाच्या सुरुवातीला लिहिलेय :

''रशियातील ते कामगारराज्य कसे असेल, तिथं कॉ. लेनिनने केलेली क्रांती, मार्क्सचे महान तत्त्वज्ञान कसे साकार झाले असेल, ती नवी दुनिया, नवी संस्कृती, नवी सभ्यता कशी फुलत असेल, या विचारानं माझं मन भारावलं होतं. मी वेडाच झालो होतो.'' (पृ. १-२)

अण्णा भाऊंनी अनेक पुस्तके वाचली होती. त्या पुस्तकांमध्ये रशियन क्रांतीचा इतिहास होता. कॉ. लेनिनचे चरित्र होते. अशा पुस्तकाच्या वाचनाने रशिया पाहण्यासाठी अण्णा भाऊंचे मन उत्सुक झालेले होते. १९४८ मध्ये त्यांना रशियाला जाण्याचा एक योग आला होत. पण राजकीय कारणांमुळे तो योग दुरावला. १९६१ मध्ये अण्णा भाऊंची 'फकिरा' कादंबरी गाजू लागली. त्या कादंबरीला सरकारी पारितोषिक मिळाले आणि इण्डो-सोव्हिएत कल्चर सोसायटीचे रशियात जाण्याबद्दलचे निमंत्रण अण्णा भाऊंना आले. त्यांचा पुन्हा प्रयत्न सुरू झाला. पण अंगणात पैशाचे झाड

> ◆ *अण्णा भाऊंचे नायक हे प्रामुख्याने भारतीय समाजातील पिळले गेलेले जे सामाजिक स्तर आहे त्यामधून आले आहेत.* ◆

कुठे होते? अंगणच नव्हते. मग पैशाचे झाड तरी कुठून असणार? पण अण्णा भाऊंच्या मित्रांनीच मनावर घेतले. त्यांनी पैसे जमवले आणि अण्णा भाऊ रशियाला जाऊ शकले.

अण्णा भाऊ रशियाला स्वतंत्रपणे गेले नाहीत. ते शिष्टमंडळाचे एक सदस्य म्हणून गेले. शिष्टमंडळातील एक सदस्य म्हणून कुठे गेले की स्वातंत्र्याला थोडीबहुत मर्यादा पडते. कारण आपापसातच सर्व कार्यक्रम-हिंडण्या-फिरण्याचे, सिनेमानाटके पाहण्याचे, खाण्यापिण्याचे, भेटीगाठीचे मुलामाणसांशी स्त्रीपुरुषांशी बोलण्या-वागण्याचे इत्यादी प्रकारचे कार्यक्रम एकत्रितपणे सामूहिक असे ठरवले जातात आणि व्यक्तिगत पातळीच अशा सामूहिक कार्यक्रमात उरत नाहीत. अशी निर्माण झालेली मर्यादा प्रवासवर्णनाचा परीघही आणून देते. अण्णा भाऊ साठे त्यांच्या प्रवासवर्णनाला अशी मर्यादा पडलेली नाही. एका प्रकारे अण्णा भाऊंसारख्या लेखकाला ही बाब मर्यादा उरते. तरीही या कोंडीतून बाहेर पडण्याचा ते प्रयत्न करताना आपल्याला दिसतात. उदाहरणार्थ आपल्याला ते शिष्टमंडळातल्या सदस्यांचा परिचय ते दोन-तीन निरनिराळ्या पातळ्यांवर करून देतात. त्या परिचय करून देण्याच्या पद्धतीत वरवर धारण केलेला एक प्रकारचा भाबडेपणा आहे. पण अंतर्यामी अण्णा भाऊंची एक मिश्कील अशी दृष्टी आहे. अण्णा भाऊ आपले दिसायला जरा काळे-सावळे, साधेसुधे होते. त्यामुळे मंडळातल्या सदस्यांची त्यांच्याबद्दलची कल्पना 'असेल कुणी तरी-कसा काय या शिष्टमंडळात समाविष्ट झाला' अशा प्रकारची होण्याची शक्यता आहे. अण्णा भाऊंच्या लक्षामध्ये ही गोष्ट ताबडतोब येते. पण ते कसल्याच प्रकारची प्रतिक्रिया व्यक्त करीत नाहीत. एक प्रकारच्या त्रयस्थपणे सर्व अनुभवतात. हे सर्व लिहिताना प्रथम शिष्टमंडळातील सदस्य आपल्याला कुणी तरी कसे समजत होते आणि रशियामध्ये या माणसाच्या कादंबरीचा, पोवाड्याचा रशियन भाषेत अनुवाद झालेला आहे, रशियामध्ये त्याच्या नावाला एक प्रतिष्ठा लाभलेली

*अण्णा भाऊंच्या कथेत अनेक विनोदी नायकही आहेत. ते फक्त विनोदासाठी निर्माण करीत नसून, समाज परिवर्तनाचे तत्त्व घेऊन विनोद करतात. त्यांची पात्रे एका उच्च कोटीतील विनोदाला जन्म देतात.*

आहे, तो रशियन लोकांना ऐकून ठाऊक असल्याने त्याला पाहिल्याबरोबर त्यांना कसा आनंद होतो. त्याच्याभोवती एक खास वर्तुळच कसे निर्माण झाले आहे हे शिष्टमंडळातील सदस्यांना जाणवल्याबरोबर त्यांची अण्णा भाऊंकडे पाहण्याची दृष्टी कशी बदलते आणि निवळते- मग ते सारे त्यांना कसे मानू लागतात त्याचे वर्णन अण्णा भाऊंनी अगदी अलिप्तपणे पण एक प्रकारच्या मिश्कीलतेने केले आहे. नंतर ते सदस्य अण्णा भाऊंपाशी आपल्या झालेल्या 'समजुतीची'- 'ग्रहा'ची कबुलीही देतात. मग त्या शिष्टमंडळात अण्णा भाऊंच्या असण्याला एक अर्थ प्राप्त होतो.

शिष्टमंडळातील प्रत्येक सदस्य साम्यवादी कसा असणार? प्रत्येकाची स्वतःची म्हणून एक विचारधारा काही प्रमाणात तयार झालेली असणार व त्या विचारधारेनुसार तो सदस्य ज्या देशात प्रवास करतो त्या देशाकडे- तिथल्या माणसांकडे पाहणार त्याचा प्रत्यय अण्णा भाऊंना येतोच. रशियाला जाण्याआधीच त्यांचे रशियाला जायचे ठरते तेव्हा त्यांचे मित्र त्यांना रशियात काय पाहावे याबद्दलच्या नाना प्रकारच्या सूचना करतात- कुणी म्हणतो, रशियातली झोपडपट्टी पाहा- पुलाखाली किती लोक राहतात ते तपासा- तिथल्या 'पोलादी' पडद्यांची रुंदी, जाडी नोंदा- तिथे वर्णभेद, व्यक्तिस्वातंत्र्य, बेकारी किती प्रमाणात आहे ते शोधा- अशा वेगवेगळ्या सूचना केल्या जातात- अण्णा भाऊ हे सर्व नोंदतात आणि रशियाबद्दल लोकांचे कसे विचार असू शकतात याची जाणीव ते करून देतात. रशियाबद्दल 'पोलादी पडदा' हे 'पृथ्वीवरचे एकमात्र नंदनवन' येथपर्यंत विविध कल्पना मनात वागवणार! पुन्हा प्रत्येक सदस्याचा व्यवसायाचा प्रांत वेगवेगळा!

अण्णा भाऊ सतत काही तरी वेगळे शोधण्याच्या धडपडीत असतात. त्यांच्या काही प्रसंगाला हास्यास्पद रूप येते. उदा. 'रशियन' मनुष्य सतत

पळत असतो- घाईत असतो म्हणून आपणही पळू लागलो व त्याबद्दल रशियन माणसे हसू लागली इत्यादी वर्णन ते करतात. रशियन माणसाला 'सर्व माणसांनी इतके पळत राहण्याचे कारण काय' म्हणूनही ते विचारतात तर 'आम्हांला आमची सप्तवार्षिक योजना लवकर पूर्ण करायची आहे म्हणून' असे उत्तर मिळते. (पृ. २७)

तसेच नदीच्या काठी दारू पिऊन राहिलेला मनुष्य पाहिल्यावर तो बेकार असावा ही केलेली कल्पना (त्याला मारलेले वाळूचे दगड) किंवा बागेत दुपारी निवांतपणे पडून वाचत राहणारी रशियन माणसे 'कामधंदा' नसलेली असली पाहिजेत असा तर्क ते करतात आणि त्या माणसांना विचारतात तेव्हा ती सारी सेवानिवृत्त झालेली असून, आराम करीत आहेत असे कळते. त्यावर 'समाजवाद आलेला असल्याने औषधालाही बेकार मनुष्य सापडणार नाही' असा अभिप्राय अण्णा भाऊ देतात. (पृ. २७)

अण्णा भाऊ 'समाजवादाचे यश आणि मॉस्कोची माणसे कशी आहेत' या दोन प्रश्नांची उत्तरे सतत शोधत आहेत. (पृ.२४)

भव्य राजमार्ग, रेखीव इमारती, मोकळी माती ओवल्याप्रमाणे रस्त्याच्या दुतर्फा उभी असलेली एका जातीची, एका वयाची आणि समान उंचीची झाडे, मध्ये फुटपाथ आणि त्यावर फुलझाडाचे सुंदर ताटवे-ताटवेही मैलच्या मैल लांबीचे! स्वच्छ आरशासारखे रस्ते, ठिकठिकाणी सिगारेटची राख टाकण्याची कुंड्यांची सोय, मार्ग आणि चौक यांना कलावंतांची दिलेली नावे तसेच चौकाचौकात असलेले कलावंतांचे पुतळे हे सगळे जेव्हा अण्णा भाऊ पाहतात तेव्हा त्यांना ते समाजवादाचे यश वाटते तसेच साहित्य आणि इतिहास या दोन गोष्टी हातात हात घालून जागोजाग उभ्या असल्यासारखे वाटते.

अण्णा भाऊंना मॉस्कोमध्ये प्रोफेसर एब्गेनी चेलिशेव हे भेटतात. शिवाजी महाराजांचे चरित्र रशियन भाषेमध्ये ते लिहीत असतात. ते अण्णा भाऊंना शिवाजीबद्दल- तत्कालीन गोष्टींबद्दल विचारू लागतात तेव्हा दत्तो वामन पोतदार, न. र. फाटक, आचार्य अत्रे यांची नावे पुढे करून अण्णा भाऊ आपला बचाव करून घेतात. रशियन भाषेत भाषांतर झालेली लोकमान्य टिळक, नेहरू यांची चरित्रे, रामायण-महाभारताचे अनुवाद, टागोरांचे साहित्य तेथे वाचले जात असलेले पाहून, ऐकून अण्णा भाऊंना

*अण्णा भाऊ साठे नावाची कथामुद्राच मराठी कथासृष्टीत आकाराला आली आले आणि त्यामधील नायक मुद्रेवर जीवनवादी व परिवर्तनवादी आशयतत्त्व कोरलेले आहे.*

''मॉस्कोचे नागरिक विचारानं मुंबई, पुणे, दिल्ली या आपल्या शहरांतच वावरत आहेत'' असे वाटले आणि त्यावर ''हा सर्व आनंद होता आणि मी त्या लाल ताऱ्याखाली उभा राहून तो आनंद अनुभवला'' असे ते म्हणतात.

मॉस्कोमध्ये अण्णा भाऊंना लिओनिद भेटतो. हा सहा फूट उंचीचा, गोऱ्या रंगाचा, सदृढ देहाचा, तरतरीत चेहऱ्याचा आणि पाणीदार निळ्या डोळ्यांचा तरुण मुलगा त्यांना आवडतो. त्याने सुंदर कपडे घातलेले असतात. करड्या रंगाचा ओव्हरकोट त्याच्या अंगावर असतो. खांद्याला बॅटरी आणि गळ्यात कॅमेरा अशा थाटात तो त्यांना भेटतो. तो उत्तम फोटोग्राफर असतो. अण्णा भाऊंना तो आपला मित्रच वाटतो.

दोघांनाही पोटापुरतं इंग्रजी येत होतं आणि कुठे अडलं की, एकमेकांना कथकली नृत्याच्या पद्धतीच्या खुणा करून ते मार्ग काढीत होते. तो फक्त एकवीस वर्षांचा होता आणि त्याचे वडील दुसऱ्या महायुद्धात मारले गेले होते. त्याच्याशी बोलताना त्याचे लग्न झालेले नव्हते, पण त्यानं ते ठरवले होते. त्यांची प्रेयसी होती हे अण्णा भाऊंना कळते म्हणून ते लिओनिदला विचारतात-

''फोटोग्राफी करून तुमचा संसार चालणार का?'' त्यावर तो उत्तर देतो- ''इथं समाजसत्तावाद आहे नि त्यानं आम्हांला जगण्याची शाश्वती दिलेली आहे. हे तुम्ही विसरता साठेजी.'' (पृ. ३०)

हे प्रसंग उद्धृत अशासाठी केले की, समाजवादाचे यश शोधताना अण्णा भाऊंना ते अनुभवायला मिळतात. त्या अनुभवांवर अण्णा भाऊ भाष्यही करतात.

मॉस्कोतल्या सतत पळणाऱ्या माणसांना पाहून अण्णा भाऊ 'इथली माणसं' विचारी, प्रत्येक पाऊल देशहितार्थ टाकतात, त्यांना भविष्याची आस लागली आहे. एकही क्षण वाया दवडीत नाहीत. म्हणून सुखाचा सुगंध. अपार त्याग! रक्त, अश्रू, घाम, गाळून समाजवादाची प्रतिष्ठा

वाढवली, राखली असे अण्णा भाऊंचे भाष्य येते. (पृ. २७)

शिक्षकाशी साक्षरता-निरक्षतेबाबत संवाद झाल्यावर ते आपल्याला सांगतात-

''मुक्त माणसं, स्वायत्त माणसं आणि कष्टाळू माणसं यांचा तो देश आहे.'' (पृ. ३४) पुढे ते लिहितात- ''एखादी लबाड सत्ता डोंगराएवढे सत्य दडवू शकेल, परंतु तिला दारिद्र्य हे मुळीच दडवता येणार नाही, असे माझे मत आहे नि ते खरे आहे, असा माझा दावा आहे.'' (पृ. ३४)

''दारिद्र्य हे फार क्रूर असते नि नग्न असते.'' (पृ. ३४)

अण्णा भाऊंना तेथे दारिद्र्य आढळले नाही. समाजवादाने अमरापुरी निर्माण केली आहे असे त्यांना वाटले. ठिगळे लावलेले कपडे त्यांनी पाहिले नाहीत. रशियन माणसाचा श्रम हा धर्म आहे. त्याचे कारखान्यावर प्रेम होते तसेच कलेवरही प्रेम होते. एकूणच सर्व रशियन जनता म्हणजे उद्योग, विद्वत्ता, कला, साहित्य आणि उदात्त संस्कृती यांचा संगमच अशी त्यांची भावना आहे. बाळू म्हणजे आझरबैझानची राजधानी. ती राजधानी पाहताना अण्णा भाऊ मुस्लीम राष्ट्र पण समाजवादानं त्या राष्ट्राचं जीवन बदलून टाकलं आहे असे भाष्य करतात.

अण्णा भाऊंनी अशा प्रकारची भाष्ये करताना आपल्याला असे वाटू लागते, की हे सर्व बघून अण्णा भाऊ फार भारावून जाऊन सांगताहेत. अण्णा भाऊ साम्यवादी विचाराचे होते. रशियात जे जे दिसेल ते समाजवादानेच निर्माण केलेले आहे. संपन्न देशाबद्दल मनामध्ये कौतुकाची भावना निर्माण होणे हे वेगळे आणि त्या देशात जे जे असेल ते ते तसे स्वर्गतुल्य मानणे हे वेगळे त्यात श्रद्धेपेक्षा आंधळेपणाच जाणवू लागतो. 'लिओनिद'च्या प्रेमातसुद्धा ते समाजवाद जेव्हा पाहू लागतात तेव्हा (म्हणजे साम्यवादी प्रेमही काहीसे वेगळे व अपूर्व असे मानणे) ही अण्णा भाऊंची भावना निश्चित स्वरूपाची वाटू लागते.

येथे अनंत काणेकरांच्या 'धुक्यातून लाल ताऱ्याकडे' या प्रवासवर्णनाची आणि न. न. फाटकांच्या 'रशियाचे संक्षिप्त दर्शन' या रशियाच्या दोन प्रवास वर्णनांची आठवण येते. काणेकरही साम्यवादी विचाराचे होते. अण्णा भाऊ साठ्यांच्या आधी वीस-बावीस वर्षे काणेकर रशियाला जाऊन आले. त्यांनी रशियात हिंडताना गावे, शहरे, नाटके, चित्रपट पाहिले

◆ *नायिकेचे पारंपरिक दर्शन अण्णा भाऊंनी नाकारले. स्त्री ही केवळ भोगाचे साधन नसून, ती बरोबरीची जीवनसाथी आहे हा विचार अण्णा भाऊंच्या नायिकेने ठाशीवपणे मराठी साहित्यात प्रथमच पहिल्यांदा उभा केला.* ◆

- तिथल्या माणसांमध्ये मिसळले-बोलले. त्यांनाही रशियाबद्दल मनामध्ये एक प्रकारचा जिव्हाळा, आपुलकी आहे. जे चांगले ते चांगले कसे हे तेही आपल्या प्रवासवर्णनांमध्ये सांगतात. रशियाची प्रगती सांगतानासुद्धा त्यांनी चिकित्सक दृष्टी हरविली नाही- ते प्रत्येक गोष्ट पारखून पाहताहेत असे जाणवते. त्यांना जे खटकते ते, ते स्पष्टपणे सांगतात.

फाटक साम्यवादी कधीच नव्हते. पण इतिहासकार म्हणून रशियामध्ये घडलेल्या घटनांबद्दल त्यांच्या मनाने शोधकपणे नोंद घेतलेली होती. फाटकही रशियाला गेल्यावर ताश्कंदला जातात. सामुदायिक शेत फाटकही पाहतात. शेतकऱ्यांची संपन्नता तेसुद्धा अनुभवतात. वस्तुतः यंत्राने किंवा विज्ञानसंस्कृतीने आणलेली संपन्नता ही काही फक्त साम्यवादी रशियातच आली होती असे नव्हे. साम्यवादी नसलेल्या देशांमध्येही (रशियाप्रमाणेच दुसऱ्या महायुद्धामध्ये संपूर्ण बेचिराख झालेल्या देशांमध्येही) ही संपन्नता आलेली होतीच. संपन्नतेचे वरदान काही साम्यवादाचे नव्हते. फाटक हे साठ्यांच्या पाच-सहा वर्षांआधीच रशियाला गेले होते. त्यामुळे दोघांनाही रशियामध्ये जे पाहायला मिळाले. ते जवळपास सारखेच होते. त्यात दोन ध्रुवांचा टोकाकडचा फरक नव्हता. काणेकर दुसऱ्या महायुद्धाच्या आधी गेले होते. त्यामुळे अण्णा भाऊंनी पाहिलेल्या रशियापेक्षा पुष्कळ निराळा रशिया पाहायला मिळाला हे नक्कीच; पण काणेकरांचा रशिया साम्यवाद स्वीकारल्यानंतरचा केवळ वीस-बावीस वर्षे झालेला रशिया होता. त्यामुळे प्रत्येक गोष्टीची जडण-घडण, उभारणी रशियामध्ये चालू होती. ती काणेकरांना पाहायला मिळाली. त्या रशियात उभारणी करत असताना, अण्णा भाऊ म्हणतात ती जिद्द, उद्योगशीलता नवी नवी होती. भरीला प्रत्येक रशियन माणसाच्या मनातला उत्साह होता. 'अद्भुत' बदलाची

प्रक्रिया या भावनेने अण्णा भाऊ सांगतात.

अण्णा भाऊंनी उझबेकिस्तानमधील ताश्कंदमधूनही फेरफटका केला. तिथल्या थिएटरमध्ये काही नाटके पाहिली. रशियन भाषा कळत नसूनसुद्धा अण्णा भाऊंचे मन या नाटकाने पुरेपूर खेचून घेतले. एका रशियन प्रेक्षकाने 'रशियन न कळताही हसलात कसे' असे विचारल्याबरोबर 'खरी कला ही सदैव काळजाशी भिडून बोलत असते. तिला कानांची गरज भासत नाही' असे त्यांनी उत्तर दिले.

अण्णा भाऊ प्रसंगामागून प्रसंग सांगत जातात. स्थूल वर्णनाच्या भरीस ते पडत नाहीत. याचे कारणही एकच, की त्यांचा पिंड कादंबरीकाराचा होता. कादंबरीकाराच्या कथानकात प्रसंग घडावेच लागतात.

प्रसंग हे सांगणे हे अण्णा भाऊंचे वैशिष्ट्य या प्रवासवर्णनात कमी आले आहे. स्थलवर्णन ओघाओघाने येईल तेवढेच या ओघाने आलेल्या वर्णनातूनच आपल्याला ते मॉस्कोचा ऐसपैस प्रशस्तपणा, लेनिनग्राडमधल्या दुसऱ्या महायुद्धाच्या उरलेल्या सावल्या, कॉ. लेनिनची खोली, ऑक्टोबर क्रांतीची ज्या जहाजावर सुरुवात झाली ते तेव्हा नदीतले जहाज, करेन्स्की सरकारला जेथे अटक झाली ती खोली, शेतकऱ्याचे घर, ताश्कंद जवळचे 'स्तालिन सामुदायिक शेत' इत्यादीबद्दल सांगतात. एखादा चलतचित्रपटच आपण पाहत आहोत असे आपल्याला वाटू लागते. या सगळ्या सांगण्यातून त्यांची कलावंताची संवेदनशील वृत्ती, श्रद्धाशीलता उत्कटपणे प्रत्ययाला येते.

रशियातून हिंदुस्थानात परत येत असताना अण्णा भाऊ अंतर्मुख होतात. सर्व दौरा त्यांच्या मनात पुन्हा जागा होत असतोच पण त्या वेळी त्यांच्या मनःचक्षूंपुढे एक दृश्य उभे राहत असते. अकरा वर्षे वयाचे अण्णा भाऊ दोनशे सत्तावीस मैल पायी चालत चालत मुंबईला येत असतात हे दृश्य उभे राहते. लगेच दृश्य पालटते आणि त्यात विमानात मिनिटाला दहा मैल भरारी मारत जाणारे अण्णा भाऊ दिसू लागतात.

कदाचित अण्णा भाऊ स्वतंत्रपणे रशियाला गेले असते आणि थोडा अधिक काळ त्यांना तेथे राहता-हिंडता आले असते तर अधिक सकस, अस्सल प्रवासवर्णन आपल्याला अण्णा भाऊंनी दिले असते असे जाणवण्याजोग्या खुणा या प्रवासवर्णनात नक्कीच आहेत.

◆ *अण्णा भाऊंच्या नायिका केवळ शरीर सौंदर्याचे वर्णन करणाऱ्या कचकड्याच्या बाहुल्या नाहीत. त्या रणरागिणी, महिषासुरमर्दिनीच्या स्वरूपातील आहेत.* ◆

## ‘वाटेगाव ते रशिया प्रवास’
## - प्रा. डॉ. गंगाधर पानतावणे

अण्णा भाऊंच्या पायांना भिंगरी बांधली होती. हे खरं असलं तरी रशियाला जाईपर्यंतच्या त्यांचा प्रवास पोटासाठी, प्रचारासाठी, भुकेसाठी आणि कलाप्रदर्शनासाठी होता. त्या साऱ्या प्रवासात बेचैनी होती. जगण्याशी नाळ बांधलेले अण्णा भाऊ साठे चार घटका करमणुकीसाठी कधी प्रवासाला गेले असं म्हणता येत नाही. सुखवस्तू जीवनाशी फारकत असलेल्या या महान लेखकाला रशियाला जाण्याची संधी लाभली ती एका कारणानंच. त्यांच्या ‘फकिरा’च्या कादंबरीला शासनाचा पुरस्कार मिळाला. ‘इंडो सोव्हिएत कल्चर सोसायटी’. संस्थेने अण्णा भाऊंना शिष्टमंडळाबरोबर रशिया भेटीचं निमंत्रण दिलं.

रशियाला जाण्याची अनिवार इच्छा त्यांच्या मनात होती. पण जुळून येत नव्हतं. कामगारांचं राज्य असलेल्या देशात, कामगारांच्या लढाऊ चळवळीत असलेल्या अण्णा भाऊंचं रशियाचं आकर्षण स्वाभाविकच होतं. त्यामुळं संधी आली तेव्हा त्यांचं मन हरवून जाणंही स्वाभाविकच होतं. ‘माझा रशियाचा प्रवास’ ही त्याची साक्ष आहे. त्यांचं मन कसं आनंदून गेलं होतं. हे त्यांच्या शब्दातून कळतं. ‘‘रशियातील ते कामगार राज्य कसे असेल, तिथे कॉ. लेनिनने क्रांती कशी केली, मार्क्सचे महान तत्त्वज्ञान कसे साकार झाले असेल, ती नवी दुनिया, नवी संस्कृती, नवी सभ्यता कशी फुलत असेल या विचारानं माझं मन भारावलं होतं, मी वेडाच झाला होतो आणि हे सारं साकार झालं.’’ वयाच्या अकराव्या वर्षी अण्णा भाऊ गाव सोडून मुंबईला निघाले. तब्बल दोन महिन्यांत त्यांनी दोनशे सत्तावीस मैलाचं अंतर कापले होते. गाडीखर्चाला दमडी नव्हती म्हणून ते पायीपायीच निघाले होते आणि आता रशियाला विमानमार्गाने निघाले. आयुष्यातल्या या अघटित वाटाव्यात अशाच या घटना.

'माझा रशियाचा प्रवास' म्हणजे अण्णा भाऊंची प्रवासाची नोंद एक छोटी दैनंदिनी म्हटलं तरी चालेल. परंतु ही दैनंदिनी अनुभवांचा उल्लेख व आलेख मांडणारी आहे. इथे रशियावर, रशियातल्या माणसावर, रशियातल्या कलेवर आणि रशियातल्या संस्कृतीवर प्रेम करणारा लेखक आपल्याला भेटतो. त्यामुळे हे प्रवासवर्णन रूढ असं नाही की, जड असं नाही. अकारण, इमारतीच्या, रस्त्याच्या, वास्तूच्या किंवा पंचवार्षिक योजनेचे रकाने भरून तपशील देण्याच्या रूढ जंत्रीत लेखक पडत नाही. आत्मगौरवाचा लवलेशही नाही. स्वतःवर फाजील प्रेम करणारी माणसं शब्दांची कारंजी उडवीत असतात. तसंही इथं घडलं नाही आणि म्हणूनच भारताइतकंच रशियावर प्रेम करणाऱ्या अण्णा भाऊंनी कुठंही फापटपसारा केला नाही की बडेजाव केला नाही व रसिक, चोखंदळ आणि सुजाण मन रशियातल्या वातावरणात कसं सुखावलं याची सरळसोट अशी कहाणी म्हणजे 'माझा रशियाचा प्रवास'.

मुंबईत आचार्य अत्रे आणि दिल्लीत कॉम्रेड डांगे यांच्या शुभेच्छा घेऊन अण्णा भाऊ 'चितोड की रानी' या भारतीय विमानात बसले खरे परंतु 'कोण हा इसम' अशाच सगळ्यांच्या नजरा. एक काळाकुट्ट, किरकोळ बांध्याचा, साधा पोशाख असलेला गळ्यात टाय नीट न बांधणारा माणूस विमानानं रशियाला जातोय याचं आश्चर्य सहप्रवाशांच्या चेहऱ्यावर असणं स्वाभाविकच होतं. अण्णा भाऊ तर मिस्किलपणे म्हणतात, ''या सगळ्याच्या नजरा माझ्याकडे पाहून जणू काही म्हणत असतील. 'हा एक महामूर्ख आहे बरं का? शिष्टमंडळातील इतर प्रतिनिधी उच्चभ्रू होते; पदवीधर होते, संपन्न होते. म्हणूनही असेल कदाचित त्याच्याशी तार जुळणं शक्य नव्हतं; परंतु विमानातही काही लोक असे होते, ज्यांना अण्णा भाऊ या थोर लेखकाचा सुगावा लागत होता आणि त्यामुळेच काही वेळानं का होईना शिष्टमंडळातील इतर 'शिष्टां'ना त्याचं महत्त्व जाणवलं होतं. उशीर झाला होता, पण महत्त्व पटलं होतं.''

विमानातून पहिल्यांदा इतक्या दूरवर प्रवास करणाऱ्या माणसाची मानवी अवस्था कशी होते याचं अतिशय सुरेख वर्णन अण्णा भाऊंनी केलं आहे. विमान अंतराळातून जात असलं तरी त्यांचं मन मुंबई आणि स्वतःच्या त्यांच्या घरातील पत्नीच्या आठवणींनी गदगदून गेलं होतं. आईच्या

◆ *'माझा रशियाचा प्रवास' हे प्रवासवर्णन लहान, चिमुकले पण अर्थपूर्ण आहे. त्यामुळे ते वाचनीय झाले. त्याचे एकमेव कारण म्हणजे अण्णा भाऊंची 'प्रवास' सांगण्याची धाटणी!* ◆

प्रतिमेपुढील तेवणाऱ्या निरंजनाचा प्रकाश त्याच्या डोळ्यापुढून हटत नव्हता आणि मॉस्कोच्या विमानतळावर विमान थांबल्यानंतर गांगरून गेलेली मनोवस्था! अण्णा भाऊंनी त्याचे केलेलं शब्दांकन त्यांच्याच शब्दात असं-

''मी फार गांगारलो होतो. मला भानच उरलं नव्हतं. माझा चेहरा पडला होता. सर्वांच्या शेवटी मी पाय ओढीत चालत होतो. मी आपला ओव्हरकोट काखेत दाबून धरला होता आणि चोरासारखा सर्वत्र पाहत होतो. समाजवादी माणसं न्याहाळीत होतो. भयंकर थंडी वाजत होती. त्याची मला जाणीव नव्हती. थोडक्यात मी भांबावूनच गेलो होतो... 'तुम्हाला थंडी वाजत नाही' कझकीना नावाची एक महिला जवळ येऊन म्हणाली. त्यामुळे मी अधिकच गोंधळून गेलो नि उत्तरलो. -'छे कुठे आहे थंडी'- पण त्यावेळी माझ्या नाकातोंडातून वाफेचे लोट बाहेर पडत होते.'' (पृ. ८) रशियन माणसांना मॉस्को हे त्यांच्या हृदयासारखं वाटतं आणि ते स्वाभाविक आहे. हे हृदय जपणाऱ्या रशियन स्त्री-पुरुषांच्या भेटीत अण्णा भाऊंना रस होता. म्हणूनच 'सोव्हिएत स्काय' या आलिशान होटेलात पोहचल्यानंतर कॉ. बारनिकोव यांच्या 'उद्या काय पाहणार आहोत' या प्रश्नाला माणसाच्या गर्दीत आयुष्य वेचणाऱ्या अण्णा भाऊंनी उत्तर दिलं. 'रशियातली माणसं रशियातला समाजवाद' याच माणसांच्या माध्यमातून जोखता येऊ शकतो ही त्यांची धारणा असावी.''

अण्णा भाऊंना विविध क्षेत्रांतील माणसं भेटली. प्रवाशांची देखभाल करणारी प्रेमळ बाई, रशियात मराठी भाषा शिकवणारी प्रा. ततियाना कातेनिया, फोटोग्राफर लिओनिद, इतिहासतज्ज्ञ प्रोफेसर एब्गेनी चेतिशेव, हमीदसाहेब, साहित्यिक कॉ. नबीमोहमद, मोटार ड्रायव्हर, होटेलात काम करणाऱ्या मुली आणि किती तरी ही सगळी माणसं आपल्या देशावर प्रेम करतात. संस्कृती आणि काम यांच्यावर प्रेम करतात. इतिहास जतन करणं हा रशियन माणसाचा स्वभाव. अण्णा भाऊ १९६० मध्ये हे सारं

रशियामध्ये पाहत होते. त्यांनी हेही पाहिलं की, लेनिननं रशिया घडवला आहे. आणि लेनिन रशियाचा आवडता नेता आहे.

अण्णा भाऊ जसे शहरात हुंदडले, तेथील संस्कृती पाहिली तसेच ते खेड्यातही गेले, रशियातली खेडी ही भारतीय अर्थाने खेडी नसतात. किंबहुना ती शहरेच असतात इतका विकास आणि अद्ययावतता खेड्यात आहे. भारतातील खेडी अजूनही अश्मयुगात वावरतात. आधुनिकतेचा स्पर्श अजूनही या खेड्यांना नाही. पुराणप्रियता हाच आमच्या खेड्याचा स्थायिभाव. त्यामुळे ज्याला खऱ्या अर्थाने आधुनिकता म्हणावी अशी रशियातली खेडी पाहून अण्णा भाऊ विस्मयचकित होणे स्वाभाविक होते. श्रमाला प्राधान्य देणारी ही खेडी, स्वयंपूर्ण होती. श्रम हाच तिथं धर्म आहे. नि रशियन मानव तो धर्म काटेकोर पाळतो आणि त्यातच त्याच्या प्रगतीचे गमक आहे. (पृ. ४३) 'सामुदायिक शेती' हा तर रशियाचा समाजवादी प्रयोगच आहे. स्वतः अण्णा भाऊंनी ताश्कंदजवळील 'स्तालिन सामुदायिक शेत' प्रकल्प पाहिला आणि आपली मती गुंग झाली असंच म्हटलं. कारण एकेकाळी तीनशेतीस एकर जमिनीची आता एकहजारपाचशे हेक्टर जमीन झाली होती. जेथे दोन ट्रॅक्टर होते आता तेथे चौतीस ट्रॅक्टर आले. ११०४ पुरुष शेतकरी आणि ४७५ स्त्रिया सामुदायिक शेतीत व्यस्त होते. तिथेच चार शाळा होत्या. कोंबड्या, गाई, मेंढरं, दवाखाना, प्रसूतिगृहं, घरं सारं सारंच तेथे होते. ही खेड्यातील स्वयंपूर्णता रशियाने आपल्या विकासाचा घवघवीत आलेख म्हणूनच सिद्ध केला आहे. या शेतीचं वर्णन करताना अण्णा भाऊ आश्चर्यमुग्ध तर झालेच; पण शेतीशी निगडित असणाऱ्या काही बाबींचा तपशीलही त्यांनी दिला. वाचकांना गंमत वाटावी, असाही एक उल्लेख त्यांनी केला आहे. दूध केंद्राच्या संदर्भात ते म्हणतात,

''अकराशे पाळीव गाईंचे दूध काढण्यासाठी तेथे निराळे दूध केंद्र निर्माण करण्यात आले असून, एकाच वेळी १६ गाई स्वखुशीने येऊन दूध देत असतात. त्या मळ्यात १३ दूध काढणारी यंत्रे बसविली असून, गाई रांग लावून दूध देत असतात.'' (पृ. ५४)

रशियातले समाजवादाचं दर्शन अण्णा भाऊंना झालं ते खेड्यात आणि शहरात. एकूण हा देशच आपल्या राष्ट्राच्या उत्थानासाठी झटतोय, परिश्रम करतो येथे बेकारी नाही, भिकारी नाहीत, आळस नाही आणि

◆ *आपल्याला ते शिष्टमंडळातल्या सदस्यांचा परिचय ते दोन-तीन निरनिराळ्या पातळ्यांवर करून देतात. त्या परिचय करून देण्याच्या पद्धतीत वरवर धारण केलेला एक प्रकारचा भाबडेपणा आहे. पण अंतर्यामी अण्णा भाऊंची एक मिश्कील अशी दृष्टी आहे.* ◆

कोणी उपाशीही नाही. समाजवाद रुजल्याची यापेक्षा दुसरी खूण कोणती असणार!

आणि हा समाजवाद अण्णा भाऊंना जसा जीवनात दिसला तसा तो साहित्य आणि कलातही त्यांचा अनुभव झाला. मॉस्कोच्या बोल्शेविक थेटरात 'दगडाचे फूल' हा ऑपेरा पाहताना याची त्यांना विशेषत्वाने जाणीव झाली. या ऑपेरातून कलाप्रिय रसिक माणूस तर त्यांना दिसलाच, परंतु सामूहिकतेचं दर्शनही त्यांना घडलं. ताश्कंदमधील 'दिलराम' या नाटकातील गरीब मुलगी आणि चित्रकार यांचं परस्परावरील प्रेम आणि सरंजामशाहीचं प्रतीक असलेल्या राजाने त्या सुंदर कन्येला बळजबरीने राणीपद देणं, पण अजूनही त्या मुलीच्या मनात एक खोल ठसा उमटवला. एका जुलमी राजानं एका गरीब मुलीच्या प्रेमाची निर्भर्त्सना करून तिच्या प्रियकराला तुरुंगात डांबलं. परंतु याच गरीब मुलीने क्रूरकर्मा राजावर मात केली आणि आपल्या विशुद्ध प्रेमासाठी आत्मबलिदान केलं. सरंजामशाही, राजेशाही यांचा निषेध हेच सूत्र नाटकात होतं. कलेतही प्रतिबिंबित झालेला समाजवाद अण्णा भाऊंना सुखावून गेला...

अण्णा भाऊ साठे यांचे 'माझा रशियाचा प्रवास' हे पुस्तक छोटं असलं तरी विविध अनुभवांनी ते समृद्ध आहे. अत्यंत साध्या, सोप्या आणि खेळकर भाषेतील हा प्रवासानुभव रशियन समाजाचा आणि संस्कृतीचा सहजतेने आलेख मांडतो. कुठेही भाषेचं अवडंबर नाही की वर्णनाचा फापटपसारा नाही. अण्णा भाऊंच्या डोळ्यांनी जे पाहिलं आणि जे मनात साठवलं त्याची अतिशय काटेकोर मांडणी या पुस्तकात आहे. रशियाविषयी वाचकांच्या मनात असलेले अनेक प्रश्न निश्चितपणे या छोट्या प्रवास वर्णनाने सुटतात. हे प्रश्न सुटावेत ही भूमिका लेखकाची नाही. त्यासाठी त्यांनी प्रवास वर्णनेही लिहिलेली नाही...

‘‘रशियात मी नवी सृष्टी पाहिली, एक नवा समाज पाहिला. समाजवादाच्या सावलीत वाढलेली मुलं नि फुलं पाहिली. जर मी सोविएत देश पाहिला नसता तर माझ्या जीवनात एक फार मोठी पोकळी राहून गेली असती.’’ (पृ. ३३)

अण्णा भाऊंचं हे प्रांजळपण सबंध प्रवास लेखनात जाणवत राहतं.

## अण्णा भाऊ साठे गेले मॉस्कोच्या लाल देशात!
**- प्रा. बा. ह. कल्याणकर**

अण्णा भाऊ साठे मराठी साहित्यात एक चमत्कार वाटावा, असे महान प्रतिभावंत होते. ग्रामीण मातीत पिकलेलं अस्सल बावनकशी सोन्यासारखं त्यांचं साहित्य होतं. ते ज्या मातीत जन्मले, वाढले त्या मातीच्या सर्व स्वप्नांशी त्यांचं इमान अतूट राहिलं.

अण्णा भाऊंचं खरं विद्यापीठ सामान्य माणसांचं जग हेच होतं. लोकांएवढं जीवनाचं मोठं विद्यापीठ कोणतं असू शकते? ज्या जीवनात सततच सृजन आहे, सातत्यपूर्वक निर्माण आहे, त्या धगधगत्या जीवनात अण्णा भाऊ अनेक अनुभव जगले. जे जे जगले त्यांनी जे भोगलं, पाहिलं, अनुभवलं ते सर्व निरीक्षण त्यांनी आपल्या कथेचा, कादंबऱ्यांचा आत्मा केलं. शब्दात आलेलं सामान्य माणसाचं जिवंत जग म्हणजेच त्यांचं साहित्य होय. ते पुस्तकांच्या दुनियेतून घडलेले लेखक नव्हते, पण त्यांनी अनेक पुस्तकांना घडवलं. अक्षरांच्या जीवनाचा खोलवर संस्कार लाभावा, अशी त्यांची परिस्थिती नव्हती. ‘वाचनातून लेखक होण्याच्या इच्छेला प्रोत्साहन मिळत असते.’ असं अमेरिकन लेखक सॉल बेलो या नोबल पारितोषिक विजेत्या लेखकानं म्हटलं आहे. माणूस अनुकरणातूनच तयार होतो. कारण सारं मानवी जीवनच अनुकरणातून घडते. अण्णा भाऊंना अनुकरण करावं, असं मॉडेल समोर कोणतं होतं? वाचनासाठी शिक्षण तर हवं मग पुस्तकं वाचणार कशी? त्यांच्यासमोर श्रमाचं, कष्टाचं, मजुरीचं जीवन होतं. त्या जीवनात ते थांबले नाहीत ते ताठ मानेनं आणि खंबीर मनानं जीवनात ठामपणे उभे राहिले. महाराष्ट्रातील अनेक खुजे, सुमार कुवतीचे लेखक आपण फक्त लिहितो, पण वाचत नाही, अशा शेखी मिरवीत असतात. अशा लेखकांना जीवन कळालेलं नसते. ज्यांना जीवन कळत नाही.

*'रशियन' मनुष्य सतत पळत असतो- घाईत असतो म्हणून आपणही पळू लागलो व त्याबद्दल रशियन माणसे हसू लागली इत्यादी वर्णन ते करतात.*

त्यांना जीवनाचं दर्पण असलेल्या साहित्याचं मोल काय कळणार? ते का लिहितात? कुणासाठी लिहितात हे त्यांना आयुष्यभर लिहून कळतंच असं नाही, अण्णा भाऊ जीवनवादी लेखक होते. ते चळवळीत कार्यकर्ते होते. परिवर्तनवादी विचारसरणाची त्यांची बांधिलकी होती. आपण जे काही लिहितो ते सर्वसामान्यांना कळावं ही ओढ त्यांच्या सर्व लेखनात होती. त्यांना थेट लोकांशी संवाद साधणारी साधी, सोपी, सुबोध सरळ अशी भाषाशैली सापडली होती. हा संवाद साधण्यामागे समकालीन परिस्थितीत जगणाऱ्या माणसांविषयीची आस्था हाच त्यांच्या लेखनाचा प्राण होता. समाजाला वर्तमानकालीन प्रश्नांची आणि जीवनाची जाण यावी, ही धडपड त्यांच्या साऱ्या कलाकृतीमागे होती. त्यांची वाणी आणि लेखणी साध्या, सोप्या आणि हृदयाला भिडणाऱ्या पद्धतीची होती. वाणी आणि लेखणीद्वारे उच्च विचारसरणी ते आयुष्यभर मांडत राहिले. त्यांच्या एका हातात लेखणी होती आणि दुसऱ्या हातात फड होता. अंगात वादळासारखी चळवळ होती. या साऱ्याचं मूल्य माणूस हाच होता. एक आंतरराष्ट्रीय एकतेचं स्वप्न पाहणारा माणूस. त्यांचं पुस्तक माणसांचं मस्तक उन्नत करणारं होतं. आपली मराठी भाषा अधिक संस्कृतप्रचुर ठरून त्या लोकभाषेला अवघड बनविण्याचे जोरदार प्रयत्न सुरू असतानाच अण्णा भाऊ लोकांच्याच भाषेत लिहीत राहिले. श्री. पु. ल. देशपांडे यांनी त्यांच्या एका लेखात एक सुंदर विचार मांडला होता. ''ज्ञानाच्या भुकेने वाचक जेव्हा पुस्तकाकडे येईल, त्यावेळी एका पंडिताने दुसऱ्या पंडितासाठी लिहिलेल्या पुस्तकातून त्याला एकच संदेश मिळणार आहे, तो म्हणजे ज्ञान मिळवणं हे तुझं काम नव्हे. मराठी ही ज्ञानाची भाषा नव्हे. आधी संस्कृत शिक, मग इंग्लिश शिक. म्हणजे तुला आमचं मराठी कळेल.''

अण्णा भाऊ साठे यांचं सारं लेखन स्कॉलर वर्गासाठी नव्हतं. ते उपेक्षित वर्गाचे लेखक होते. मराठी भाषेचं लोकशाही राज्य मानणारे ते

प्रतिभावंत होते. त्यामुळे त्यांनी आपल्या लेखणी, वाणीतून ज्ञान आणि आनंद लोकांपर्यंत पोहचवण्याचं व्रत आयुष्यभर सांभाळलं. त्यांच्या कथा, कादंबऱ्या आणि इतर सारंच लेखन त्यामुळंच लोकांना भावलं. साहित्याचा संस्कार नसलेल्या समाजापर्यंत ते पोहचले. त्यांच्या साहित्यातून नवा वाचकवर्ग निर्माण झाला. त्यांची ज्याची संख्या खूप मोठी आहे इतकी पुस्तकं निघाली. त्या पुस्तकातलं आपलं वेगळेपण सांगणारं छोटेखानी पुस्तक म्हणजे 'माझा रशियाचा प्रवास' हे पुस्तक होय.

रशियाला ते जेव्हा निघाले होते तेव्हा त्यांचे मित्र सांगत होते.

१) 'तुम्ही रशियात झोपड्या किती आहेत. ते पाहून या बरं का!'

२) पुलाखाली किती लोक राहतात याची काळजीपूर्वक तपासणी करा.

३) पोलादी पडद्याची जाडी किती आहे, याची नोंद करून या.

४) देव निर्वासित झाले आहेत ते कुठे राहतात ते बघा.

अशा सूचना करण्यात आल्या याची नोंदही अण्णा भाऊ साठे यांनी त्यांच्या या प्रवासवर्णनात केली आहे.

दिल्लीवरून मॉस्कोकडे ते निघाले होते. या वेळी श्रीपाद अमृत डांगे खासदार होते. त्यांच्या घरी अण्णा भाऊ पोहचले होते. 'आमचा अण्णा मॉस्कोला निघाला' असे उद्‌गार अण्णा भाऊंच्या पाठीवरून हात फिरवीत सौ. उषाताई डांगे म्हणाल्या. तेव्हा आपणाला आईची आठवण झाली, असं अण्णा भाऊंना वाटत होतं. मातृभूमी सोडण्याचं दुःख आणि सोव्हिएत देश पाहण्याचे सुख याचा विलक्षण संगम अण्णा भाऊंच्या मनात झालेला असताना कॉ. अमृत डांगे अण्णा भाऊंचा साहेबी पोशाख पाहून गालात हसत होते. त्यांनी अण्णा भाऊंचा गळबंध सरळ बांधला. अंगातील कोटावरून त्यांनी ब्रश फिरवला. त्यांच्या पाठीवर थाप मारली. 'ज्या हातांनी कामगारांच्या अनेक पिढ्या घडवल्या न लढवल्या ते हात पाठीवरून फिरताच माझं काळीज डोंगराएवढं झालं. मुंबईत आचार्य अत्रे आणि दिल्लीत डांगे यांचा आशीर्वाद घेऊन 'चितोड की रानी' या भारतीय विमानाने मी आकाशात झेप घेतली' या कृतज्ञतेच्या भावनेचा उल्लेख अण्णा भाऊ आवर्जून करतात. ही झेप एका प्रतिभावंताची होती. एका क्रांतिकारक कवीची होती. चळवळीतल्या कार्यकर्ता साहित्यिकाची होती. ॲटमबॉम्बने होणार नाही, पण पुस्तकानं केलेल्या एका महान

◆ *एका रशियन प्रेक्षकाने रशियन न कळताही हसलात कसे असे विचारल्याबरोबर 'खरी कला ही सदैव काळजाशी भिडून बोलत असते. तिला कानांची गरज भासत नाही' असे त्यांनी उत्तर दिले.* ◆

क्रांतीची ही झेप होती. मातीत राबणाऱ्या हातांना आता आकाशाचे बळ मिळालं होतं. वाटेगावसारख्या एका छोटुशा गावातल्या दलित वस्तीत वाढलेला अण्णा भाऊ नावाचा पोरगा एक नवा देश पाहायला निघाला होता. ज्या समाजव्यवस्थेनं ज्यांना सारं तत्त्व जवळून बघायला बंदी घातली होती, तोच दलित समाजातला माणूस मॉस्कोच्या लाल देशाकडे निघाला होता. 'विमान हिमालयाला बगल देऊन भरारी मारीत होतं. खाली डोंगर टेकडीसारखे दिसत होते. नद्यांना ओघळीचं स्वरूप आलं होतं. एखाद्या शहरातील इमारती काड्याच्या पेट्याएवढ्या दिसत होत्या.' अण्णा भाऊ वर्णन करताना पुढे लिहितात, 'विमानाने मुंबई ते मॉस्को दरम्यान मी भरारी मारीत होतो. माझ्या चक्षूपुढे मुंबई दिसत होती. माझ्या आईच्या प्रतिमेपुढे मुंबई दिसत होती. माझ्या आईच्या प्रतिमेपुढे शांता नि शकुंतला यांनी निरंजन लावले होते. ते मी परत येईपर्यंत जळणार होते. त्यांचा मी विचार करीत होतो. ते निरंजन जळत असेल, तेवत असेल...' अण्णा भाऊंच्या लेखनातील या ओळी मला कम्युनिझमच्या मर्यादा सांगून जातात असे कल्याणकर म्हणतात. कम्युनिस्ट असलेल्या अण्णा भाऊंना हिंदुत्वाचे संस्कार सोडता आले नव्हते. लहान वयातले संस्कार क्रांतिकारी तत्त्वज्ञान संपवू शकते. पण हा प्रसंग मला तसा गौण वाटतो. कारण माणूस हा एक गुंतागुंतीची प्रक्रिया आहे. असे त्यांना वाटे.

अण्णा भाऊंच्या सोबतच्या प्रतिनिधी मंडळात विविध व्यवसाय, विविध छंद असलेली माणसं होती. एक आमदार, एक सॉलिसिटर, एक पियानोवादक, स्वतः अण्णा भाऊ लेखक. अण्णा भाऊंना रशियातली माणसं पाहायची होती. 'माणूस' हाच खऱ्या लेखकाचा पहिला गुण असतो. ते पाहत होते. यंत्रच माणसाचा गुलाम होऊन कसं काय करते ते. त्यांना रशियात हृदयात आनंदाचा सागर होऊन जशी माणसं भेटली, तशीच दारू आणि भारतीय कबाब भेटला. मग डोकीच धडावेगळी झाली.

◆ *जगण्याशी नाळ बांधलेले अण्णा भाऊ साठे चार घटका करमणुकीसाठी कधी प्रवासाला गेले असं म्हणता येत नाही.* ◆

रशिया हा नव्या तत्त्वज्ञानाचा, समाजसत्ताक तत्त्वज्ञानाचा देश होता. तिथं सर्व काही शांत वाटत होतं. फलाटावर जळकी काडी नव्हती. पेटती सिगारेट नव्हती. कसली पोस्टर नव्हती. आपल्याकडे पोस्टरवरल्या मीनाकुमारीला मिशा लावणाऱ्या आणि पृथ्वीराज कपूरच्या मिशा भादरणारे असे तिथं प्रकार नव्हते. अण्णा भाऊ आपल्या प्रवासवर्णनातला अनुभव लिहितात. 'एका खिडकीजवळ एक सुंदर तरुणी बसली होती. तिची मान कलती होऊन ती काचेवर टेकली होती. तिने डोळे झाकले होते. ते डोळे न उमललेल्या कळीप्रमाणे बंद होते. तिच्यापुढे एक लहानसा नागरिक विसावा घेत होता.'

अण्णा भाऊंना या प्रवासात माणसं भेटली. त्यांना मैत्रीसाठी नवनवीन माणसे भेटली. लेनिनग्राड विश्वविद्यालयातील मराठीचा अभ्यास सुरू होता आणि इथे महाराष्ट्रातील मराठी आपण संपवत आहोत. असे अण्णा भाऊंना ते दृश्य पाहून वाटते. त्यांना रशियात मराठी पुस्तकं भेटली. मॉस्को शहराच्या फुलाच्या ताटव्यातून पुस्तकं वाचणारी तरुण-तरुणी त्यांनी पाहिले. 'खरे म्हणजे रशियन माणूस हा इतिहासप्राय आहे.' असे अण्णा भाऊ साठे आपल्या प्रवासवर्णनात नमूद करतात.

अण्णा भाऊ माणसं पाहत फूटपाथनं भटकत होते. त्यांना रशियातला नवा माणूस पाहायचा होता. रशियातला नवा बदल अनुभवायचा होता. तेथे कामाची सक्ती त्यांना दिसली नाही. येथे यंत्रच माणसांचा गुलाम म्हणून काम करताना दिसत होते. अण्णा भाऊ रशियात पंख फुटल्याप्रमाणे विमानाच्या भराऱ्या अनुभवत नवा रशिया अंतःकरणात साठवीत होते.

''लेनिनग्राडला लागूनच १९४२च्या दुसऱ्या महायुद्धात ज्यांनी हौतात्म्य पत्करलं. त्यांची स्मृती कायम ठेवणारं उद्यान आहे. त्या उद्यानात हजारो लोक फुले घेऊन येतात आणि त्या अग्निकुंडापुढे उभे राहून तुम्ही ज्याकरिता मेला, त्यासाठी आम्ही जगत आहोत.'' असंच या उद्यानाला भेट देणारा प्रत्येक जण ही जाणीव घेऊन जात असतो. लेनिनग्राडचं म्युझियम हजारो

◆ *वयाच्या अकराव्या वर्षी अण्णा भाऊ गाव सोडून मुंबईला निघाले. तब्बल दोन महिन्यांत त्यांनी दोनशे सत्तावीस मैलाचं अंतर कापले होते. गाडीखर्चाला दमडी नव्हती म्हणून ते पायीपायीच निघाले होते आणि आता रशियाला विमानमार्गाने निघाले. आयुष्यातल्या या अघटित वाटाव्यात अशाच या घटना.* ◆

वर्षांच्या वस्तू सांभाळणारं वस्तुभवन बनलेलं आहे. सम्राट चंद्रगुप्तापासून आजपर्यंतची (तेव्हाची) सर्व नाणी अण्णा भाऊंना या म्युझियममध्ये पाहायला भेटली. अण्णा भाऊ साठे हे स्वतः एक कम्युनिस्ट होते. त्यामुळे रशियातला माणूस, त्यांचं जगणं, त्यांचं स्वप्न जवळून पाहू इच्छित होते. ते लाल ताऱ्याच्या आकाशाखाली भ्रमण करीत होते. समाजवादाचं यश नि या देशातील माणसं याचं अण्णा भाऊ यांना खूपच जास्त आकर्षण होतं. 'भव्य राजमार्ग, रेखीव इमारती माळेत मोती ओवल्याप्रमाणे त्यांना ते वाटत होते. रस्त्याच्या दोन्ही बाजूला म्हणजे दुतर्फा उभी असलेली झाडं आणि तीही एका जातीची, एका वयाची आणि समान उंचीची, मध्ये फूटपाथ, त्याच्या आत फुलझाडांचा सुंदर ताडवा हे सर्व स्वच्छ सुंदर, आरशासारखं मॉस्को शहराचं वैभव अण्णा भाऊ मनःपूर्वक पाहत होते. या वेळी त्यांचे डोळे फुलपाखरांनी बागेत भिरभिरावे तसे नाचत होते.

मॉस्कोचं सौंदर्य अण्णा भाऊ साठे यांनी 'माझा रशियाचा प्रवास' या त्यांच्या पुस्तकात निर्व्याज भावनेने. आस्थेने ओतले आहे. 'जळकी काडी त्या रस्त्यावर टाकायची नाही. असा मॉस्कोच्या माणसांनी पणच केला आहे. जी माणसं आपल्या राजमार्गावर इतकं प्रेम करतात ती आपल्या देशावर किती प्रेम करीत असतील.' असा प्रश्न त्यांना पडलेला होता. त्याचं उत्तरही ते जे रशिया पाहत होते त्यातच दडलेलं होतं.

रशियात कवी, लेखक, प्रतिभावंत यांना मानाचे सन्मान मिळतात. हे सांगताना अण्णा भाऊ लिहितात. ते मॉस्कोतल्या गॉर्की मार्गावरून जाताना त्यांना हे जाणवते. आपल्याकडे फक्त राजकारणातल्या नेत्यांना समाज श्रेष्ठ समजतो. ग्रेट समजतो. पण रशियात अण्णा भाऊंना सुंदर अनुभव येतो.

''रशियात कलावंतांना किती मान आहे, याची तर तिथं पदोपदी प्रचिती येते, ओळख होते. रशियाने महान साहित्यिकांना अजरामर करून ठेवलं आहे. कित्येक मार्गांना, चौकांना कलावंताची नावं दिली आहेत आणि त्यांचे भव्य पुतळे उभे केले आहेत.''

रशियन जनतेनं क्रांतीचा मारा सहन केला. मग खरोखर क्रांती झाली. रशियन जनता बदलली. नम्रता, सभ्यता तिथे गुलाबबन जसं फुलावं, डवरावं तसं फुलत आहे. प्रत्येक जनता त्यांच्या विद्यमान परिस्थितीत जगत असते. रशियन जनतेने गेल्या काही दशकांत अनेक आव्हानांचा मुकाबला केला होता. रक्त-अश्रू आणि घाम यांच्या मिश्रणातून या जनतेनं समाजवादाची प्रतिष्ठा वाढवली. सोव्हिएत रशिया अनेक वर्षे कष्टकरी रयतेचं नेतृत्व करीत होता. भारताचा एक सच्चा मित्र म्हणून सोव्हिएत रशियाची भूमिका जग कधीही विसरू शकणार नाही. भारतीयांबद्दल रशियनांना आत्मीयता खूपच वाटते. भारतातही रशियाबद्दल आस्था असतेच असते. 'तुम्ही भारतीय काय?' असा प्रश्न विचारून रशियन नागरिक विचारतात, 'तुमचे नेहरू कसे आहेत?' या प्रश्नात ही ओल किती खोल आहे हे जाणवते. 'रशियन तरुण प्रेमाला फारच पवित्र मंगल मानतो. त्याची साक्ष हृदयावर हात ठेवून दुसरी शपथ कसली हवी आहे? हृदय हेच सर्वानुमते असते. हृदय हाच रशियात देव आहे', असा प्रवासवर्णनात उल्लेख अण्णा भाऊ करतात. ''रशियन नवी सृष्टी पाहिली. एक नवा समाज पाहिला. समाजवादाच्या सावलीत वाढलेली मुलं नि फुलं पाहिली. जर मी सोव्हिएत देश पाहिला नसता तर माझ्या जीवनात फार मोठी पोकळी राहून गेली असती.' रशियात शिक्षणाची नदीच वाहते, हे अण्णा भाऊ त्यांच्या सुंदर प्रतिमांचा वापर करून सांगतात. त्यांना विद्येचं वेड लागले आहे. त्यांना प्रगतीचा पदर सापडला आहे. फुलं, मुलं, फळ नि माणूस समान पातळीवर असून, तिथं जीवनात मुळीच विसंगती नाही. अशी नवी बातमीच ते आपणाला सांगतात. रशिया म्हणजे मुक्त माणसं. स्वायत्त माणसं आणि कष्टाळू माणसं यांचा देश आहे, हे त्यांच्या निरीक्षणातून सुटत नाही. 'मॉस्कोतील गॉर्की मार्गावर घाण करणं म्हणजे देशाची अप्रतिष्ठा करण्याचे पाप समजले जाते. अण्णा भाऊ रशियात समाजवादाचं यश पाहत होते. अपयशही हुडकू पाहत होते. ते लिहितात.

***भारताइतकंच रशियावर प्रेम करणाऱ्या अण्णा भाऊंनी कुठंही फापटपसारा केला नाही की बडेजाव केला नाही व रसिक, चोखंदळ आणि सुजाण मन रशियातल्या वातावरणात कसं सुखावलं याची सरळसोट अशी कहाणी म्हणजे 'माझा रशियाचा प्रवास'***

'ऐश्वर्याबरोबर मी दारिद्र्यही शोधत होतो, परंतु मला दारिद्र्य दिसत नव्हते. दारिद्र्य हे दडत नसतं.''

रशियातील अनेक शहर पाहताना अण्णा भाऊ सांगतात. 'मॉस्को पाहावं संध्याकाळी. लेनिनग्राड पाहावं दिवसा. स्टॅलिनगार्डचा मर्दपणा युद्धात आणि बान्कूचे सौंदर्य रात्री.'

उझबेकिस्तान या घटक राष्ट्राच्या अध्यक्षपदावर एक स्त्री विराजमान होती. तिथला प्रत्येक माणूस साक्षर होता. प्रत्येक माणसाला कलेची एक वेगळीच ओढ होती व विलक्षण वेडही आहे. खरी कला ही सदैव काळजाशी भिडून बोलत असते. तिला कानाची गरज भासत नाही. अण्णा भाऊ सोव्हिएत रशियात रशियन जनतेचे अनेक पदर व पद्धती पाहत होते. तिथला अपार उद्योग, विद्वत्ता, कला आणि साहित्य, उदात्त संस्कृती पाहून त्यांचं मन थक्क होत होतं. श्रमिक संस्कृतीचा एक अस्सल प्रतिभावंत कम्युनिस्टांच्या प्रतिभेनं निर्माण केलेलं जग आपल्या शरीराचे हजार डोळे करून पाहत होता. जागोजागी त्यांना रशियन माणसं फुलं भेट देत होती. सांगत होती. 'ही आमच्या देशातील फुले तुम्ही भारतापर्यंत घेऊन जा आणि भारतीय स्वातंत्र्यासाठी ज्या वीरांनी आत्मबलिदान केले आहे. त्यांच्या समाधीवर ती अर्पण करा.'

### अण्णा भाऊ साठे; भारतीय क्रांतीचे प्रतिभावंत भाष्यकार :
### - प्रा. डॉ. रावसाहेब कसबे

प्रत्येक माणूस, मग तो सामान्य असो की असामान्य, तो आपल्या कालखंडाचे अपत्य असतो. परंतु तो जन्मांतरचे जीवन निर्विकारपणे जगत नाही. आपल्या आजूबाजूला आणि आपल्या अंतरात्म्यात जे घडत

असते. त्याबद्दल तो स्वतःची प्रतिक्रिया सतत नोंदवीत असतो. त्याची ही प्रतिक्रिया कधी समर्थ असते तर कधी केविलवाणीही असते. कारण तिला वास्तविक जीवनाचे संदर्भ असतात. हे संदर्भ समाजव्यवस्थेच्या अनेक पदरी जडणघडणीतून मानवी जीवनावर प्रभाव टाकीत असतात. एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात कार्ल मार्क्सने माणसाला त्याची खरी ओळख करून दिली. माणूस हा केवळ त्याच्या इतिहासाचे अपत्य असतो असे नाही. तर तो इतिहासाचा बापही बनू शकतो. कारण त्यांच्यात इतिहासाला नवे वळण देण्याची. त्याला नव्या रूपात घडविण्याची शक्तीही प्राप्त झालेली असते. माणूस जसा इतिहास घडवून त्याचे पितृत्व स्वतःकडे घेतो तसाच तो स्वतःलाही घडवीत असतो. हे माणसाचे सामर्थ्य मार्क्सने दाखवून दिल्यानंतरच संपूर्ण जगातील कष्टकऱ्यांनी, दलितांनी नवा इतिहास घडवण्याचा संकल्प केला आणि जगात अनेक राजकीय क्रांत्या जन्माला घातल्या. त्यासाठी आपले जीवन समर्पित केले.

महाराष्ट्रात अण्णा भाऊ साठे हे एक असे व्यक्तिमत्त्व होऊन गेले की, ज्यांनी आपले सारे आयुष्य माणसाच्या कल्याणासाठी समर्पित केले. अण्णा भाऊ प्रतिभावंत होते. तसेच ते कलावंत होते. त्यांचे साहित्य आज आपल्याला उपलब्ध आहे. त्यांच्या साहित्यातून अखंडपणे माणसाचे सामर्थ्य प्रतिबिंबित झालेले आहे. माणूस इतिहासाचा निर्माता कसा होऊ शकतो याचे सखोल चिंतन त्यांच्या वाङ्मयात आहे. माणसावर प्रेम करणारे साहित्यिक आता संख्येने कमी होत आहेत. अण्णा भाऊंचे माणसाच्या प्रेमाने ओथंबलेले आणि त्यांच्या भविष्यातील स्वप्नांनी रंगलेले वाङ्मय वाचले की, त्यांचे मोठेपण आणि अनन्यसाधारण वैशिष्ट्य दृष्टीस पडते. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत जनमनाच्या काळजाला हात घालण्याचे कौशल्य अण्णा भाऊंच्या तमाशात होते. कामगारांच्या माणूस म्हणून होणाऱ्या बेचैनीला अण्णा भाऊ आपल्या काव्यातून समर्थपणे अभिव्यक्त करीत. त्यांचा ‘फकिरा’ शोषणाविरुद्ध बंड करतो. त्यांची लावणी विरहातील तगमग शब्दांच्या सामर्थ्यांमुळे अंतःकरणाचा ठाव घेते. त्यांचे मुंबईचे वर्णन आजवर मुंबईचे जे दर्शन साहित्याने घडवले, त्या सर्वात अचूक आणि विविध पदरी आहे. माणूस आपले माणूसपण का गमावून बसला. असा प्रश्न अण्णा भाऊच विचारतात आणि समाजव्यवस्थेने माणसाचे

◆ *खऱ्या अर्थाने आधुनिकता म्हणावी अशी रशियातली खेडी पाहून अण्णा भाऊ विस्मयचकित होणे स्वाभाविक होते.* ◆

माणूसपण हिरावून घेतले असे उत्तर देतात. अण्णा भाऊ आयुष्यभर कम्युनिस्ट होते. त्याबद्दल त्यांना रास्त अभिमानही होता. कम्युनिस्ट पक्षांनी त्यांच्या उत्तरायुष्यात त्यांना फारशी मदत केली नाही...

## अण्णा भाऊ साठे यांच्या सहवासात
## - श्री. बी. ए. मोरे

तेव्हा मी महाविद्यालयात शिकत होतो. १९६३-६४चे वर्ष होते. कला शाखेचा विद्यार्थी असल्याने अभ्यासक्रमाशिवाय अवांतर वाचनास भरपूर वेळ असायचा. त्यामुळे कथा-कादंबऱ्या वाचनाची गोडी लागली होती. त्यामध्ये फडके, खांडेकर यांच्या कादंबऱ्या जास्त लोकप्रिय होत्या. त्यातच अण्णा भाऊ साठे यांच्या ग्रामीण भागातील रोजच्या जीवनावर आधारित अनेक प्रणयकथा, शूरकथा वाचनात यायच्या. मनावर त्यांचा पगडा बसायचा. त्यामुळे अण्णा भाऊ साठे या लेखकाबद्दल एक प्रकारची आत्मीयता निर्माण झाली. याच काळात महाविद्यालयामध्ये नोटीस लागली.

अण्णा भाऊंचे व्याख्यान. आम्हा सर्वांना अतिशय उत्कंठा लागली होती त्यांना पाहायला. आमच्या महाविद्यालयात अण्णा भाऊंचे व्याख्यान आयोजित केले होते. त्या दिवशी सर्वात पुढे बसायची जागा मिळवली.

प्राचार्यांसोबत सावळ्या रंगाची पिवळ्या रंगाचा नेहरू शर्ट कपाळाला भंडारा लावलेला, पायजमा अशा पेहरावातील अण्णा भाऊंना पाहताच मुलांनी टाळ्या वाजवून त्यांचे स्वागत केले. प्राचार्यांनी प्रास्ताविकातच परिचय करून देऊन त्यांचे 'फकिरा' कादंबरीवरून 'फकिरा' नावाचा चित्रपट तयार करीत असल्याबद्दल व त्यात महाविद्यालयातील एन. सी. सी.च्या विद्यार्थ्यांना घेण्यात येणार असल्याबद्दल सांगितले. अण्णा भाऊंचे व्याख्यान ग्रामीण भाषेत झाले. विद्यार्थी टाळ्यांच्या गजरात प्रतिसाद देत होते. 'माझा रशियाचा प्रवास' यावर व्याख्यान झाले. भाषणातील उदाहरणे कायम स्मरणात राहावीत अशीच होती. रशियात मॉस्को विमानतळावर

ते उतरले असताना त्यांना पाहायला लोकांची खूप गर्दी. त्यांची स्वाक्षरी घेण्यासाठी लोकांनी त्यांना गराडा घातला होता. उंच धिप्पाड रशियनांपुढे अण्णा भाऊंची ठेंगू मूर्ती. काय करावे हे पोलिसांना कळत नव्हते. मग त्यांनी बिळात हात घालून जसा पाण्यातला खेकडा बाहेर काढावा, तसे पोलिसांनी गराडा घातलेल्या लोकांच्या पायाखालून अण्णा भाऊंना मानगुटीला धरून बाहेर नेले. या प्रसंगाचे वर्णन कायम स्मरणात राहिले.

'फकिरा' चित्रपटाचे चित्रीकरण साताऱ्याच्या परिसरात चालू होते. ब्रिटिश सैनिकांची तुकडी मार्चिंग व बंदोबस्त करीत असल्याचा देखावा होता. मी एन.सी.सी.मध्ये सार्जंट या हुद्यावर असल्यामुळे त्यात नशिबाने माझा नंबर लागला. आयुष्यात पहिल्यांदा सिनेमात सैन्यात का होईना काम करण्याची संधी मिळाली. त्यावेळी अण्णा भाऊंना जवळून बघण्याची, त्यांच्याबरोबर बोलायची संधी मिळाली. याचा आनंद महाविद्यालयीन जीवनात अविस्मरणीय ठरला.

महाविद्यालयीन पदवीपर्यंतचे शिक्षण पूर्ण केल्यानंतर पदव्युत्तर शिक्षणासाठी १९६५ मध्ये मुंबईला येण्याची संधी मिळाली. सुरुवातीला वरळीसारख्या कामगारवर्गात राहिल्याने समाज व समाजकार्य यामध्ये ओढला गेलो. सातारा, सांगली व कोल्हापूर भागातील कार्यकर्त्यांच्या सहवासात आल्याने समाजातील थोरामोठ्यांचा परिचय झाला. त्याच वेळी कार्यकर्त्यांकडून अण्णा भाऊंचा पत्ता मिळवला आणि जाणकार मित्रांसोबत घाटकोपरच्या चिरागनगरमध्ये एका रविवारी जाऊन धडकलो. अण्णा भाऊंनी त्यांच्या कथा-कादंबऱ्यांमधून अजरामर केलेले ते चिरागनगर खरोखरच बकाल होते. तसल्या ठिकाणी अण्णा भाऊ राहतात कसे याचेच आश्चर्य वाटले. त्या झोपडीत आम्ही गेलो. तीन पायांचे टेबल, झोपडीच्या खांबाला चौथ्या पायाचा टेकू दिलेला. तीच अवस्था खुर्चीची. टेबलावर लिहिण्याचे साहित्य, झोपडीला आरपार छिद्रे. कोंबडीची पिल्ले आतबाहेर करायची. गोणपाटाचे तरटे कोपऱ्यात पडले होते. ते आम्हांला अण्णा भाऊंनीच दिले व त्यावर आम्ही बसलो. मी सारे अचंब्याने पाहत होतो. आम्ही आमचा परिचय करून देऊन येण्याचा हेतू सांगितला. माझे नातेवाईक वाटेगावला असल्याचा खुलासा केल्यावर त्यांना आनंद झाला. मी एम.ए. करतोय म्हटल्यावर त्यांना खूप बरे वाटले. समाजातील मुलांनी

◆ *शेतीचे वर्णन करताना अण्णा भाऊ आश्चर्यमुग्ध तर झालेच; पण शेतीशी निगडित असणाऱ्या काही बाबींचा तपशीलही त्यांनी दिला.* ◆

खूप शिकले पाहिजे ही मनापासूनची भावना त्यांनी बोलून दाखवली. माझ्या बरोबरच्या मित्राला माहीत असल्याने त्याने खिशातून छोटी बाटली काढली व अण्णा भाऊंच्या हातात दिली. ती पाहताच अण्णा भाऊंना खूप आनंद झाला. दांडा मोडलेला कप एका फळकुटावर होताच. कप हातात घेतल्यावर अण्णा भाऊंनी बोलायला सुरुवात केली. एक तास कसा गेला ते कळले नाही. मूड इतका लागला की, त्यांच्यातील शाहीर जागा झाला.

काही वेळाने त्यांनी आम्हांला गाऊन दाखवले. टेबलावरच थाप मारून त्यांनी पोवाडा म्हटला. त्यांना घेऊन जायला लोक आल्याने आम्हाला परतावे लागले.

माझा मग नेहमीचाच कार्यक्रम ठरून गेला. एम.ए.चा अभ्यास चालू होताच. सुट्टी मिळताच महिना-दोन महिन्याला माझी चिरागनगरला भेट होऊ लागली. परिचय वाढत गेला. मी तेव्हा विद्यार्थी होतो. कमवता नव्हतो. पण अण्णा भाऊंकडे गेल्यावर त्यांना फक्त एक रुपया द्यायचो. त्यातील आठ आण्यास एक याप्रमाणे दोन कप घेऊन अण्णा भाऊंची तंद्री लागायची. ते बोलायचे आणि आम्ही ऐकायचो. असेच बसलो असताना त्यांनी 'डोळे मोडीत राधा चाले', 'आवडी' या कथा ऐकवल्या. त्यांच्या सांगण्याच्या शैलीवर आम्ही अगदी भाळून जायचो. नंतर त्या कथा प्रसिद्ध झाल्या.

माझे एम.ए.चं शिक्षण पूर्ण झाले आणि त्याच दरम्यान १९६७ मध्ये मा. ना. बाबूराव भास्कर राज्याचे समाजकल्याणकारी मंत्री झाले. सामाजिक चळवळीत माझा सहभाग एव्हाना खूपच वाढला होता. अण्णा भाऊंची आर्थिक परिस्थिती बघवत नव्हती. मा. ना. भास्कर साहेबांच्या कानावर आम्ही अण्णा भाऊंची परिस्थिती घातली. मा. भास्कर साहेबांना अण्णा भाऊंबद्दल अत्यंत आदर असल्याचे जाणवले. आम्ही समाजातील कार्यकर्ते चिरागनगरला फेऱ्या मारतच होतो. सौ. शांताबाई साठे, भाऊसाहेब साठे, श्री. एन. के. सकपाळ, नाशिकचे आर. जी. साठे, साताऱ्याचे जे.

> ◆ *अण्णा भाऊ साठे यांचे 'माझा रशियाचा प्रवास' हे पुस्तक छोटे असले तरी विविध अनुभवांनी ते समृद्ध आहे. अत्यंत साध्या, सोप्या आणि खेळकर भाषेतील हा प्रवासानुभव रशियन समाजाचा आणि संस्कृतीचा सहजतेने आलेख मांडतो.* ◆

पी. इंगळे, मुंबईचे ॲड. काका गायकवाड आम्ही ना. भास्कर साहेबांकडे पाठपुरावा करीतच होतो. अण्णा भाऊंची कौटुंबिक स्थिती चांगली नव्हती. चिरागनगरच्या झोपडीतून अण्णा भाऊंना बाहेर काढणे आवश्यक होते. नामदार भास्कर साहेबांनी पण जोर लावला आणि त्यांच्या प्रयत्नांना एकदा यश आले. मा. ना. भास्कर यांनी अण्णा भाऊंना गृहनिर्माण मंडळातील गोरेगावला एक घर मिळवून दिले. एकदाचं अण्णा भाऊंचे चिरागनगर सुटले व गोरेगावला गृहनिर्माण मंडळाच्या वसाहतीत राहायला आले. समाजाला हायसे वाटले. एवढ्यावरच नामदार भास्करसाहेब थांबले नाहीत. त्यांनी त्यावेळचे मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या कानावर अण्णा भाऊंबद्दल समाजाची मागणी घेतली व त्यांना खास बाब म्हणून अण्णा भाऊंना घर मिळवून दिले.

हे सारे आम्ही पाहत होतो. अण्णा भाऊंना घर मिळाले. आर्थिक तरतूद झाली. त्यांचा स्वभाव कलंदर होता. त्यांच्या आयुष्यातील दारिद्र्याने त्यांच्यावर सखोल आघात केला असल्यामुळे त्यांना कशातच सुख वाटत नव्हते. त्यांच्या स्वभावाचा फायदा सर्वांनी घेतला होता. फुकटावारी त्यांच्या कथा-कादंबऱ्या इतरांनी नेल्या होत्या व प्रसिद्ध केल्या जात होत्या. अण्णा भाऊ दिवसेंदिवस खंगत चालले होते. शारीरिक व मानसिक कुरबुरी वाढायला लागल्या होत्या. कार्यकर्त्यांची वर्दळ चालूच होती आणि एका सायंकाळी जुलैमध्ये अण्णा भाऊ गेल्याची बातमी आम्हांस समजली. पाऊस धुवांधार पडत होता. मी, सौ. शांताबाई साठे, भाऊसाहेब साठे, आर. जी. साठे, ना. बाबूराव भास्करसाहेब यांच्या समतवेत गोरेगावला सिद्धार्थनगरला पोहचलो. रात्रीचे दहा वाजून गेले होते. भरपूर पाऊस पडत असल्याने मोजकीच मंडळी स्मशानभूमीत आली होती. त्यात शाहीर अमर शेख, आत्माराम पाटील, डॉ. सदा कऱ्हाडे व इतर स्नेही आणि

समाजातील ठरावीक कार्यकर्ते हजर होते.

रात्री अंत्यविधीला आलेल्या मंडळींनी शोकसभा घेतली. त्यावेळी शाहीर अमर शेख यांनी त्यांच्या भाषणाने सगळ्यांना रडवले. त्याचे भाषण आजही माझ्या स्मरणात आहे. शाहीर अमर शेख म्हणाले होते. ''या माणसाचा मला खूप राग आला आहे. अहो, इतकी वर्षं आम्ही बरोबर राहिलो. सुखदुःखात बरोबर गेलो आणि एकदमच आम्हांला गुंगारा देऊन चकवून एकटाच पुढे गेला आहे. याला आता काय म्हणावं?'' मा. ना. भास्करांच्या उपस्थितीत आम्ही अंत्यविधी पार पाडला. निदान शेवटच्या क्षणापर्यंत मला अण्णा भाऊंचा सहवास लाभला हे मी माझे भाग्य समजतो. या थोर साहित्यिकासाठी मला काही करण्याची संधी मिळाली. त्यांचा सहवास लाभला. त्यांच्या तोंडून कथा-कादंबऱ्या ऐकायला मिळाल्या हा माझ्या जीवनातील अविस्मरणीय ठेवा आहे.

❖❖❖

# पुरस्कार आणि सन्मान

## पहिल्या दलित साहित्य संमेलनाचे उद्‌घाटक (१९५८)

१९६१ साली अण्णा भाऊ साठे यांच्या 'फकिरा' या कादंबरीला महाराष्ट्र सरकारचा सर्वोत्कृष्ट कादंबरीचा पुरस्कार मिळाला. तत्कालीन ज्येष्ठ साहित्यिक वि. स. खांडेकर यांनीही कादंबरीचे कौतुक केले होते.

**कादंबरीवर आधारित चित्रपट :**

| क्र. | कादंबरी | चित्रपट | संस्था |
|---|---|---|---|
| १. | वैजयंता | वैजयंता-१९६१ | रेखा फिल्म्स |
| २. | आवडी | टिळा लावते मी रक्ताचा-१९६९ | चित्र ज्योत |
| ३. | माकडीचा माळ | डोंगरची मैना-१९६९ | विलास चित्र |
| ४. | चिखलातील कमळ | मुरली मल्हारी रायाची-१९६९ | रसिक चित्र |
| ५. | वारणेचा वाघ | वारणेचा वाघ-१९७० | नवदीप चित्र |
| ६. | अलगूज | अशी ही साताऱ्याची तऱ्हा-१९७४ | श्रीपाद चित्र |
| ७. | फकिरा | फकिरा | चित्रनिकेतन |
| ८. | चित्रा | चित्रा-२०१२ | पुणे फिल्म्स |

**अ) अण्णा भाऊ साठे यांचे कथासंग्रह**

| क्र. | कथासंग्रहाचे नाव | कथासंग्रहाच्या निघालेल्या आवृत्त्या | प्रकाशन संस्था |
|---|---|---|---|
| १. | बरबाद्या कंजारी | प्र.आ.ऑगस्ट १९६० | विद्यार्थिगृह प्रकाशन संस्था |
| २. | चिरागनगरची भुतं | प्र.आ.ऑगस्ट १९७८ | १७८/ब पर्वती, पुणे -०९ |
| ३. | निखारा | (१ ते ५) | |
| ४. | नवती | (१ ते ५) | |

| | | | |
|---|---|---|---|
| ५. | पिसाळलेला माणूस | (१ ते ५) | |
| ६. | आबी | दु.आ. १९८६ | भगवानदास हिरजी के. ना. चाळ |
| ७. | फरारी | | |
| ८. | भानामती | | |
| ९. | लाडी | दु.आ. जानेवारी १९८६ | |
| १०. | कृष्णाकाठच्या कथा | | मॅजेस्टिक प्रकाशन |
| ११. | खुळवाडी | | ३१६, प्रसाद चेंबर्स, गिरगांव |
| १२. | गजाआड | पा.आ.मार्च १९८७ | सुरेश एजन्सीज |
| १३. | गुऱ्हाळ | | २०५, शुक्रवार पेठ, पुणे -०९ (१२-१३) |

**ब) नाटके**

| **क्र.** | **नाव** | **आवृत्ती** | **प्रकाशन** |
|---|---|---|---|
| १. | इनामदार | प्र. आ. मे १९५८ | चंद्रकांत शेट्ये, प्रकाशन मंदिर १८३२ सी अत्रे सभागृह, शिवाजी रस्ता, कोल्हापूर - २ |
| २. | पेंग्याचं लगीन | | |
| ३. | सुलतान | | |

**क) शाहीर**

| **क्र.** | **नाव** | **आवृत्ती** | **प्रकाशन** |
|---|---|---|---|
| १. | शाहीर | प्र. आ. १९५२ | मनोविकास प्रकाशन, दानारा |
| | | द्वि.आ. १९८५ | इमारत, साने गुरुजी मार्ग, लालबाग, मुंबई-१४. |

**ड) तमाशा**

| क्र. | लोकनाट्य/तमाशाचे नाव | आवृत्त्या | प्रकाशन |
|---|---|---|---|
| १. | अकलेची गोष्ट | १९४५ | |
| २. | खापऱ्या चोर | दु. १९८३ | चंद्रकांत शेट्ये, कोल्हापूर |
| ३. | कलंत्री | १९४६ | |
| ४. | बिलंदर बुडवे | १९४६ | |
| ५. | बेकायदेशीर | १९४७ | |
| ६. | शेठजीचं इलेक्शन | १९४६ | |
| ७. | पुढारी मिळाला | १९५२ | |
| ८. | मूक मिरवणूक | १९४९ | |
| ९. | माझी मुंबई | १९४८ | |
| १०. | देशभक्त घोटाळे | १९४६ | विद्यार्थिगृह प्रकाशन, पर्वती, पुणे -९ |
| ११. | दुष्काळात तेरावा | १९४६ | |
| १२. | निवडणुकीतील घोटाळे | १९४६ | |
| १३. | लोकमंत्र्यांचा दौरा | १९५२ | |
| १४. | पेंग्याचं लग्न | १९५२ | |

**इ) प्रवासवर्णन**

| क्र. | नाव | प्रकाशन |
|---|---|---|
| १. | माझा रशियाचा प्रवास | सुरेश एजन्सीज २०५, शुक्रवार पेठ, पुणे. |

**अण्णा भाऊ साठे यांचे पोवाडे**

| क्र. | पोवाड्यांची नावे | वर्ष |
|---|---|---|
| १. | नानकीन नगरापुढे | १९४२ |
| २. | स्टॅलिनग्राडचा पोवाडा | १९४२ |
| ३. | बर्लिनचा पोवाडा | १९४२ |
| ४. | बंगालची हाक | १९४४ |
| ५. | पंजाब-दिल्लीचा दंगा | १९४७ |

| | | |
|---|---|---|
| ६. | तेलंगणाचा संग्राम | १९४७ |
| ७. | महाराष्ट्राची परंपरा | १९४७ |
| ८. | अमळनेरचे अमर हुतात्मे | १९४९ |
| ९. | मुंबईचा कामगार | १९४९ |
| १०. | काळ्या बाजाराचा पोवाडा | १९४९ |

**अण्णा भाऊंच्या ३५ कादंबऱ्या**

| **क्र.** | **कादंबरी** | **आवृत्ती** | **प्रकाशन** |
|---|---|---|---|
| १. | आग | | विद्यार्थिगृह प्रकाशन, १७८/ब, पर्वती, पुणे -९ |
| २. | अहंकार | | विद्यार्थिगृह प्रकाशन, १७८/ब, पर्वती, पुणे -९ |
| ३. | आघात | | विद्यार्थिगृह प्रकाशन, १७८/ब, पर्वती, पुणे -९ |
| ४. | अग्निदिव्य | | विद्यार्थिगृह प्रकाशन, १७८/ब, पर्वती, पुणे -९ |
| ५. | कुरूप | | विद्यार्थिगृह प्रकाशन, १७८/ब, पर्वती, पुणे -९ |
| ६. | चित्रा | | विद्यार्थिगृह प्रकाशन, १७८/ब, पर्वती, पुणे -९ |
| ७. | फुलपाखरू | | विद्यार्थिगृह प्रकाशन, १७८/ब, पर्वती, पुणे -९ |
| ८. | वारणेच्या खोऱ्यात | | विद्यार्थिगृह प्रकाशन, १७८/ब, पर्वती, पुणे -९ |

| | | | |
|---|---|---|---|
| ९. | रत्ना | ४थी आवृत्ती<br>२४ मार्च १९८८ | विद्यार्थिगृह प्रकाशन,<br>१७८/ब,<br>पर्वती, पुणे -९ |
| १०. | रानबोका | | विद्यार्थिगृह प्रकाशन,<br>१७८/ब,<br>पर्वती, पुणे -९ |
| ११. | संघर्ष | | विद्यार्थिगृह प्रकाशन,<br>१७८/ब,<br>पर्वती, पुणे -९ |
| १२. | रूपा | दु. आ. १९८१ | विद्यार्थिगृह प्रकाशन,<br>१७८/ब,<br>पर्वती, पुणे -९ |
| १३. | तास | | विद्यार्थिगृह प्रकाशन,<br>१७८/ब,<br>पार्वती, पुणे -९ |
| १४. | गुलाम | | चंद्रकांत शेट्ये<br>प्रकाशन मंद{र<br>१९६२/सी, अत्रे<br>सभागृह |
| १५. | डोळे मोडीत राधा चाले | | शिवाजी रस्ता,<br>कोल्हापूर -८ |
| १६. | ठासलेल्या बंदुका | | शिवाजी रस्ता,<br>कोल्हापूर -८ |
| १७. | जिवंत काडतूस | | शिवाजी रस्ता,<br>कोल्हापूर -८ |
| १८. | चंदन | ७वी आ.<br>जानेवारी १९९३ | शिवाजी रस्ता,<br>कोल्हापूर -८ |
| १९. | मूर्ती | | शिवाजी रस्ता,<br>कोल्हापूर -८ |
| २०. | मंगला | | शिवाजी रस्ता,<br>कोल्हापूर -८ |

| | | | |
|---|---|---|---|
| २१. | मथुरा | | शिवाजी रस्ता,<br>कोल्हापूर -८ |
| २२. | मास्तर | ५वी आ.<br>जानेवारी १९९१ | |
| २३. | चिखलातील<br>कमळ | ४थी आ.<br>जानेवारी १९९१ | शिवाजी रस्ता,<br>कोल्हापूर -८ |
| २४. | अलगूज | | मॅजेस्टिक प्रकाशन<br>३१६ प्रसाद चेंबर्स,<br>गिरगांव नाका,<br>मुंबई-४ |
| २५. | रानगंगा | ३री आ.<br>जानेवारी १९९७ | मॅजेस्टिक प्रकाशन<br>३१६ प्रसाद चेंबर्स,<br>गिरगांव नाका,<br>मुंबई-४ |
| २६. | माकडीचा माळ | | |
| २७. | केवड्याचं<br>कणीस | ३री आ.<br>नोव्हेंबर १९४९ | मॅजेस्टिक प्रकाशन<br>३१६ प्रसाद चेंबर्स,<br>गिरगांव नाका,<br>मुंबई-४ |
| २८. | वैजयंता | | |
| २९. | धुंद रानफुलाचा | | मॅजेस्टिक प्रकाशन<br>३१६ प्रसाद चेंबर्स,<br>गिरगांव नाका,<br>मुंबई-४ |
| ३०. | आवडी | ३री आ.<br>१९९१ साल | सुरेश एजन्सीज<br>२०५, शुक्रवार पेठ,<br>पुणे - २ |
| ३१. | वारणेचा वाघ | | सुरेश एजन्सीज<br>२०५, शुक्रवार पेठ,<br>पुणे - २ |

| | | | |
|---|---|---|---|
| ३२. | फकिरा | १६वी आ.<br>जानेवारी १९९५ | सुरेश एजन्सीज<br>२०५, शुक्रवार पेठ,<br>पुणे - २ |
| ३३. | वैर | ५वी आ.<br>ऑगस्ट १९९३ | सुरेश एजन्सीज<br>२०५, शुक्रवार पेठ,<br>पुणे - २ |
| ३४. | पाझर | | सुरेश एजन्सीज<br>२०५, शुक्रवार पेठ,<br>पुणे - २ |
| ३५. | सैरसोबत | | सुरेश एजन्सीज<br>२०५, शुक्रवार पेठ,<br>पुणे - २ |

## अण्णा भाऊ साठे यांच्याविषयी लिहिली गेलेली पुस्तके

★ Anna Bhau Sathe चरित्र-लेखक - डॉ. बजरंग कोरडे : मूळ इंग्रजी पुस्तक. साहित्य अकादमीद्वारा कन्नड, गुजराती, तेलुगू, मराठी इत्यादी भाषांत भाषांतरित झालेले पुस्तक.

★ अण्णा भाऊ साठे - (चरित्र-लेखक - बाबूराव गुरव)

★ अण्णा भाऊ साठे आणि अमर शेख - एक आकलन - (लेखक - डॉ. बाबूराव अंभोरे)

★ माझा भाऊ अण्णा भाऊ - (चरित्र - लेखक- शंकर साठे)

★ लोकशाहीर अण्णा भाऊ साठे - (चरित्र- डॉ. भगवान)

★ लोकशाहीर अण्णा भाऊ साठे निवडक वाङ्मय - (प्रकाशक - महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ)

★ कोल्हापूर श्रमिक प्रतिष्ठानने 'अण्णा भाऊ साठे साहित्य समीक्षा' हा ग्रंथ प्रसिद्ध केला होता. त्या ग्रंथात 'अण्णा भाऊंची वगनाट्ये' हा लेख पान १०४-१११ या पानांवर आला आहे. ग्रंथाचे संपादक : प्रा. रणधीर शिंदे

★ कपिल मीडिया प्रकाशनने ३० ऑगस्ट २०१० रोजी 'लोकशाहीर साहित्यसम्राट अण्णा भाऊ साठे गौरव अंक' प्रकाशित केला होता. त्यात 'अण्णा भाऊंचा जातिअंताचा लढा' हा लेख आला होता.

**ध्वनिफीत**

अण्णा भाऊ साठे आणि लहूजी वस्ताद साळवे यांच्या जीवनावर 'लोकप्रबोधिनी' कलामंचाने 'सिंहाचा छावा' नावाची ध्वनिफीत बनवली आहे.

## अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यावर लिहिली गेलेली विविध पुस्तके तथा वाङ्मयसूची

| क्र. | पुस्तकाचे नाव | लेखक |
|---|---|---|
| १. | माझा भाऊ अण्णा भाऊ | शंकर साठे |
| २. | विद्रोहाचे पाणी पेटले आहे | डॉ. गंगाधर पानतावणे |
| ३. | दलित साहित्य वेदना व विद्रोह | डॉ. भालचंद्र फडके |
| ४. | दलित कथा | डॉ. चंद्रकुमार नलगे, डॉ. गंगाधर पानतावणे |
| ५. | ग्रामीण साहित्य स्वरूप आणि बोध | डॉ. नागनाथ कोत्तापल्ले |
| ६. | दलित साहित्याचे निराळेपण | डॉ. प्रभाकर मांडे |
| ७. | दलितांचे जग | ना. रा. शेंडे |
| ८. | दलित साहित्य सिद्धान्त आणि स्वरूप | डॉ. यशवंत मनोहर |
| ९. | दलित साहित्य का नको? | विजय सोनवणे |
| १०. | प्रातिनिधिक कथा- अण्णा भाऊ साठे | डॉ. एस. एस. भोसले |
| ११. | हे सूर अलगुजाचे | गायकवाड |
| १२. | कलंदर प्रेषित | गायकवाड |
| १३. | लोकशाहीर अण्णा भाऊ साठे | डॉ. बाबूराव गुरव |
| १४. | असे होते अण्णा भाऊ | वि. वि. विटेकर |
| १५. | दलित साहित्य एक अभ्यास | अर्जुन डांगळे |
| १६. | मराठी दलित कथा | प्रा. अविनाश डोळस |
| १७. | अण्णा भाऊ साठे यांचे | प्रगत साहित्यसभा, कथा विश्व मुंबई-५९ |

| | | |
|---|---|---|
| १८. | अण्णा भाऊ साठे साहित्य आणि विचार | डॉ. बाबूराव गुरव |
| १९. | 'अण्णा भाऊ साठे' यांच्या ६१ प्रातिनिधिक कथा | लोकवाङ्मयगृह, भूपेश गुप्ता चौक, प्रभादेवी, मुंबई-२५ |
| २०. | लोकराज्य १ नोव्हेंबर १९९३ लोकशाहीर अण्णा भाऊ साठे विशेषांक | महाराष्ट्र शासन |

❖❖❖

## -: सौजन्य आणि आभार :-

या पुस्तकातील काही उतारे संदर्भ म्हणून घेतले आहेत.

१) लोकशाहीर अण्णा भाऊ साठे - लोकशाहीर तथा लोकलेखक, झेप प्रकाशन, नाशिक

२) अण्णा भाऊ साठे : साहित्य आणि समीक्षा : प्रा. मिलिंद कांबळे आणि प्रा. डॉ. राजीव यशवंत, निर्मल प्रकाशन, नांदेड

३) अण्णा भाऊ साठे : समाज, विचार आणि साहित्य विवेचन : बाबुराव रामचंद्र गुरव - पीएच.डी.साठी सादर केलेला प्रबंध, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

४) 'भारतीय साहित्याचे निर्माते अण्णा भाऊ साठे' : बजरंग कोरडे, साहित्य अकादमी, नवी दिल्ली. (२००१)

❖❖❖